महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

१९६८

जा, फे, मा, एमे, जून-जुलै, ऑगस्ट-७ अंक

अनुक्रमणिका


राष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत,
र्भ साहित्य संघाचे मुखपत्र

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषयः सारस्वती जन्म भूः

ंदर्भ साहित्य संघ, नागपूर

ु ग वा णी

अभिनंदन



ळे
ील यतिका कमी

चित्रकार श्री. ३२९
७५ व्या वा

र्ष २२, अंक ८, जानेवारी १९६८

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

सर्व सभासदांना निवडणूक—विषयक सूचना

सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, १-४-६८ ते ३१-३-७१ ह्या तीन वर्षांकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे १६ सभासद यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम घटनानियम १२ ला अनुसरून पुढीलप्रमाणे राहील.

१. वरील पदाकरिता पाठवावयाच्या नामनिदर्शक पत्रिका निर्वाचनाधिकाऱ्याचे नावे केंद्रीय कार्यालयात दि. १५ जानेवारी १९६८ सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोचावयास पाहिजेत. मतदारांच्या सूचीतील कोणत्याही व्यक्तीस सभासदांची सूची (अ) (दुरुस्त्यां-सहित) मधील कोणत्याही व्यक्तीचे नाव तिच्या लेखी अनुमतीसह सुचविता येईल.

२. नामनिदर्शक पत्रिकेचा नमुना केंद्रीय कार्यालयात मिळेल. नामनिदर्शक-पत्रिका-नमुन्याच्या शेवटी दिलेल्या टीपेतील सूचना बंधनकारक राहतील.

३. दि. १६ जानेवारी १९६८ ला सायंकाळी ६ वाजता संघाचे केंद्रीय कार्यालयात उमेदवारांच्या नामनिदर्शक—पत्रिकांची छाननी करण्यात येईल. ह्यावेळी उमेदवारांना किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

४. दि. २२ जानेवारी १९६८ ला सायंकाळी ६ वाजेपर्यंत कोणत्याही उमेदवारास आपली उमेदवारी लेखी बिनशर्त मागे घेता येईल. त्यानंतर योग्य प्रकारे नामनिर्दिष्ट झालेल्या उमेदवारांची यादी निश्चित करून ती केंद्रीय कार्यालयात प्रकाशित करण्यात येईल.

५. दि. १७ फेब्रुवारी १९६८ रोजी सायंकाळी ६ नंतर केलेले मतदान वैध होणार नाही.

६. निवडणुकीचे कार्यवाहीचे दृष्टीने वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सूचनाही बंधनकारक राहतील.

७. दि. १८ फेब्रुवारी १९६८ ला सकाळी ८ वाजेपासून मतमोजणी सुरू होईल. मतमोजणीच्या वेळी उमेदवारांना किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

टीप—निवडणुकीसंबंधीचा सर्व व्यवहार 'निर्वाचनाधिकारी' विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १, ह्या पत्त्यावर करावा. अन्य पत्त्यावर केलेल्या व्यवहाराची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

नागपूर
दि. ३० डिसेंबर १९६७

म. ना. परांजपे
निर्वाचनाधिकारी, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक :
मा. नी. गलगलीकर

वर्ष २२] जानेवारी १९६७ [अंक ८

सौभद्रातील समाजदर्शन

—भवानीशंकर नियोगी

एक अलौकिक नाटयकृती म्हणून सौभद्राचा नावलौकिक आहे. त्या लौकिकात भर घालील असा तत्कालीन समाजदर्शनाचा एक फार मोठा गुण त्यात आहे. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या प्रतिभेत सौभद्राच्या निर्मितीचे बीज अठराशे एक्यांयशी-ब्यांयशीच्या सुमारास रुजले आणि ब्यांयशीत त्याचा वृक्ष होऊन त्याला फळे आली. सौभद्राच्या प्रस्तावनेत स्वतः अण्णांनी ही माहिती दिली आहे.

अण्णांनी अठराशेऐंशीत 'शाकुंतले'चे प्रयोग केले. त्यावर सहा डिसेंबर अठराशेएक्यांयशीच्या 'केसरी'त विष्णु कृष्ण चिपळुणकर यांचा लेख आहे. ते सांगतात, "ही नवीन टूम रा. किर्लोस्कर यांनी गेल्या साली काढली. इंग्लंडात 'आपरा' या नावाचा एक नाटयप्रकार आहे. त्याचाच नमुना वरील गृहस्थाने इकडे सुरू केला आहे. गायन हे मनुष्यमात्रास किंबहुना पशुकोटीतील प्राण्यांसही स्वभावतःच अत्यंत प्रिय आहे. तोच प्रकार या संगीताच्या योगाने सिद्ध होणार आहे. म्हणून त्यांचे आम्ही अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो."

'केसरी' एक्यांयशीत निघाला. सत्यांयशीपर्यंत त्याच्या संपादनाची सूत्रे सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर यांच्या हाती होती. तोपर्यंत 'केसरी'चे स्वरूप द्विविध होते. त्यात राजकीय लेखांच्या जोडीला सामाजिक लेख असत. त्यावेळी समाजात रूढ विवाहविधी, एकत्र कुटुंब, बहुजनांचे गतानुगतिकत्व, अंधश्रद्धा, सोवळयाओवळयाचा अतिरेक इत्यादी सामाजिक विषयांचा ऊहापोह चालू होता. या विषयांवर पुढे आगरकरांनी 'सुधारका'त स्वयंवर, प्रियाराधन, वल्लभानुनय, विभक्त व अविभक्त कुटुंबपद्धती, सोवळयाओवळयाची मीमांसा इत्यादी लेख लिहिले आहेत. अण्णांच्या सौभद्राचे कथानक पौराणिक आहे. परंतु अण्णांनी ते याच सुमारास रचले असल्यामुळे त्यात वरील सामाजिक प्रश्नांचे पुसट पडसाद अधून मधून उमटले आहेत. कदाचित् त्यामुळेही तत्कालीन समाजाला सौभद्र विशेष प्रिय झाले असावे. आजच्या समाजजीवनातही ते सूर कानी पडतात. त्यामुळे सौभद्राची लोकप्रियता आजदेखील यत्किंचित् कमी झालेली नाही.

शरदऋतूत एखादी निवळलेली नदी स्वेच्छ वाहत असावी; आणि तिच्या स्वच्छ पाण्यात तीरावरील वनश्रीचे प्रतिबिंब हेलकावत असावे आणि त्यामुळे तिचे स्वाभाविक सौंदर्य विशेष खुलून दिसावे तसा प्रकार सौभद्राच्या बाबतीत झाला आहे. तीरावरील वनश्रीचे प्रतिबिंब आपल्या पाण्यात दाखविण्याचा नदीचा हेतु नसतो; किंबहुना तिला त्या वस्तुस्थितीची कल्पनाही नसते, त्याप्रमाणे अण्णांना न कळत सौभद्रात त्यांच्या काळाचे प्रतिबिंब उमटले आहे.

जो प्रतिभासंपन्न असतो त्याच्याकडून कलाकृती न कळत घडत असते. आपल्याकडून ती घडली कशी याविषयी त्याचे त्यालाच आश्चर्य वाटत असते. अशा निसर्गसिद्ध कलाकृतीत कित्येकदा समीक्षकांना कालविपर्यासाचा दोष आढळतो. वस्तुतः तो दोष म्हणजे कलाकृती घडत असताना कलाकाराची वृत्ती किती दिक्कालातीत असते, या गुणाची साक्ष असतो. सौभद्र निर्माण होत असताना अण्णांचे कलावंत मन असेच काही वेळ दिक्कालातीत झाले असावे. आपले नाटक पौराणिक आहे याचे त्यांना भान राहिले नसावे. म्हणून न कळत सौभद्रात तत्कालीन सामाजिक वातावरणाची पुसट पडछाया पडली असावी.

सौभद्राचा आरंभ उपवर कन्येच्या विवाहाच्या समस्येने झाला आहे. उपवर मुलीचा विवाह ही समाजासमोरील एक सनातन समस्या आहे. 'झाली ज्याची उपवर दुहिता ! चैन नसे त्या तापवि चिंता' या नटीच्या पदाने सौभद्राची सुरवात झाली आहे. त्या पदात मुलीचे लग्न कसे जुळेल केवळ एवढीच समस्या नाही. तिच्या जोडीला मातापिता असलेला, कुलीन, मदनासारखा सुंदर, लोकप्रिय, वैभवशाली आणि गुणवान ज्ञानी वर कसा मिळेल या आकांक्षा आहेत; आणि कर्मधर्मसंयोगाने त्या पूर्ण झाल्या, तरी मुलगी पुढे सासरी कशी वागेल आणि तिथे सासू, सासरा, दीर, जावा व नणंदा या तिच्याशी प्रेमाने वागतील की तिला टोचून टोचून छळतील या शंका आहेत. आजच्या युगाच्या विशिष्ट परिस्थितीत या शंका पुष्कळ प्रमाणात कमी झाल्या असल्या, तरी मुलीच्या आईच्या आकांक्षा मात्र तशाच कायम आहेत. त्या पुष्कळ वेळा समस्या अधिक बिकट करतात.

वस्तुतः विवाहसमस्या ही केवळ मुलीच्या विवाहाची नसते. मुलीचा विवाह मुलाशी होतो. तेव्हा ती मुलामुलींच्या विवाहाची समस्या असते. परंतु मुलगा विवाहावाचून राहिला तरी चालेल, मात्र मुलगी ही उजवली गेलीच पाहिजे ही सामाजिक भावना या समजुतीच्या मुळाशी असावी. आजच्या जीवनात वधुवरसूचक मंडळाच्या जाहिराती दृष्टीस पडतात. त्यांतदेखील वरापेक्षा वधूंच्या जाहिराती संख्येने अधिक असतात. सौभद्रातील सूत्रधार 'कन्येपूर्वी तिच्या पतीतें विधि निपजवितो भार्ये !' या शब्दात अधीर नटीला धीर देण्याचा प्रयत्न करतो आणि पुढे तिला मुलीचे लग्न निश्चित झाल्याचे सांगतो. तेव्हा ती उत्सुक होऊन पृच्छा करते, 'द्रव्य किती दिले ? दिवस किति वया ?' आजदेखील हुंडा आणि वधुवरांची वये यांचे महत्त्व कायम आहे. क्वचित् वयाकडे दुर्लक्ष दिसते इतकेच !

जिच्यात 'प्रेमविवाह' आणि 'स्वयंवर' या आगामी युगातील आनंददायक घटना आहेत अशी सुभद्राहरणाची पौराणिक कथा निवडून अण्णांनी एका धोंड्याने दोन पक्षी पाडले आहेत. या दोन्ही विवाहप्रकारांना पाउणशे वर्षांपूर्वीची सामाजिक परिस्थिती अनुकूल नव्हती. त्यामुळे अण्णांनी सुभद्रेच्या अक्षरासारखे अक्षर काढून श्रीकृष्ण अर्जुनाला 'श्रीमत्सकल गुणैश्वर्यमंडित मत्प्राणवल्लभ पार्थराज' हे प्रेमपत्र पाठवितो अशी हिकमत लढवली आहे. सौभद्राच्या शेवटी अर्जुन सुभद्रेला हे प्रेमपत्र दाखवितो तेव्हा ती म्हणते.—"हे अक्षर माझ्या अक्षरासारखे आहे; पण हे मी लिहिले नाही." त्याबरोबर कृष्ण प्रवेश करतो; आणि खुलासा करतो,—"तुझ्या अक्षरासारखे अक्षर काढून हे पत्र मी लिहिले. समजलीस ?" आज पाउणशे वर्षांनंतरच्या बदललेल्या परिस्थितीत पुष्कळ वेळा अलिकडल्या सुभद्रा स्वतःच प्रेमपत्रे लिहू लागल्या आहेत. आता त्यासाठी कृष्णाची गरज उरलेली नाही. परंतु प्रेमपत्राचा उपयोग साक्षीपुरावा म्हणून पुष्कळदा प्रतिकूल होण्याचा संभव असतो इकडे त्यांचे लक्ष

नसते. अण्णांना प्रेमपत्राची कल्पना 'रुक्मिणीस्वयंवरा'-वरून सुचली असावी. सौभद्रात एका ठिकाणी अण्णांची मर्यादशील सुभद्रा जरा अगाऊ असलेल्या रुक्मिणीला खोचदार प्रश्न करते,—"वहिनी! तुझ्या भावाने तुला शिशुपालाला देऊ केली होती. तो काय रूपाने, पराक्रमाने किंवा ऐश्वर्याने कमी होता म्हणून तू चोरून ब्राह्मणाच्या बरोबर पत्र पाठवून कृष्णाला वरलेस?" सुभद्रेच्या या प्रश्नाने रुक्मिणी निरुत्तर होते.

अण्णांच्या वेळी 'प्रेमविवाह' आणि 'स्वयंवर' हे प्रकार समाजाला मान्य नव्हते. परंतु निदानपक्षी वराच्या बाबतीत वधूची आवडनिवड अवश्य लक्षात घेतली पाहिजे या अर्थाची चर्चा समाजात चालू होती. परंतु त्याकाळी वधु जशी अबल, अगतिक आणि पराधीन होती तशीच ती आजही आहे. सौभद्राच्या मूळ पौराणिक कथेत अर्जुन सुभद्रेचे हरण करतो आणि ती त्याच्याबरोबर पलायन करते अशी घटना आहे. परंतु अण्णांच्या सुभद्रेला अण्णांच्या वेळच्या सामाजिक परिस्थितीची जाणीव आहे. विवाहाचा मुहूर्त टळावा आणि सुभद्रेचा विवाह दुर्योधनाशी लागू नये म्हणून कृष्णाच्या सल्लामसलतीने मायावी घटोत्कच मूर्च्छित सुभद्रेला द्वारकेबाहेर दूर अरण्यात नेतो. त्यावेळी भानावर येऊन ती उद्गारते,—"या जळळचा लग्नाचे जमल्यापासून मला एकान्त असा मिळालाच नाही. देवा! काय मजवर हा कहर चालवला आहेस? हाय! हाय! हे काही माझ्याने सहन करवत नाही. दादा, वहिनी आदिकरून सर्वजण मला म्हणतील, तू खास मुहूर्त चुकविण्याकरिता हे साहस केलेस," रुक्मिणीच्या भाषणातही या सामाजिक परिस्थितीचे सूर आहेत. ती म्हणते,—"वन्सं, तुम्ही ऐन लग्नाच्या वेळेस नाहीशा झाल्या असे ऐकले आणि जे मला झाले ते काही सांगवत नाही. मला बसलेली जागा सोडवून काही उठवेना व शब्दही माझ्या तोंडून निघेना. मनात भलभलत्या कल्पना येऊ लागल्या, काय सांगू तुम्हाला. तशी वेळ वैऱ्यालाही येऊ नये." आजदेखील समाजातील कुणीही व्यक्ती रुक्मिणीप्रमाणेच उद्गार काढील. मात्र 'पलायन' आज फारसे अमान्य नाही. पण 'हरण' कायद्याच्या कचाट्यात सापडत असल्याने त्याच्या वाटेस कुणी जात नाही.

अर्जुनाचे सुभद्रेवर आणि सुभद्रेचे अर्जुनावर प्रेम आहे. त्या प्रेमाची खूण म्हणून सुभद्रेने अर्जुन द्वारकेत असताना एका शेल्यावर आपल्या हाताने कशिदा काढून त्यावर त्याचे नाव घालून त्याला मोठ्या ममतेने दिला होता. शेल्यावर तिने वेलबुट्टी काढलेली होती; आणि मधून मधून पक्षी काढले होते; ते आताच उडतील की काय असे वाटत होते. त्याचवेळी अर्जुनाने आपल्या गळ्यातील रत्नमाला काढून ती सुभद्रेच्या गळ्यात आपल्या हातांनी घातली होती. आजच्या युगातही ज्यावर 'लव्ह मी' किंवा 'फरगेट मी नॉट', अशी अक्षरे कोरली आहेत असे चहाचे कप पुढे ठेवण्याचे किंवा हातरुमाल 'मॅरेज प्रेझेंट' म्हणून नजर करण्याचे प्रकार अनोखे अथवा नवखे नाहीत. मात्र कायद्याच्या क्षेत्रात कित्येकदा प्रतिस्पर्धी त्यांचा दुरुपयोग करतात. अर्जुन आपल्या व सुभद्रेच्या प्रेमाबद्दल नारदाला सांगतो, "फार दिवसांपासून आम्हां उभयतात प्रेम वाढून ऐन फलप्राप्तीच्या वेळी आम्ही एकमेकांस अंतरलो. तर महाराज! माझ्या प्रिय भ्रात्यांना हा सर्व वृत्तांत सांगून माझा शेवटचा निरोप कळवा की, मी कोणत्याही साधनाने प्राणत्याग करणार!" यावर नारद अर्जुनाला त्रिदंडी संन्यास घेण्याचा सल्ला देतो; आणि तोही वेषांतराच्या चमत्कारिक प्रकाराचा अवलंब करतो. आजदेखील प्रेमात निराशा झाल्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त झालेले पागल काही थोडेथोडके आढळत नाहीत. त्यांना परावृत्त करण्यासाठी नारदासारखे समजुतदार समाजसेवक हवे. आजच्या जगातही 'तो मी नव्हेच!'—सारखे वेषांतराचे प्रकार अधून मधून ऐकू येतात. परंतु त्यात प्रतारणा असल्यामुळे त्यांचा अंतर्भाव कायद्याच्या बंधनात होतो.

अण्णांच्या वेळी महाराष्ट्रातील मध्यम वर्गीयात समाईक कुटुंबपद्धती होती. त्यामुळे घरात व बाहेर वडिलधाऱ्यांसंबंधी आदरभाव होता. घरातील लहानसान मंडळी थोरामोठ्यांबद्दल पूज्यबुद्धी बाळगीत आणि त्यांची मानमर्यादा राखीत. सुभद्रा अस्वस्थ आहे. म्हणून बलराम व कृष्ण तिची प्रकृती पाहण्यास येतात. तेव्हा ती आपल्या भावांना आणि दासींना उद्देशून उद्गारते—"दादा, कृष्णा, अरे, असे उभे कां? बसावयाचे नाही कां? काय, येथे दोघी असून त्यांना

बसायला आसनें देण्याचें सुद्धां कळत नाही." 'गुरुजी तुमच्या प्रीतिस पार नसे' या पदात श्रीकृष्ण देखील गर्गमुनींविषयी आपला पूज्यभाव व्यक्त करतो. बलरामाविषयी आदर प्रकट करताना तो एका ठिकाणी म्हणतो,—"मी त्या गंगाजलाप्रमाणे निर्मळ मनाच्या पुरुषाशी असे कपटाचरण करतो आहे ना?" नाटकाच्या शेवटी मायावी घटोत्कच प्रवेश करतो आणि अत्यंत आदराने म्हणतो,—"अर्जुनकाका! सुभद्राकाकी! उभयतांच्या चरणी हा बालक घटोत्कच वंदन करतो." आज समाजात विभक्त कुटुंबपद्धती झपाट्याने अस्तित्वात येत असल्यामुळे आदरभावनेचा हळूहळू लोप होत आहे.

समाईक कुटुंबपद्धतीत सर्वांदेखत स्वतःच्या पत्नीशीही बोलण्याची मोकळीक नसे. स्वतःचे दुःख वडिलधाऱ्या मंडळीसमोर सांगण्याचीही सोय नसे. फार तर ते आपल्या समवयस्काजवळ सांगता येत असे. आपला विवाह अर्जुनाशी व्हावा हे सुचविताना सुभद्रा रुक्मिणीला म्हणते,—"हे बघ वहिनी, तू मनावर घेऊन कृष्णाच्या मनात चांगले भरवून दिलेस म्हणजे पुरे आहे. तो मग हव्या त्या रीतीने माझ्या मनासारखे करील." सुभद्रेच्या इच्छेप्रमाणे रुक्मिणी कृष्णाजवळ तिचे साचिव्य करते. पण ते त्या दोघांचा एकान्त होतो तेव्हा. ती कृष्णाला म्हणते,—"या वन्संच्या लग्नाचा एक घोटाळाच होऊन गेला आहे. भावजींचा ओढा पहिल्यापासून कौरवांकडे आहे. तेव्हा त्यांना तेच स्थळ चांगलेसे दिसते खरे; परतु ज्यांना म्हणून तेथे नांदायचे आहे, त्यांचा नको का विचार पाहायला? त्यांतून त्या काही लहान नाहीत, आपले कल्याण अकल्याण त्यांना कळते. मग असे कां बरे? आपणास तरी काय दहा पांच वहिणी आहेत? एकुलती एक सोन्यासारखी वहीण, तिचा हा असा प्रकार केला, तर या शहाणपणाचा उपयोग काय? या जन्माच्या गाठी आहेत. त्या विचारानेच घातल्या पाहिजेत; भावजींनी आपला हट्ट सोडला नाही, आपण आपले उदासीन बसलां नी त्यांनी आपल्या जिवाला भलते-सलते करून घेतले तर?" यावर कृष्ण रागावल्यासारखे करून म्हणतो,—"पुरे, पुरे, मी सारे समजलो. तुझ्या मनातून माझा व दादांचा बिघाड यावा व स्वतंत्रपणे आपण निराळे रहावे. खरोखर, प्रपंचांत जे बंधूबंधूचे वाकडे पडते, याला कारण स्त्रियाच, यांत संशय नाही." यावरून उपवर मुलीची वराविषयीची आवडनिवड आणि एकत्र कुटुंब पद्धतीबद्दल विभक्त कुटुंबपद्धतीचे समर्थन या प्रश्नांना समाजात तोंड फुटले होते हे उघड आहे. आज मुली शिकलेल्या सवरलेल्या आणि वयात आलेल्या असल्यामुळे वराच्या निवडीबाबत त्यांची पसंती नापसंती आवश्यक झाली आहे. त्याचप्रमाणे वैयक्तिक विकास आणि आर्थिक परिस्थिती यांमुळे एकत्र कुटुंबपद्धती मोडकळीस आली आहे.

अण्णांच्यावेळी समाजात सोवळ्या ओवळ्याचे फाजील स्तोम होते. वस्तुतः त्यांच्या मुळाशी स्वच्छता-स्वच्छतेच्या कल्पना आहेत. परंतु काळाच्या ओघांत त्या मूळ कल्पना लुप्त झाल्या आणि त्यांना निव्वळ कोरड्या आचाराचे नसते महत्त्व आले. त्या कोरड्या आचारविचाराला अण्णांनी हसतखेळत चिमटा घेतला आहे. रुक्मिणी तुळशीची पूजा करीत असताना वक्रतुंड विदूषक येतो. त्याला ती विचारते,—"आज स्नान इकडेच झाले वाटते?" विदूषक—"हो! आज स्वामिमहाराजांचा प्रसाद घेण्याला इकडेच आलो आहे." रुक्मिणी—"परवा भावोजींनी इतकी शोभा केली तरी अजून उशीरा स्नान करण्याची सवय गेली नाहीसे दिसते." विदूषक—"माझे प्रातःस्नान झाले होते. पण इकडे येताना वाटेत कुत्र्याच्या शेपटीवर पाय पडला. त्यामुळे पुन्हा स्नान करावे लागले." रुक्मिणी—"असे, असे, आताशा सोवळे बरेच माजले आहे तर." याचा अर्थ असा की पाउणशे वर्षांपूर्वीच सोवळेओवळे हा समाजाच्या चेष्टेचा विषय झाला होता. आता तर हे दोन शब्दही भाषेतून नाहीसे होण्याची वेळ आली आहे.

अर्जुन रैवतक पर्वतावरील एका गुहेत यतिवेषाने वास्तव्य करतो. त्या प्रसंगाच्या निमित्ताने अण्णांनी समाजातील गतानुगतिकता आणि अंधश्रद्धा यांवर अचूक बोट ठेवले आहे. वक्रतुंड विदूषक या घटनेची वार्ता कृष्णास सांगतो- 'तुला नाही का ठाऊक? हे लोक कसे मेंढरासारखे आहेत. पुढच्या एका मेंढराने खळग्यात उडी घातली की मागून सगळी पडलीच. आमचे गर्ग मुनी, ज्या गुहेत स्वामी बसले होते तेथे

गेले आणि त्यांनी स्वामिमहाराजांपुढे आपले डोके लवविले, हा पुकारा शहरात होताच मग काय विचारता? टोळधाडीप्रमाणे लोकांचे थवेच्या थवे येऊन कोसळले. कोणी संतति, कोणी संपत्ति, कोणी आरोग्य अशाविषयी स्वामीस विचारताहेत. कोणी नुसतेंच दर्शन घेऊन काही फळफळावळ पुढे ठेवताहेत, असा धुमाकूळ माजून राहिला आहे.' 'लाल शालजोडी जरतारी झोकदार शिरि बांधोनि,' या कृष्णाच्या पदात अण्णांनी त्यांच्या वेळच्या ऐटबाज 'बुवा'चे हुबेहूब वर्णन केले आहे. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' ही म्हण काही खोटी नाही, अनादिकाळापासून पिढयान्‌पिढया समाजात 'बुवां'चे पीक येत आहे; आणि 'ब्रह्म तिथे माया' व 'बुवा तिथे बाया' या म्हणींची लोकांना यथार्थता पटवीत आहे. आजदेखील केडगाव, शिर्डी, साकोरी, शेगाव इत्यादी केंद्रांचे महत्त्व चढते वाढते आहे. सुमारे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी दिवेकर शास्त्र्यांनी 'किर्लोस्करा'तून बुवाबाजीवर वडगा उगारला होता. पण त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. मनुष्य अपूर्ण आहे. त्यामुळे तो अंधश्रद्ध असतो. केवळ अडाणीच अंधश्रद्ध नसतात. चांगले शहाणेसुर्ते देखील अंधश्रद्ध असतात.

समाजाच्या भोळेभावडेपणाचा आणखी एक पुरावा म्हणजे त्याचा चेटकानाटकावरला विश्वास होय. जादूटोणा करणाऱ्या अदृश्य शक्ती अंतराळात संचार करीत असतात अशी एक पुरातन समजूत आहे. या युगातदेखील ती कुठे कुठे दृष्टीस पडते. भोळ्याभावड्या निष्कपट बलरामाला गर्गमुनि सांगतात— 'यक्षकिन्नर जातीपैकी यक्षिणी ह्या मोठ्या प्रबल आणि मायावी स्त्रिया अंतरिक्षात वास करीत असतात. त्या एखाद्याच्या विवाहाच्या वेळी असा चमत्कार करीत असतात. तेव्हा त्यांची काही तरी शांति झाली पाहिजे.' आणि त्या म्हणण्यावर तो साधा सरळ गडी विश्वास ठेवतो. 'माझा रोग कोणता याची परीक्षा न करता भलतेच उपचार केले तर काय होणार!' असे सुभद्रा म्हणत असतानादेखील तो कृष्णास म्हणतो,— 'रैवतक पर्वताच्या गुहेत एक महासमर्थ वैराग्यशाली यति येऊन राहिला आहे. गर्गमुनींनी त्याचे चरणतीर्थ व हा एक ताईत त्या यतीजवळून करून घेऊन मजजवळ दिला आहे; आणि सांगितले आहे की, हे तीर्थोदक सुभद्रेच्या देहावर सिंचन करावे व ताईत तिच्या उजव्या हातात बांधावा, म्हणजे ती सर्व भयापासून मुक्त होऊन तिची प्रकृति पूर्ववत् होईल.' आजच्या जगातदेखील चेटुकमाटुक करणारे, त्यावर विश्वास ठेवणारे आणि त्याचा दुष्परिणाम टळावा म्हणून अंगारेधुपारे करणारे व गंडेदोरे बांधणारे बुळेबावळे पुष्कळ आहेत.

समाजात पूर्वीपासून पुरुषांचा वरचष्मा आहे. 'हे बघ, त्या यतीपाशी जो स्त्री-पुरुषांचा घोळका जमला होता, त्यात आमचे कुटुंबही होते. काय सांगू, सटवीने टोपलीभर नारिंगे ओतून नमस्कार केलान्. मी त्या वेळेस तिला ओळख दिली नाही, परंतु असा राग आला होता की, या दंडकाष्ठाने त्या यतीची पाद्यपूजाच करावी!' विदूषकाच्या या भाषणात आजच्या 'नवरेशाही'ची थोडीफार चुणूक आहे.

अण्णा प्रस्तावनेत लिहितात, 'आपल्या पुराणातील एखादा इतिहास घेऊन त्यावर स्वकपोलकल्पित रचना करावी असा विचार मनात ठसला. नंतर तसे इतिहास पुष्कळ मनात येऊन हा अर्जुनसुभद्राविवाहाचा इतिहास सर्वप्रकारे ठीकसा वाटल्यावर यथामति त्यास नाटकरूप देऊन हे संगीत सौभद्र तयार केले.' अर्थात् ते तयार करताना अण्णांची प्रतिभा न कळत आपल्या काळाशी समरस झाली. सौभद्राचे कथानक गुजरातच्या भूमीतील असल्याने अण्णांनी एके ठिकाणी सौराष्ट्रातील सोमनाथाचा व दुसऱ्या ठिकाणी बडोद्याच्या 'लक्ष्मीविलास' मंदिराचा उल्लेख केला आहे. त्या सुमारास बहुधा ते विलासमंदिर प्रसिद्धी पावले असावे. 'यतीला उतरण्याला पाठशाळा द्यावी' असे एके ठिकाणी कृष्ण बलरामाला सुचवितो. त्या सूचनेतही तत्कालीन व सद्यः परिस्थितीची विनोदपूर्ण छाया आहे. सौभद्राचे भरतवाक्य तर सर्व दृष्टींनी अण्णांच्या काळाचे सूचक आहे. 'केसरी'च्या पहिल्याच अंकात 'देशोन्नति' हा वि. कृ. चिपळुणकरांचा लेख त्याकाळी प्रसिद्धी पावला होता;

> **वसो नृपतिच्या मती सदयता, सनाबुद्धि ती**
> **प्रजाजनहि सुग्रसे करुन आत्मदेशोन्नती,**
> **सुकाव्यरचनी असो सुलभ ती कवींना मती,**
> **स्वयंभु सकला जनां निपजवो सुकाव्यीं रती.**

'शिवाजीचे उद्गार'— एक ऐतिहासिक महत्त्वाची कविता

—डॉ. वि. बा. प्रभुदेसाई

एक दिवस आमच्या घरातील जुन्या पोथ्या व कागदपत्र चाळून पाहात असताना, एका कागदावरील कवितेने माझे चांगलेच लक्ष वेधून घेतले. त्या कवितेचे शीर्षक '**शिवाजीचे उद्गार**' असे असून कवितेच्या खाली तिच्या कर्त्याचे गूढ नाव दिले आहे ते बरीच उत्सुकता निर्माण करणारे. ते नाव म्हणजे '**निशाणी भवानी तलवार**' हे होय. मला प्रथमत: ज्या कागदावर ही कविता वाचायला मिळाली त्या कागदावर 'आठ सप्टेंबर १८९७' असा दिनांक घातलेला आढळला. पण, हा कवितेच्या मूळ प्रकाशनाचा दिवस नसून तो मूळ कविता नकलून घेतल्याचा निदर्शक असावा, असे नंतर उपलब्ध आलेल्या माहितीवरून म्हणावे लागते.

'शिवाजीचे उद्गार' ही कविता वाचल्यावर, तिचा उद्देश, राजकीय पारतंत्र्याविरुद्ध उघडपणे असंतोष निर्माण करणे हाच आहे, याबद्दल शंका रहात नाही. अशी ही आशयाच्या दृष्टीने अत्यंत स्फोटक असलेली कविता, पोर्तुगीजांसारख्या धर्मांध व जुलुमी राजकर्त्यांच्या जोखडाखाली अनेक शतकेपर्यंत जखडल्या गेलेल्या गोमंतकातील एका लहानशा खेड्यात (जुन्या कागदपत्रांत) आढळावी, याचे मला विशेष नवल वाटले. अशा प्रकारे कुतूहल जागृत होऊन, प्रस्तुत कवितेसंबंधी अधिकाधिक माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला, तेव्हा ती कविता शिवाजी महाराजांप्रमाणेच दुसऱ्याही एका अखिल भारतीय कीर्तीच्या महापुरुषाच्या जीवनाशी संबंधित आहे, असे दिसून आले.

'शिवाजीचे उद्गार' ही कविता प्रथमत: 'केसरी' च्या मंगळवार ता. १५ जून १८९७ च्या अंकात (पृष्ठ २ वर) प्रसिद्ध झालेली असून लोकमान्य टिळकांवर भरण्यात आलेल्या इ. स. १८९७ च्या सुप्रसिद्ध राजद्रोहाच्या खटल्यात एक विरोधी पुरावा म्हणूनही ती दाखल करण्यात आलेली होती. प्रा. न. र. फाटक यांनी पुरविलेल्या तोंडी माहितीवरून, प्रस्तुत कवितेचे कर्तृत्व सुप्रसिद्ध क्रांतिकारक दामोदर हरि चाफेकर यांच्याकडे जाते, असे म्हणावे लागेल.

लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनाने महाराष्ट्रात १८९६ साली सुरू करण्यात आलेल्या शिवाजी महाराजांच्या वार्षिकोत्सवाच्या व रायगडावरील छत्रपतींच्या समाधीच्या जीर्णोद्धाराविषयीच्या चळवळीच्या संदर्भातही प्रस्तुत कवितेचा निर्देश केला जातो. ही सगळी पार्श्वभूमी यथार्थपणे जाणून घेण्याच्या दृष्टीने, साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या 'लोकमान्य टिळक यांचे चरित्र' या ग्रंथातील पुढील उताऱ्याकडे लक्ष वेधावेसे वाटते.

"ता. १ जून १८९७. केसरीत विभूतिपूजा या विषयावर एक सुंदर सोपपत्तिक अग्रलेख टिळकांनी लिहिला. ठिकठिकाणी शिवजन्मोत्सव झाल्याची पत्रे येत होती व या साली पदवीधर व इतर सुशिक्षित लोक या उत्सवात वरेच पडले होते. यामुळे उत्सवाला काही पद्धतशीर स्वरूप येईल अशी आशा वाटू लागली होती. इंग्रजी राज्यात राजकीय उत्सव बंद पडले पण या ऐतिहासिक विभूतीचे पूजन करण्याची तरी संधी या राज्यात मिळल्याबद्दल केसरीने आनंद प्रदर्शित केला होता . . . पुण्यात प्रथमपासून जन्मोत्सव न होता राज्याभिषेकोत्सवच होत असे. यंदा उत्सव ता. १२ जून

अनुक्रमणिका

रोजी लकडीपुलाजवळील विठ्ठल मंदिरात सुरू झाला. प्लेगची दुःखे भोगून उरल्यामुळेच की काय त्या सालचा उत्सव विशेष थाटाचा झाला. स्तुतिपर पद्ये झाल्यावर प्रो. शिवरामपंत परांजपे यांचे पुराण झाले. विषय राजसूय यज्ञ व शकुनि–धृतराष्ट्र संवाद हा होता. 'असंतोषः श्रियो मूलम्' व संतोषास्तु श्रियो हन्ति' ही त्यांची आधारवचने होती प्रो. जिनसीवाले यांनी सांगितले की शिवाजीचा पराक्रम हा महत्त्वाकांक्षेचा प्रभाव नसून स्वदेश व स्वधर्म यांची धुळधाण झालेली पाहून आलेल्या चिडीचा तो प्रभाव होता. दुसरे दिवशी विंचुरकरांचे वाड्यात मर्दानी खेळ झाले. रात्री टिळकांच्या अध्यक्षतेखाली प्रो. भानू यांचे अफजुलखानाचा वध या विषयावर व्याख्यान झाले. त्यात खुनाच्या आरोपापासून त्यांनी शिवाजीचा बचाव केला. जिनसीवाले यांनी नेपोलियन, सीझर यांच्या हातून झालेल्या मनुष्यवधांचा दाखला देऊन इतिहासकारांनी या दोघांना जसे निर्दोषी ठरविले तसेच अफजुलखानाच्या वधासंबंधाने शिवाजीसही निर्दोषीच ठरविले पाहिजे (असे सांगितले ?). उपसंहारादाखल टिळकांनी भाषण केले. त्यात या वधातील सात्त्विक बुद्धीचा निर्देश करून वर्षातून एक दिवस सर्व लोकांनी शिवाजीचा उत्सव करण्यास जमावे अशी सूचना केली होती. ता. १५ जूनच्या अंकातच **निशाणी भवानी तलवार** या सहीने व **शिवाजीचे उद्गार** या मथळ्याने कोणा एका गृहस्थाने कविता पाठविल्या त्या छापल्या होत्या. त्यांत विभूतिपूजनास उत्तेजन असून शिवाय तत्कालीन राजकीय अन्याय व दुःखे यांचाहि पाढा वाचला होता. लगेच टिळकांच्या एका शत्रूने जस्टिस या टोपण नावाने मुंबई टाईम्सला पत्र लिहून केसरीतील उत्सवाची हकीकत, त्यावरील स्फुटे वगैरेमधून काही निवडक वाक्ये घेऊन त्याचे भाषांतर सढळ हाताने करून या उत्सवातील भाषणांत राजद्रोह भरलेला आहे असे ध्वनित केले होते." **(न. चिं. केळकर, लोकमान्य टिळक यांचे चरित्र**, पूर्वार्ध, पुणे १९२३, पृ. ५४१)

लोकमान्य टिळकांवर भरण्यात आलेल्या १८९७ च्या राजद्रोहाच्या खटल्यात सरकारपक्षातर्फे पुरावा म्हणून 'केसरीत' प्रसिद्ध झालेले अनेक लेख ज्याप्रमाणे सादर करण्यात आले त्याचप्रमाणे शिवाजीचे उद्गार ही कविताही इंग्रजी भाषांतरासह सादर करण्यात आली होती. यासंबंधीचा निर्देश करून अॅडव्होकेट जनरल लँग हे त्यावेळी न्यायाधिशांसमोर म्हणाले होते,

"केसरीच्या लिहिण्याने अमुक एका इसमाच्या मनात प्रत्यक्ष अप्रीति उत्पन्न झाली असे सिद्ध करण्याचे कारण नाही. ती होण्याचा संभव असेल तरी पुरे आहे. सरकार उलथून पडावे, किंवा सरकारला अडचळा व्हावा अशी संधी पहात बसावे, अशी बुद्धी वाचकांच्या मनात लेखांनी उत्पन्न झाल्यास ते लेख राजद्रोही ठरू शकतील ......शिवाजीच्या उत्सवात गैर काही नाही. पण त्याला राजकीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उत्सवाची संधी साधून सरकारविषयी अप्रीती उत्पन्न केली आहे. ब्राह्मणांचा छळ, गोवध, लंकेतल्या राज्याचा वानरांनी केलेला विध्वंस, शिवाजी फिरून जन्मास येण्याविषयी प्रार्थना, इत्यादि उल्लेख काय दर्शवितात ? ....हिंदुस्थान पैशाने गरीब झाले असे इतरही काही लोक म्हणतात. पण ते **शिवाजीच्या उद्गारांसारखी** भाषा बोलत नाहीत. दारिद्र्यावरोबर धर्मच्छलाचीही तक्रार केली आहे. गोरे लोक खोट्या सबबीवर खटल्यांतून सुटतात, या राज्यात बायकांची अमर्यादा होते, असेही दर्शविले आहे. शिवाजीच्या वेळी हजारो तलवारी बाहेर निघत अशा शब्दांमुळे, दाद लावून घेणे या उपायाला सौम्य अर्थ राहात नाही." **(लो. टि. यांचे चरित्र, उ. नि.**, पृ. ५६७–६८).

पुण्यातील त्यावेळचे प्लेगचे मुख्य अधिकारी रँडसाहेब यांच्या चाफेकरांनी केलेल्या खुनाविषयीचा सविस्तर वृत्तांत देऊन झाल्यावर तात्यासाहेब केळकर आपल्या टिळक–चरित्रात लिहितात, "चाफेकरासंबंधाची ही हकीगत सांगण्याचा मुख्य मुद्दा असा की, टिळकांचा खटला सेशनात निघण्यापूर्वीच खुनाचा पत्ता पोलिसांना पक्का लागल्यामुळे, टिळकांविषयीचा गैरसमज निघून गेला; व त्यांची तुरुंगात रवानगी झाल्यापासून काहीतरी करून त्यांची सुटका करावी असे कोणी कोणी लोक बोलू लागले. तसेच '**भवानी तलवार**' अशी सही घालून केसरीत छापलेले '**शिवाजीचे उद्गार**' जरी राजद्रोही ठरले होते व '**भवानी तलवार**' या नावाच्या पुस्तकाचा जारीने शोध चालू होता, तरी लवकरच नेटिव्ह प्रेस रिपोर्टर गोपाळराव साठे यांनी या पुस्तकावर दिलेला सरकारी अभिप्राय प्रसिद्ध झाला त्यावरून देशाभिमान व राजद्रोह या दोन

च नव्हत हे आपोआप सिद्ध झाले." (लो. टि. यांचे चरित्र, उ. नि., पृ. ५८०)

खटल्याच्या वेळी मूळ मराठी लेख व कविता कोर्टात सादर करताना, प्रथमतः प्रत्येक मराठी शब्द, त्या खाली त्याचा इंग्रजी प्रतिशब्द, सर्वांचा मिळून अर्थ व त्यावर सविस्तर भाष्य, अशा प्रकारे हा पुरावा सादर करण्यात आला होता. शिवाजीचे उद्गार' ही कविता तिच्या इंग्रजी प्रतिशब्दांसह मुळात जशी सादर करण्यात आली, तशीच ती मी खाली देत आहे.

शिवाजाचे उद्गार
of Shivaji Utterances

दुष्टा संहरूनी
The wicked । having destroyed ।
बहूत भुविचा तो भार केला
greatly । of the earth । the burden । did ।
कमी ।
less
देशा उद्धरिले स्वराज्य
the country । rescued । my Kingdom ।
करुनी, तारोनी धर्मास
by establishing । by saving । religion ।
मीं ।।१।।
I । delivered

झाला क्षीण बहू तया दवडण्या
Became । fatigue । great । it । for driving ।
स्वर्लोक म्यां गांठिला ।
heavenly । world । I । betook—
होतो निद्रित तों तुम्ही
was । sleeping । meanwhile । you ।
उठविलें कां लाडक्यांनों मला ।।२।।
awakened । why । dear ones । me—

पायाशुद्ध उदात्त नीति,
foundation correct । high । morality of
रणिचें तें शौर्य कर्णासम ।
the । battle-field। that valour ।Karnalike ।
देशाचा अभिमान, धाडस खरें,
of country । pride । enterprise । true ।
तें ऐक्य सर्वोत्तम ।।३।।
that । unity । best of all

ऐसे सद्गुण कल्पवृक्षचि
such । good qualities । wish fulfilling
जणूं भूमींत या लाविले ।
trees । as if । in land । this । planted—
त्यांची दावितसाल काय
their । you would be showing । why ।
मजसीं तीं गोड आतां फळें ।।४।।
to me । those । sweet । now । fruit

अरेरे ! हें काई ! दिसत पडला
Alas । this । what । appears । fallen ।
मोडून गड ।
hereing crumbled । fort—
नशीबें बैसाया मिळत मज
by fate । to sit । is available । to me ।
विच्छिन्न दगड ।।५।।
broken । stone

तसें कां जाईना हृदय
In the same way । why । not go । heart
मम हें आज फुटुनी ।
mine । this । to day । having broken
पहातों देशाचा शिव शिव अतां
I see । of the country । Shiv Shiv । now ।
नाश नयनीं ।।६।।
ruin ।

पैसा पाउससा अहो खरचिला बांधावयाते
Money । like Rain । O । spent । to build
जया
which । expanded—
ताजें तापट रक्त जेथ गळलें
fresh । hot । blood । where । split । to
संपादण्यातें जया ।।७।।
acquire । which

गेलों चालुन जेथुनी
went । attacking । whence । through
दरितुनी गर्जोनियां सिंहसा ।
vallies । roaring । like lion
किल्ले ते मम ढासळून पडले
forts । these । mine । toppling down । fell ।
विध्वंस हा कायसा ।।८।।
ruin । this । what like

अनुक्रमणिका

लक्ष्मीतें जुलुमें परस्थ छळुनी
to Laxmi । forcibly । foreigners । teasing ।
नेती करें ओढूनी
carry । by the hand । dragging—
गेली ती पळुनी सर्वें विपुलता
gone । her । running । with । plenty ।
आरोग्य ही मागुनी ॥९॥
health । also । after

दुर्भिक्षासह सर्व देश फिरते
with scarcity । whole । country । roams ।
ही दुष्ट आकावया रोगांची
this । cruel । adversity । of diseases ।
पसरोन सांथ विचरे
spreading । epidemic । stalks through ।
मृत्यू न ज्यानें दया ॥१०॥
death । no । to whom । mercy

माझा घर्म पडे जया क्षणि
my । sweat । fell । at that । moment ।
तिथें तें रक्त ज्यांचे गळे ।
there । that । blood । whose । dropped—
माझे जीव दुजे धुरंधर वदा ते
my । life । second । expert । say । they ।
हो कुठे मावळे ॥११॥
O । where । Mavle

खाती भाकर एक वेळ परि त्या तीहीं
Eat । bread । one time । but । them । even
पडेना पुरी । कष्टें
that । does not suffice । with difficulty ।
काल कठिण कंठिति घड्या बांधोनि
time । hard । pass on । folds । tying ।
पोटावरी ॥१२॥
on belly—

शांतीच्या समयी स्वधर्म अपुला
of peace । in time । one's religion । own ।
पाळोन जे राहिले त्यागोनी
preserving । who । lived । having aban-
समयास दर्भ करिंचे
doned । at times । darbha । in hand ।
शस्त्रा करीं वाहिलें ॥१३॥
weapons । in hand । took—

माझे सद्गुरू धर्मशिक्षक
Mine । good preceptors । religion teachers
जना ज्या ब्राम्हणां पाळिलें ।
people । whom । bramhins । protected—
त्यातें कैद घडोनियां,
to them । imprisonment । having happen-
जन तुम्हीं, क्षेत्रीं कसे
ed । people । you । in a sacred place । how
साहिले ॥१४॥
endured—

धात्रीभूत लहानग्यास जननी
Is foster-mother । to children । mother ।
सोडून जाते यदा ।
leaving । goes । when
मूलाधार कृपीवलां वहु
Main support । to agriculturists । great ।
असे लोकांस् जी शक्तीदा ॥१५॥
is । to people । strength-giving—

माझी माय म्हणोन गाय पुजिली
my । Mother । thinking । cow । worspi-
प्राणाहुनी रक्षुनी । तीतें
pped । beyond life । protected । to her ।
रोज चराचर चिरीती वध्यस्थली
daily । recklessly । cut । slaughterhouse ।
नेउनी ॥१६॥
carrying—

"आला धांवत नेमका अपणची
" Came । running । exactly । of himself ।
नेमांत वंदूकीच्या । "
within the range । of the Gun—
" मातें अस्वल वाटला " " सुजति
to me । bear । appeared । enlarged ।
हो यांच्या प्लिहा रोजच्या! " ॥१७॥
oh । their । spleen । daily—

गोरा लोक सुटे निरर्थ
white । men । escape । groundless ।
सबवी सांगोनिया या कसा ।
excuses । having told । these । how.
न्यायाच्या अजि मंदिरीं दिसतसे
of justice । now । in the temples । appears
अन्याय हा फारसा ॥१८॥
injustice । this । greatlike—

होती काय विशाद वक्रनयनें
was । what । significant । with improper
पाही परस्त्री . कुणी
eye । to see । another's wife । any one
म्यानातून हजार तीक्ष्ण
from the scabbards । thousand । sharp ।
असिका बाहेर ये त्या क्षणी ॥१९॥
swords । come out । that । moment—

आता अग्निरथांत संधि बघुनी
Now । in Railways । opportunity । seeing
हस्ते स्त्रियां ओढिती ।
by hand । women । drag.
षंढांनो ! करितां कसें सहन हें !
O । eunuchs । do । how । endure । this ।
लावून घ्या दाद ती ॥२०॥
get a । representation । that—

वेडा हा उचलोन यास जलदी
Mad । he । lifting up । him । quickly ।
यात्रेस द्या लावुनी । "चैनी
to pilgrimage । give । sending । pleasure
तो अधिकार घ्या मुदतीतें
seeking lhe । power । take । temporarily ।
घेतो असें सांगुनी ॥२१॥
take । such । telling—

ऐशी हाताळती आतां नृपकुलें
thus । handled । now । families of chiefs
दुर्दैव हें ओढलें ।
misfortune । this । has come.
सारे केवळ हे दळचे बुदवळचे
All । only । these । womanish । pertain-
राजे कसे जाहले! ॥२२॥
ing to chess । chiefs । how । became—

देखावा हृदया विदारिल असा पाहूं
sight । heart । will send । such । see ।
तरी मी कसा ? ।
even । at all । I । how.
नेतो दृष्टि दुजेकडे, कथुनियां
take away । sight । to another । having
संदेश बारीकसा ॥२३॥
told । message । short like—

ज्यांच्या मावळतो कधीं न रवि हा
whose । sets । ever । not । sun । this ।
राज्यावरी थोरल्या ।
over kingdom । vast.
सांगा त्या प्रभुंना सलाम तुमच्या
tell । those । rulers । compliments । your
दोस्तांस माझ्या भल्या ॥२४॥
friends । my । good—

सांगा त्यास "अहो तुम्ही विसरलां कैशी
tell । them । oh । you । forgot । how ।
जुनी रीत ती ! । जेव्हां घेउनियां
old । way । that । when । having taken ।
तुला, करितसा विक्री वखारींत
scales । made । sale । in warehouse ।
ती ! ॥२५॥
that—

होत्या होत बऱ्याच वेळ सफरी
were । being । several । times । expedi-
बाजूस माझ्या तया ।
tions । to side । my । that—
होते शक्य तदा फिरूनही तुम्हा
was । possible । than । again । you । to the
देशास लावावया ॥२६॥
country । dispatch—

हिंदूंचे परि शील थोर
of Hindus । but । nature । magnanimus ।
म्हणुनी तुम्हांस म्यां रक्षिले ।
therefore । you । I । protected.
नाहीं कां उपकार थोर तुमच्या
not । why । obligations । great । your ।
माथीं असे जाहले ॥२७॥
on head । thus । became—

द्या, द्या, सुख तरी
give । give । happiness । therefore ।
प्रजेस आपुल्या माझींच तीं
subjects । yours । my own । they ।
लेकरें ।
children.
व्हावें आज कृतज्ञ फेडुन
should । today । grateful । redeeming ।
ऋणा हें लौकिकाला बरें ॥२८॥
debt । this । for reputation । good.

—निशाणी भवानी तलवार

प्रस्तुत कवितेतील प्रत्येक कडव्याच्या शेवटी घातलेले क्रमांक हे मुळातले नसून ते माझे आहेत— **लेखक.**

'शिवाजीचे उद्गार' चा **'एक प्रेरणागर्भ कविता'** असा गौरवपूर्ण उल्लेख करून तिच्यासंबंधी श्री. वाळशास्त्री हरदास हे लिहितात,

"या कवितेतील प्रेरणा इतकी स्पष्ट आहे की, तिच्या स्पष्टीकरणाची काहीच आवश्यकता नाही. तिच्यात वर्णन केलेले गोऱ्या नोकरशाहीचे जुलूम काव्यमय नसून त्यावेळी ते प्रत्यक्ष चालू होते व त्यांची दाद घेणारे कोणीही नव्हते. अशा वेळी शिवाजी उत्सवाच्या विविध स्वरूपाच्या कार्यक्रमांतून या प्रकारांच्या मुळाशीं असलेल्या दास्याचा जनशक्तीच्या आवाहनार्थ करण्यात येणारा परिस्फोट लोकांची मने आकर्षण करून घेत असल्यास नवल नाही." (वाळशास्त्री हरदास, **भारतीय क्रांतिकारकांचा इतिहास**, नागपूर १९५१, पृ. १४७ तसेच, वाळशास्त्री हरदास, **भारतीय स्वातंत्र्यसमर-सत्तावन ते सुभाष**, पुणे १९५७, पृ. १३८–१३९)

श्री. वाळशास्त्री हरदास यांच्या मूळ मराठी ग्रंथाचा श्री. एस्. एस्. आपटे यांनी जो इंग्रजी अनुवाद केला आहे, त्यात प्रस्तुत 'शिवाजीचे उद्गार' या कवितेचाही Shivaji's Reflection's या शीर्षकाखाली इंग्रजी अनुवाद आला आहे. (**Armed Struggle for freedom 1857 to Subhash, Poona** 1958, pp. 125 to 127.) पण, हा अनुवाद मूळचा नसून तो अलीकडे श्री. आपटे यांनी केलेला आहे. प्रस्तुत लेखात, मी दिलेला मुळातील शब्दशः अनुवाद, हा **'Tilak Sedition trial 1897'** edited by S. S. Setlur, printed by Induprakash Stream Press (pp. 76, to 81) मधील असून तो मला पुणे येथील दुर्मिळ ग्रंथांचे एक संग्राहक, श्री. पां. रा. ढमढेरे, यांच्याकडून उपलब्ध झाला, या गोष्टीचा येथे कृतज्ञतापूर्वक निर्देश केला पाहिजे.

'शिवाजीचे उद्गार' या कवितेत अनेक महत्वाचे तत्कालीन संदर्भ आले आहेत. उदाहरणार्थ, टिळक आणि आगरकर यांचा तुरुंगवास, प्लेग, महामारी (आकावया), तसेच गोऱ्या सोजिराच्या बंदुकीला नेटिव्हाचा पडलेला बळी व 'मातें अस्वल वाटला!' 'आला धांवत नेमका आपणची नेमांत बंदूकिच्या' ही गोऱ्या सोजिराने सांगितलेली सबब खरी मानून न्यायासनाने निर्दोष म्हणून त्याची केलेली सुटका (न्यायाचा अजब मासला), खोटी कारणे पुढे करून व पुष्कळदा दंडेलीने संस्थाने खालसा करण्याची ब्रिटिश सरकारची रीत वगैरे अशा रीतीने सगळे संदर्भ काढून प्रस्तुत कवितेचे संपादन करणे. हा एक स्वतंत्र लेखाचा विषय होईल. तूर्त एवढेच पुरे.

अनुक्रमणिका

मराठी कादंबरीची उत्क्रान्ती : १९२० ते १९४५

—प्रा. कु. कुसुममाला कोलारकर

१९१५ मध्ये वामन मल्हार जोशांची 'रागिणी' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आणि मराठी कादंबरीने नवीन वळण घेतले. रागिणीतील प्रगल्भ भाषा, तत्त्व-चर्चा आणि काव्यशास्त्रविनोद यांनी वाचकांचे मन हरण केले त्यावेळी हरीभाऊ आपटे मराठी कादंबरीचे अनभिषिक्त सम्राट होते. हरीभाऊंच्या सामाजिक आणि आशयनिष्ठ कादंबऱ्या लोकप्रिय असतानाच वामन मल्हारांची रागिणी महाराष्ट्रातील सुशिक्षित वाचकांना अतिशय प्रिय झाली. यावरून हळुहळू वाचक आणि लेखक यांची अभिरुची बदलत चालली होती हे अनुमान काढायला हरकत नाही. हरीभाऊ मूलतः कथानिर्माते होते. तत्त्वचर्चेत गुरफटणारे नव्हते. वामन-रावांना प्रथमदर्शनी जी लोकप्रियता लाभली ती एकेका प्रश्नाच्या अनंत अंगांकडे सारख्याच आत्मीयतेने पाहून चर्चा रंगविण्याच्या चातुर्यामुळे मिळाली. हरीभाऊंच्या संथ, सुदीर्घ, असंख्यपात्री पाल्हाळिक कथानकांचा ज्या वाचकांना अंदाज येऊन चुकला होता त्यांना चुरचुरीत संवाद, मोजकी पात्रे, सुटसुटीत कथानक त्यांच्या कादं-बऱ्या काहीशा पुढच्या टप्प्याच्या वाटल्या यात आश्चर्य नाही.

१९२० नंतर मराठी कादंबरीक्षेत्रात एक नवीन आवर्तन निर्माण झाले. तिच्या वहिरंगात आणि अंत-रंगात अनेक दृष्टींनी परिवर्तन घडून आले. आता हे परिवर्तन किंवा आवर्तन म्हणजे मराठी कादंबरीचे सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने पुढचे पाऊल होते का ? हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. पण या प्रश्नाचे उत्तर शोधण्यापूर्वी आधी परिवर्तनाचे स्वरूप आपल्याला बघितले पाहिजे. १९२० ते १९४५ या कालखंडात मराठी वाङ्मयात मान्यता पावलेले बहुसंख्य कादंबरी-कार उदयाला आलेले दिसतात. १९२० नंतरच्या पहिल्या पिढीत वा. म. जोशी, केतकर, फडके, खांडेकर, वरेरकर, माडखोलकर, पु. य. देशपांडे यांच्यासारख्या मातबर कादंबरीकारांचा परामर्श घेतल्याखेरीज कादं-बरी वाङ्मयाचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. या कादंबरीकारांनी मराठी कादंबरीतील आशय समृद्ध करून तिच्या अभिव्यक्तीत सरस आकर्षकता आणि विविधता आणण्याच्या बाबतीत दाखविलेले कर्तृत्व निःसंशय लक्षात घेण्याजोगे आहे. तिच्या आशयाच्या कक्षा जशा रुंदावत गेल्या तशाच तिच्या निवेदन-पद्धतीत आणि तंत्रात्मक कौशल्यात अनेक नवेनवे क्रांतिकारी प्रयोग झालेले दिसतात. झपाट्याने बदल-णाऱ्या समाजजीवनाचे प्रतिबिंब लेखकांच्या आणि वाचकांच्या बदलल्या अभिरुचीत पडलेले दिसते. टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीयुगाला आरंभ झाला होता. इंग्रजी सत्ता व संस्कृती यांच्याशी जो एक संघर्ष निर्माण झाला त्यातून भारतात ५०० वर्षांत झाले नसते असे एक अभूतपूर्व सामाजिक स्थित्यंतर घडून येत होते. आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय सुधारणा या प्रश्नाची चर्चा करणारा समाज नकळत सामाजिक परिवर्तनाच्या भोवऱ्यात आणि राजकीय परिस्थितीच्या प्रक्षोभात सापडला होता. आजपर्यंत उपेक्षित असलेले समाजातील

अनेक स्तर हळुहळू जागृत होऊ लागले होते. स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, जातिभेद, अस्पृश्योद्धार इत्यादी अनेक प्रश्नांच्या बाबतीत नवीन दृष्टिकोण उदयाला येत होता. पाश्चात्य संस्कृतीच्या संसर्गाने व भारतातील राजकीय आणि नव्या आर्थिक परिस्थितीतून निर्माण झालेली नवी मूल्ये व जुनी परंपरागत मूल्ये यांच्यात एक नवाच संघर्ष निर्माण झाला होता. देशाचे स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, थोडक्यात स्वातंत्र्य या शब्दाने सुशिक्षितांचे अंतःकरण व्यापलेले होते. मराठी साहित्यातील अनेक प्रवृत्तींचे मूळ इंग्रजी वाङमयात आहे असे समजले जाते. त्याप्रमाणे व्यक्तिनिष्ठा किंवा व्यक्तिस्वातंत्र्य–वादाचा मूळ उद्गम इंग्रजी समाजजीवनात आणि त्यापेक्षाही त्याचा प्रचार इंग्रजी वाङमयात प्रामुख्याने झालेला आहे. पण त्याचे बीज मराठी सुशिक्षितांत पक्के रोवले गेले आणि या नव्या व्यक्तिनिष्ठेचे पडसाद मराठी कादंबरीत उमटल्याखेरीज राहिले नाहीत. विकासाकरिता धडपडणारी व्यक्ती आणि तिच्या मार्गात व्यत्यय आणणारा गतानुगतिक समाज यांच्यामधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर व्यक्तिजीवनाचे चित्रण होऊ लागले. कुटुंब आणि व्यक्ती यांतील संघर्ष, प्रखर संघर्ष वेगवेगळ्या प्रश्नांच्या द्वारे १८९० नंतरच्या कादंबरीत व्यक्त झालेला आढळतो. त्यामुळे साहाजिकपणे कथानकापेक्षा व्यक्तीवरच कादंबरीकाराचे लक्ष केंद्रित झाले. कथानकाचे आकर्षण कमी होऊन व्यक्तीच्या सुखदुःखालाच महत्त्व आले हे एक पहिले मोठे परिवर्तन लक्षात घ्यायला पाहिजे.

व्यक्तीच्या विकासाच्या आड येणारी बंधने तीन प्रकारची. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक. प्रस्तुत कालखंडातील लेखकांना तीनही प्रकारच्या बंधनांची जाणीव होती. परंतु केवळ सामाजिक बंधनांनाच त्यांनी प्राधान्य दिलेले दिसते. त्यातही पुन्हा परंपरागत स्वरूपाच्या अनंत बंधनांनी जखडलेल्या स्त्रीलाच कादंबरीकारांच्या सहानुभूतीचा सर्वांत जास्त वाटा मिळाला. वामनरावांची 'रागिणी', फडक्यांची 'इंदुमती', खांडेकरांची 'उल्का', माडखोलकरांची 'अनू', केतकरांची 'कालिंदी', वरेरकरांची 'गोदू गोखले'–इ. इ. कादंबरीकारांच्या या मानसकन्यांनी तत्कालीन सुशिक्षित वाचकांचे चित्त खूपच आकर्षित केले होते. 'रागिणी' पासून तो विभावरी शिरूरकरांच्या 'अबले' पर्यंत स्त्रीजीवनातील दुःखांना व प्रश्नांना वेगवेगळ्या रीतीने व विविध पातळीवरुन चित्रित करण्यात आले. या कालखंडातील कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनाला इतके प्रावान्य मिळाले की पुरुष पात्रापेक्षा नायिकाच जास्त प्रभावी झाल्या आहेत. "कादंबरीकाराच्या समाजसुधारक मताचे कपडे चढविण्याकरिताच उभे केलेले कितीतरी निर्जीव पुरुष मराठी कादंबऱ्यांत इतस्ततः विखुरलेले आहेत. त्यामानाने मराठीतील खलपात्रे आणि गौणपात्रेच अधिक स्वाभाविक वाटतात." असे जेव्हा श्री. के. क्षीरसागर म्हणतात तेव्हा ते आपल्याला पटल्यावाचून राहत नाही. असांकेतिक आणि मर्द पुरुषपात्रे मराठी कादंबरीत केतकरांनीच आणली हे त्यांचे विवानही विचार करण्याजोगे आहे.

वा. म. जोशांनी तत्कालीन सुशिक्षित तरुणींची प्रतिनिधिक चित्रे रेखाटली व मराठी कादंबरीला तात्त्विकता आणि उच्च वैचारिकतेची जोड करून दिली, तर १९२६ मध्ये 'गोंडवणातील प्रियंवदा' ही कादंबरी लिहून केतकरांनी कादंबरीसंबंधीच्या रूढ कल्पनांना धक्का दिला. आणि एका वेगळ्याच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्तिचित्रणापेक्षा सामाजिक प्रवाहांचे व राष्ट्रीय आकांक्षांचे चित्रण केले. अनेक मूळ कथावृक्ष घेऊन केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून भरपूर समाजविश्लेषण व मनोविश्लेषण केले. हरीभाऊंची सामाजिक कादंबरी प्रायः कौटुंबिक कादंबरी होती. तर केतकरांची सामाजिक ही बदलत्या काळात महाराष्ट्रीय जीवनात येऊन मिळणाऱ्या विविध ओघासंबंधी होती. हरीभाऊंचा वास्तववाद हा मांडणीचा वास्तववाद आहे तर केतकरांचा वास्तववाद आशयाचा आहे. किंबहुना केतकरांनी आधुनिकतर वास्तववादाला आरंभ केला असे म्हटले तरी चालेल. केवळ सदाशिवपेठी सुखदुःखात रमलेल्या कादंबरीच्या आशयाचे क्षितिज केतकरांनी निश्चितच विस्तीर्ण केले. अमेरिकेत स्थायिक होऊ पाहणाऱ्या भारतीयांचे जीवन, अधर्मसंततीचा प्रश्न, भिन्नधर्मीय विवाह, आर्थिक स्वातंत्र्य मिळालेल्या स्त्रियांचा प्रश्न, विवाहपूर्व अनुनय इ. तोपर्यंतच्या कादंबरीकारांनी न चर्चिलेल्या अनेक क्रान्तिकारक प्रश्नांची चर्चा त्यांनी

केलेली आढळून येते. आणि ह्या चर्चात्मक कादंबऱ्यांनी तत्कालीन वाचकांच्या पूर्वग्रहांना जबरदस्त हादरे दिले एवढे मात्र खरे. वा. म. जोशांच्या कादंबऱ्यांत कथानकाशी तत्त्वचर्चा तितकीशी एकजीव झाली नाही आणि केतकरांनी कादंबरीच्या कलात्मक आणि तंत्रात्मक अंगाकडे दुर्लक्ष केले. तेव्हा वा. म. जोशी आणि केतकर यांच्या कादंबऱ्या म्हणजे "तत्त्वप्रेमी किंवा समाजशास्त्रप्रेमी निबंधकारांनी लिहिलेल्या क्षम्य कादंबऱ्या " असेच त्यांचे वर्णन करावे लागेल.

'जादूगार' कादंबरी पासून तो आजतागायत आपल्या रमणीय शैलीने मराठी वाचकांना गुंगत ठेवणाऱ्या श्री. ना. सी. फडक्यांनी मराठी कादंबरीला एक तंत्रात्मक रचनेची देणगी दिली. मराठी भाषेला एक नवे वळण लावले. भाषेत खेळकरपणा, ताजेपणा, सफाई, लवचिकपणा हे गुण आणून तिच्यावर आधुनिकपणाचे संस्कार करण्याचे श्रेय फडक्यांना द्यावयास हरकत नाही. सुटसुटीत आणि घाटदार कथानक, चतुर निवेदन, पार्श्वभूमीची विविधता, सुंदर वर्णने, तपशीलाचा रेखीवपणा, इ. तंत्रात्मक बाबतीत फडक्यांनी कादंबरीचे स्वरूप आकर्षक बनविले. याबाबतीत त्यांचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे.

१९२७ मध्ये फडक्यांची 'जादूगार', पु. य. देशपांडयांची 'बंधनाच्या पलीकडे' १९२६ मध्ये 'गोंडवनातील प्रियंवदा' या तीन कादंबऱ्या जवळ जवळ एकाच वेळी प्रसिद्ध झाल्या. पण त्या तीन कादंबऱ्यांवरून मराठी कादंबरीतील तीन वेगवेगळे प्रवाह लक्षात घेण्याजोगे आहेत. पु. य. देशपांडयांच्या लेखनाची प्रकृती फडक्यांच्या प्रकृतीहून मूलतः वेगळी आहे. त्यांची निर्मिती मूलतः आत्मनिष्ठ आहे. उत्कट आत्मनिष्ठ, विचारशील व्यक्तिमन व ठराविक सामाजिक आदर्श यांचा संघर्ष बंधनाच्या पलीकडे या कथेचा मूलस्त्रोत आहे. व्यक्तीच्या अंतर्यामातील भावजीवनाचा विश्लेषणपूर्वक आविष्कार हा त्यांच्या लेखनातील स्थायीभाव आहे. त्यांच्या कादंबरीत पारंपारिक प्रकारच्या घटनांना मुळीच स्थान नाही. त्यांची कलापद्धती विश्लेषणात्मक आहे. हा एक नवा प्रवाह कादंबरीच्या उत्क्रांतीत लक्षात घेतला पाहिजे.

१९३४–३५ चा काळ हा मराठी कादंबरीचा वैभवाचा काळ समजला जातो. वा. म. जोशांची 'इंदु काळे सरला भोळे', खांडेकरांची 'उल्का', वरेरकरांची 'परत भेट' ना. ह. आपटयांची 'आम्ही दोघं' इ. कादंबऱ्या फार लोकप्रिय झाल्या. हा काळ जसा मराठी कादंबरीचा उत्कर्षाचा समजला जातो तसाच नवविचारांना जोराची चालना देणारा समजला जातो. कार्ल मार्क्स, फ्राईड, बर्ट्रांड रसेल, इ० पाश्चात्य विचारवंतांनी सुशिक्षित महाराष्ट्रीयांच्या मनोभूमीला जोरदार हादरा दिला. या नवमतवादाचे रूप कित्येकांना विलोभनीय वाटले. कलेचे स्वातंत्र्य, कला आणि नीती, कला व जीवन, नवनीती या प्रश्नांना विशेष रंग चढला. आणि या वादळी हवेत विभावरी शिरूरकरांची 'हिंदोळचावर' ही कादंबरी प्रसिद्ध होताच तिच्यावर अनुकूल प्रतिकूल टीकेची बरसात झाली. १९२० ते ४५ या कालखंडात ज्या अनेक लेखिका उदयाला आल्या त्यांत विभावरी शिरूरकर, गीता साने, प्रेमा कंटक, मालतीबाई दांडेकर इ. चा उल्लेख करायला हवा. स्त्रीजीवनातील मूलगामी समस्येचा विचार विभावरी–वाङमयात प्रामुख्याने आढळतो स्त्रीचे दुःख हा विषय अनेक लेखकांनी हाताळला पण विभावरीने स्त्रीजीवनातील ही समस्या अत्यंत वस्तुनिष्ठ स्वरूपात, सुजाण सहानुभूतीने व संयमाने वाचकांपुढे मांडली आहे. तिचे अनन्यसाधारण महत्त्व कादंबरीच्या इतिहासात नमूद केले पाहिजे.

१९३९–४० च्या सुमारास विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' आणि श्री. मर्ढेकर यांची 'रात्रीचा दिवस' ह्या आणखी एक वळण दर्शविणाऱ्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. मर्ढेकरांनी 'संज्ञाप्रवाहाचा' उपयोग करून एका नव्या प्रयोगाचा परिचय करून दिला.

१९२० ते १९४५ च्या कालखंडात आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीकरिता जी आंदोलने झाली त्यामुळे राजकीय अंगाला असाधारण महत्त्व चढले. पण ह्या स्वातंत्र्याकांक्षांचे ऊर्जस्वल दर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्या मात्र निर्माण झाल्या नाहीत हे एक आश्चर्यच म्हणायचे ! माडखोलकरांची 'मुक्तात्मा' कादंबरी १९३३ मध्ये प्रसिद्ध झाली. मराठीतील ही पहिली राजकीय कादंबरी समजली जाते. 'यशवन्तराव खरे' या कादंबरीत प्रथमच आपटयांनी व्यक्तिचित्रणासाठी तत्कालीन राजकारणाचा उपयोग केला होता. श्री. माडखोल-

करांनीही आपल्या अनेक कादंबऱ्यांतून राजकीय पार्श्वभूमीचा उपयोग केलेला दिसतो. पण नंतरच्या कादंबऱ्यांत मात्र गांधीवादाची तिरस्कारमूलक चर्चा आणि क्रांतिकारी पक्षाचे नेभळे राजकारण असाच प्रकार दिसतो. माडखोलकरांच्या कादंबरीत राजकारणाची वर्तमानपत्री रूक्ष चर्चा आणि कथानक यांचा समन्वय कधीच झाला नाही त्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने राजकीय कादंबरी म्हणता येईल की नाही हा प्रश्न आहे. राजकीय परिस्थितीचे थोडेबहुत प्रतिबिंब ज्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांत उमटले आहे त्यांतली काही प्रमुख लक्षात घेण्याजोगी नावे म्हणजे वरेरकर, साने गुरुजी, खांडेकर यांचीच घेता येतील. गांधीवाद, समाजवाद, दलितोद्धार इ. अनेक प्रश्नांची चर्चा त्यात सापडेल. ग्रामीण जीवनाचा एक नवा प्रवाह याचवेळी कादंबरीक्षेत्रात निर्माण झालेला दिसतो. र. वा. दिघे हे एक ठळक नाव या बाबतीत डोळ्यासमोर येते.

हरीभाऊ आपट्यांनंतर ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रात श्री. हडपांशिवाय एकही नामवंत लेखक निर्माण झाला नाही. ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रात हरीभाऊच अद्वितीय ठरतात.

स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्रातील कादंबरीवाङ्मयाच्या विविध प्रवाहाचे दर्शन आपण घेतले.

कादंबरी हे एक जीवनदर्शन आहे, कादंबरी लेखन हा केवळ आकाराचा form चा प्रश्न नसून आशयाचा म्हणजे जीवितचिंतनाचा आणि जीवनचित्रणाचा प्रश्न आहे. आधुनिक कादंबरीकार हा शब्दनिष्ठ, शैलीनिष्ठ वा तंत्रनिष्ठ असून चालत नाही. त्याला छंद जीवनाचा अर्थ शोधण्याचा असावा लागतो. ज्या ज्या वास्तववादी लेखकांचे कुतूहल सामाजिक संघर्षापलीकडे, मानवी भवितव्यापर्यंत पोचते, त्यांचा वास्तववाद अधिक खोल जातो. कुसुमावतीबाई देशपांडे म्हणतात, "हरी नारायणानंतरच्या बहुतेक नामवंत मराठी कादंबऱ्यांत जीवनातील काही प्रश्न उभे राहतात. जीवन उभे राहत नाही! हरीभाऊंच्या मागून येणाऱ्या कादंबरीकारांनी हरीभाऊंची सामाजिकता आणि त्यांचा वास्तववाद कितपत पुढे नेला किंबहुना हरीभाऊंच्या अभिनव अर्थपूर्ण कलेने दिलेले गंभीर आव्हान कितपत स्वीकारले याचा विचार करण्यासारखा आहे असे वाटते आणि मराठीत एखादा 'टॉलस्टॉय', 'एमिल झोला', किंवा 'शरच्चंद्र चट्टोपाध्याय' का निर्माण झाला नाही हा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारावासा वाटतो!

(नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने)

अनुक्रमणिका

श्री. सुरेश भट : एक ओळख

—वामन इंगळे

डायमेंशन सातवे:—हिरव्या मिर्च्यांचा लसूणमय ठेचा. कारभारणीच्या स्पर्शसंवेदनेसह. ती एक दहा डायमेंशनची भाकरी असते. तिच्यात पुरणपोळी ते चटणीपर्यंतच्या सर्व सोयी केलेल्या असतात.

नागपूर नभोवाणीचा स्टुडिओ. मी माझी कविता अगदी 'तुरुतुम'मध्ये येऊन वाचत होतो. (हा शब्दही भट्टांचाच.) सर्वांपासून लांब अंतरावर बसलेले भट मोठ्या चवीने कविता ऐकत होते. कविसंमेलन संपले. पण काय झाले कुणास ठाऊक. भट माझ्याजवळ आले आणि म्हणाले,

'तुला माझ्याबरोबर यावं लागणार आहे.'

त्याच्या आवाजातील हुकूमतीमुळे माझ्यासाठी खोळंबलेले गिरी कविबंधु चाट होऊन पाहातच राहिले. भट्टांनी जवळजवळ जबरदस्तीनेच मला रिक्षात कोंबले.

रिक्षा कॅफे राजजवळ थांबला.

चहा वगैरे घ्यायचा असेल अशा कल्पनेने मी भट्टांच्या पाठीमागे गेलो. हॉटेलातील सर्व कर्मचारीवर्ग एकटक भट्टांकडे टवकारून पहात होता. त्याची मुख्य कारणे दोन. एकतर भट्टांची 'तनु' एखाद्या शेठसारखी गवदुल आहे. (आणि त्यांचा एक पायही अधु आहे. पण वागण्याची ढव अशी बेपर्वा की अनोळख्यालाही सहानुभूति वगैरे वाटून घ्यायची सोय नाही.) पण मुख्य म्हणजे त्यांच्या हातात खाकी पट्ट्याने गुंडाळलेली वळकटी होती. आणि तरीही ते एखाद्या म्हशीसारखी मुसंडी मारून बाहेरच्या सभ्य रेशमी वातावरणाला न जुमानता राज हॉटेलात प्रवेशले होते. संकोच वगैरे वाटून घ्यायचे डिपार्टमेंट माझ्याकडे होते. भट्टांनी बेधडक ऑर्डर दिली—दो मटन करी—दो चिकन—दो अंडा—दो मुर्गी पुलाव—दो......'

ये सब चीजे एकही दमसे लाऊं क्या, (और आप एकही दमसे खायेंगे क्या ?) असा प्रश्नार्थक भाव वैऱ्याचा चेहऱ्यावर उमटलेला पाहून भट्ट गरजले...... जरा जल्दी ले आईये.

वैऱ्याने भराभर टेबलावर दहा पंधरा बशांची सर्कस मांडली. किती आणि कसे खावे (आणि नाही तरी कसे म्हणावे ?) अशा विचारात असताना माझ्या डोळ्यासमोर मीच अर्ध्या तासापूर्वी वाचलेले भाकरी-ब्रम्ह उभे राहिले. एका झटक्यात भट्टांनी पंधरा रुपयांचा अन्नखुर्दा केलेला पाहताच मला त्यांच्या जुन्या दिवसांची आठवण झाली. नोकरीधंद्याशिवाय असलेले तेव्हाचे भट्टकवि मित्रांकडून आग्रहाने चहा घ्यायचे. परंतु कवितेचे पैसे वगैरे आले म्हणजे ते त्या मित्राला शोधीत अमरावती पालथी घालायचे. आज मेरे पास पैसे है रे. क्या खानेपिनेका है सो आज खा ले. (फिर कलका क्या भरोसा ?) त्या पडत्या काळातही ही शेर भावना. आज तर भट्टांचे खूप छान चालले आहे. माझ्या भाकरीतील डायमेंशन्स ऐकून भट्टांच्या मनात एखादी पाल चुकचुकली असावी. बेट्या वामनचं जेवणबिवण तर व्हायचं राहिलं नसेल ?

भट्टांच्या (आणि केवळ भट्टांच्याच मनात अश कल्पना येऊ शकतील.) भट्टांचे कवित्व याही अर्थाने जीवनाची जाणीव सोडीत नाही. भट्ट कविता जगतात, जगतात म्हणून अमरावतीकरांनी उठविलेली आवई नुसतीच अफवा नव्हती हे त्या दिवशी कळले. (माहिम

भट्ट सावधान ! आपले हे कवित्व चाखायला लोक गर्दी करण्याची शक्यता आहे.)

एकाच्या कलाकृतीवरून दुसऱ्याच्या कलाकृतीची आठवण झाली म्हणजे दुसऱ्याला दुय्यमपणा येतो असे म्हणतात. तसे होत असेल. पण कधीकधी तसे होतही नसावे. कुमारांच्या गाण्याने मला नेहमीच ओंकारनाथ ठाकुरांची आठवण करून दिली आहे. सुर्व्यांच्या आणि बाबासाहेब आमटेंच्या कविता वाचल्यानंतर मला नकळत करंदीकर मुक्तिबोधांची आठवण येते. पण तरी दुय्यम तिय्यम भावना स्पर्शत नाही. भट्टांची कविता वृत्तीने तशी एकेरी नाही असे म्हणण्याऐवजी एकसंध नाही असे म्हणावे लागेल. गर्दीत शोषल्या जाणाऱ्या विराट आवेगाने ती जशी लवथवली आहे तसेच तिच्यात छंद यमकांचे जीवघेणे देखणेपण आहे. वृत्तीने बंडखोर असलेल्या या माणसाने वृत्तांविरुद्ध बंड उभारले नाही. तकलुफी बंडापेक्षा छंदांशी हातमिळवणी केव्हाही श्रेयस्कर. त्यांनी केलेल्या द्राक्षकन्या व भूपतीवैभवातील रचना या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. पण तरी रूपगंधाकार भट्टांचे गझल मला गालिब मझारची आठवण करून देतात. तोंडवळा एक नाही. पण पोताची उंची वीण तीच. 'तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळू दे' अथवा माझ्या मोक्षाला एखादी छटेल गौळण पुरेशी आहे, असे म्हणणारे भट्ट मला गालिबच्याच अक्षांशावर उभे असलेले दिसतात.

माधवराव पटवर्धनानंतर खरा गझल लिहिला करंदीकरांनी आणि भट्टांनी. पण तो खऱ्या ताकदीने गावा (उर्दु शायरांचा अपवाद) भट्टांनीच. भट्ट स्वतःची प्रत्येक कविता गातात. मग करंदीकर, बापट, पाडगावकर, यादव मुकुंद हे ज्येष्ठ बरोबर असले तरी ते रसिकांची खळखळून दाद मिळवू शकतात. पण तरी भट्टांचे रविकिरण काव्यगायनाशी फारसे नाते नाही. रविकिरण काव्यगायनात काव्याच्या खात्यावर शास्त्रीय संगीतातील गमका हरकतीही जमा होऊ शकतात. भट्टांच्या सुरांनाही असते रागदारीचीच छाया. पण त्यांच्या शब्दोच्चारातील मर्यादित स्वर, आस आणि दमदार कंपने असे 'संगीत' स्वातंत्र्य घेत नाहीत. त्यांचे शब्दसुरांचे अद्वैत एखाद्या छुरीप्रमाणे ऐकणाऱ्याच्या हृदयात शिरते. आणि म्हणूनच ंची कवितामैफल हा एक अनोखा आनंद असतो.

मी कॉलेजात असताना मुक्तिबोध दिलीप चित्र्यांचे एक कौतुक नेहमी सांगायचे — 'इंगळे; दिलीप हा सतरा अठरा वर्षांचा छोकरा आहे. पण गडी आत्तापासून डांटे कांटशिवाय बात करायला तयार नाही.'

पुढे चित्र्यांच्या काही कविता आणि समीक्षा वाचल्यानंतर ज्ञानेश्वरांनी बाराव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली या घटनेचे माझे स्वतःचे कौतुक ओसरून गेले.

पूर्वजन्म वगैरेवर विश्वास नसूनही भट्टांच्या बाबतीतही मला असेच एक 'सनातन कुतूहल' आहे. भट्टांचे बोलणे, वागणे आणि कवित्व एखाद्या गालिब मझारकडे संकेत करतात. भट्ट जातीनेही भट्टच खरे. पण त्यांच्या अवाढव्य देहात तशाच ताकदीचा एखादा मियाँ 'जिगर' तुरुन्नुमांत गुणगुणत असावा हे केवढे आश्चर्य !

अनुक्रमणिका

एक प्रादेशिक कादंबरी : हद्दपार -एक अभ्यास

—प्रा. कृष्णा चौधरी

प्रादेशिक साहित्य हा शब्दप्रयोग १९४७ नंतरचा आहे. १९४७ पूर्वी "प्रादेशिक साहित्य" या शब्द-प्रयोगाऐवजी "जानपद" वा "ग्रामीण साहित्य" असे शब्द प्रचारात होते. आजही प्रादेशिक साहित्य व ग्रामीण साहित्य हे शब्द समानार्थक म्हणून वापरतात. पण याचा आपण स्वतंत्र विचार केला पाहिजे.

ग्रामीण कादंबरी व प्रादेशिक कादंबरी यात फरक आहे. ग्रामीण कादंबरीत खेड्यातील असंस्कृत जीवनाचे व त्याचप्रमाणे शेतवाडी, गावगाडा इत्यादींचे चित्रण केलेले असते. ग्रामीण साहित्याची एक अट म्हणजे ग्रामीण साहित्याची भाषाही ग्रामीणच असली पाहिजे. केवळ विशिष्ट प्रादेशिक बोलीमुळे एखाद्या कादंबरीला "प्रादेशिक" ही संज्ञा लावता येणार नाही. प्रादेशिक कादंबरीची एक अट म्हणजे ती ग्रामीण जीवनावर असावी याचाच अर्थ ज्याला आपण प्रादेशिक कादंबरी म्हणतो ती ग्रामीण असतेच, पण ग्रामीण कादंबरी प्रादेशिक असेलच असे नाही. प्रादेशिक कादंबरी म्हणजे ग्रामीण कादंबरी नव्हे. प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण या संज्ञेपेक्षा अधिक व्यापक आहे. प्रादेशिक कादंबरीत ग्रामीण कादंबरीचाही अंतर्भाव होतो ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे.

प्रदेशाच्या एका छोट्या खंडात लहानमोठ्या अनेक खेड्यांचा समावेश होतो. ग्रामीण विशेषांचेच व्यापक रूपाने प्रादेशिक वैशिष्ट्यात रूपांतर होते. ग्रामीण कादंबरीला एक लहान वर्तुळ मानले तर प्रादेशिक कादंबरीला ग्रामीण कादंबरीच्या लहान वर्तुळाला पोटात घेणारे महावर्तुळ मानावे लागेल.

कार्यकारणबद्ध, शृंखलाबद्ध अशा कल्पित कथा-नकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सवि-स्तर ललित गद्यकथा म्हणजे कादंबरी. पार्थिव संसारा-विषयीची आस्था ही कादंबरीची वृत्ती व मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोण. कुसुमावती देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे व्यक्तिचित्रणा-च्या व कथानकाच्या द्वारा कादंबरी जीवनदर्शन घडवीत असते. अर्थातच जीवनदर्शन हेच कादंबरीचे मूलभूत प्रयोजन आहे. म्हणूनच कादंबरी या वाङमयप्रकारचे ऐतिहासिक, राजकीय, अद्‌भूत व प्रादेशिक इत्यादी भेद पाडले तरी तिच्या मूलभूत प्रयोजनाला बाधा येत नाही असे मला वाटते. प्रादेशिकता हे कादंबरीचे स्वतंत्र मूल्य नव्हे असे म्हणतात तेच खरे! पेंडश्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर शहरी बायांच्या मेळाव्यात घट्ट कासोट्याच्या कोळिणीने प्रवेश केला तर कदाचित् ती आपले लक्ष आपल्या वेगळ्या पोषाखामुळे वेधून घेईल; पण सौंदर्याच्या बाबतीत मात्र तिच्यासाठी वेगळ्या कसोट्या ठरविता येणार नाहीत. प्रादेशिकता हे प्रादेशिक कादंबरीचे स्वयंभू मूल्य नसून ते तिचे एक विशेषण आहे ही गोष्ट आपण प्रादेशिक कादंबरीचा विचार करताना लक्षात घेतली पाहिजे.

श्री. ना. पेंडश्यांची "हद्दपार" ही एक उत्कृष्ट प्रादेशिक कादंबरी मराठी कादंबरी जगात मानल्या जाते. मराठीतील पहिले प्रादेशिक कादंबरीकार दिघे ओळखल्या जात असले तरी कोंकणच्या परिसरातील इतकी सौंदर्यदृष्टीने रेखाटलेली विलक्षण निसर्गचित्रे पेंडश्यांच्या कादंबरीत दिसून येतात.

दिघे, पेंडसे, माडगूळकर, दांडेकर, शेळके व तल्हार हे आजच्या पिढीतील प्रमुख प्रादेशिक कादंबरीकार. पण या सर्वात पेंडश्यांचे स्थान वेगळे पडते. वास्तविक हद्दपार ही पेंडश्यांची कादंबरी "गारंबीच्या बापू" प्रमाणे गाजली नाही. पेंडश्यांचे आकर्षण मराठी रसिकांना आहे ते गारंबीच्या बापूमुळे! पण तरीही मराठी कादंबरीतील रचनाकौशल्याच्या दृष्टीने व पेंडश्याच्या कादंबरी रचनाकौशल्याच्या विकासाचे प्रतीक म्हणून पेंडश्यांच्या कादंबरीसृष्टीतील हद्दपारचा परिवर्तनबिंदु नजरेआड करता येत नाही. पेंडश्यांनी आपल्या पूर्वीच्या मराठी कादंबरीतील तंत्राच्या सर्व चौकटी झुगारून दिल्या. पेंडश्यांपूर्वी फडके–युगात संवाद व निसर्गवर्णने यांना मराठी कादंबरीत भाव आलेला होता. कुरुंदकरांच्या शब्दात सांगायचे झाले तर पारतंत्र्याच्या काळात "रंजनाची सामुग्री" म्हणून ध्येयवादाला मागणी होती; पेंडश्यांच्या काळात रंजनाचे फडके युग संपून कुरुंदकर म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच मराठी कादंबरी पुन्हा एकदा वास्तव जीवनाकडे वळत असताना हरिभाऊंच्या जवळ सरकली.

प्रादेशिक कादंबरीत केवळ बोली प्रादेशिक असून चालत नाही तर ज्या प्रदेशाचे जीवन कादंबरीकार चित्रित करीत असेल त्या प्रदेशाचे जिवंत चित्रण प्रादेशिक कादंबरीकाराने केले पाहिजे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर प्रादेशिक कादंबरीतील स्थलकाल हा वैशिष्टचपूर्ण असावा लागतो. एका पूर्ण विशिष्ट अशा वैशिष्टचपूर्ण प्रदेशाला प्रादेशिक कादंबरीत महत्त्व असते. पेंडश्यांची 'हद्दपार' ही ही एक उत्कृष्ट रचनाकृती असल्यामुळे कोंकणपट्टीच्या एका ठराविक पट्टीचे जिवंतपणे इथे दर्शन घडते. कोंकणचा परिसर हा पेंडश्यांच्या 'हद्दपार' मधील कथावस्तूला व तदंतर्गत पात्रांना साकार करणारी रंगभूमी आहे. त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे, हर्णे मुरुड, आंजर्ले, मुर्डी व वरती दापोली या त्रिकोणावर त्यांनी हाडामासाच्या माणसासारखं प्रेम केलं आहे याची साक्ष 'हद्दपार' मधील निसर्गवर्णनावरून पटते. प्रादेशिक कादंबरीत विशिष्ट प्रदेशाच्या जीवनाचे चित्रण असल्यामुळे विशिष्ट प्रदेशाच्या चित्रणाला साहजिकच महत्त्व येते. कोंकणच्या परिसरावर तर पेंडश्यांचे हाडामासाच्या माणसाप्रमाणेच प्रेम असल्यामुळे हद्दपार मधील निसर्गवर्णने बंगल्याच्या भवती कृत्रिम बाग तयार करून लावावी तशी वाटत नाही. या कादंबरीतील निसर्ग, सामाजिक जीवन आणि त्यांचे घटक असलेल्या व्यक्ती ह्यांच्या परस्पर संबंधातील स्वाभाविकत्व आणि अपरिहार्यत्व अगदी सजीव स्वरूपात प्रकट झालेले आहे. स्थळांना आणि निसर्गदृश्यांना या कादंबरीत वैशिष्टचपूर्ण व्यक्तित्व लाभले आहे. करवंद्याचा कातळ हद्दपारमध्ये राजेमास्तरांना अखेरपर्यंत साथ करीत राहतो, तो या कादंबरीत निसर्ग व मानव हातात हात घालून चालतात म्हणूनच.

पेंडश्यांच्या काव्यात्म निसर्गवर्णनाचा मासला म्हणून या कादंबरीतील सुपारीबागेच्या मध्यभागी असलेल्या केशवराजाच्या देवस्थानचे वर्णन पाहाण्याजोगे आहे. या देवस्थानाचे वर्णन करताना तर पेंडश्यांनी सौंदर्याचा कळस गाठला आहे. देवालयाचे काळवत्री चिऱ्याचं बांधकाम, दीपमाळा, काळवत्री दगडाचा काळाभोर केशीराज, दणदणत येणारं पाटाचं पाणी, कोळथरच्या डोंगरापासून साखरपेंडीच्या खाडीपर्यंत टप्प्यात येणारं अरबी समुद्राचं भव्य दर्शन, हर्णेचा शुभ्र दीपस्तंभ! निसर्ग आणि मानव यांच्या सहकार्याने इथे यक्षभूमी निर्माण झाली आहे अशा या व्यक्तित्वसंपन्न भूमीवर, आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे, राजेमास्तर, निर्मल, सोन्याबापू अशी असंख्य जिद्दीची माणसं भेटतात. कोंकणची ही माणसं, आणि त्यांची मनं घडविणारा निसर्ग यांचे अत्यंत सामर्थ्यपूर्ण चित्रण पेंडश्यांनी आपल्या 'हद्दपार'मध्ये केलेले आहे. पेंडश्यांनी या कादंबरीत केलेल्या केशवराजाच्या देवस्थानाचे, सुपारीबागेचे, दुर्गेश्वर, बुरोडी व दापोलीचे वर्णन पाहता निसर्ग या जिवंत व्यक्तिमत्व असणाऱ्या पात्राचे दर्शन 'हद्दपार'मध्ये अनेकदा घडते.

प्रादेशिक कादंबरीत निसर्ग हे जिवंत व्यक्तिमत्व असणारे पात्र हवे. त्याचप्रमाणे दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या विशिष्ट प्रदेशाचे चित्रण कादंबरीकाराला करावयाचे असेल त्यातील निसर्ग अनिवार्य व अपरिहार्य म्हणून यावयाला हवा. जे काही घडते ते घडविण्यात स्त्री-पुरुष पात्रांच्या इतकाच या निसर्गाचाही हात असावा असे वाटले पाहिजे. हार्डीच्या कादंबऱ्यांप्रमाणे हद्दपारमध्येही हाच अनुभव येतो. येथील भैरीचा कोंड व तांबडीचा कोंड, दुर्गेश्वर बुरोडीतील वादळाचा पन्ह्या, मर्डीची

विहीर, कोकंब्यातील हवालदाराची झोपडी व सुपारीबाग इ. निसर्ग घटकांचा 'हद्दपार'मधील पात्रांशी अविरत हृदयसंवाद चाललेला असतो. करवंद्याच्या कातळाने मास्तरांच्या जीवनाला शेवट-पर्यंत केलेली साथ पाहता 'हद्दपार'च्या रूपाने प्रथमच निसर्ग आणि वातावरण हे पार्श्वभूमी व सजावट म्हणून न येता इथे पात्र म्हणून आले हे प्रकर्षाने जाणवते. ओंडक्यामुळे काश्याला झालेल्या दुखा-पतीमुळे तर एक भव्य, भीषण, सुंदर तितकाच शुद्र, निर्घृण पण परिणामकारक अशा विविध कडा असणाऱ्या व्यक्तित्वसंपन्न निसर्गाचे दर्शन घडते. कुसुमावती म्हणतात, दिघे यांच्या कथांमध्ये निसर्ग-जीवन व मानवी जीवन यांच्यामधील भावपूर्ण एक-तानतेची एक विशेष परंपरा निर्माण झाली व तिचाच पुढे पेंडसे व विवलकरात विकास झाला हेच खरे.

मानवी जीवनावर सत्ता चालविणाऱ्या या कादंवरीत मधूनच आपले लक्ष आगरातील पोफळी, माड, रामफळ, सीताफळ, कोकंव, तगरीची झाडं, जास्वंद व अनंत वेधून घेतात हेही येथे नमूद केले पाहिजे. भैरीचा व तांवडीचा कोंड, सुपारीवाग, करवंघाचा कातळ व दुर्गेश्वर बुरोडीतील सीमा-रेषेवरील वादळाचा पऱ्ह्या हे सर्व निसर्गघटक वाता-वरण–निर्मितीला मधूनमधून मदत करीत असतात. हेही येथे कसे विसरता येईल ?

राजेमास्तरांची जीवनकथा ही या कादंवरीतील मध्यवर्ती केंद्रिभूत घटना आहे. 'हद्दपार' कादंवरी ही केवळ कोंकणच्या वैशिष्टचपूर्ण स्थलकालामुळे किंवा निसर्ग या व्यक्तिमत्व असणाऱ्या जिवंतपणामुळेच श्रेष्ठ ठरत नाही तर तिची कलात्मक उंची वाढते ती तिच्यातील असामान्य, भव्य व उदात्त राजेमास्तरांच्या जीवनदर्शनामुळे ! विभावरी शिरूरकरांच्या 'वळी'तील आवाप्रमाणेच राजेमास्तरांचे दुःखही हे त्यांचे स्वतःचे उरत नाही. त्यांच्या दुःखाचा परीघ अखिल मानव-जातीला दुःखाएवढा वाढत जातो व इथेच या कादं-वरीच्या प्रादेशिकतेच्या सर्व मर्यादा गळून पडतात. किंवहुना प्रादेशिकतेच्या सर्व मर्यादा झुगारून देते म्हणूनच ही श्रेष्ठ प्रकारची कादंवरी ठरते.

पेंडश्यांची 'हद्दपार' ही यशस्वी कादंवरी असली तरी या कादंवरीवावत एक शंका मात्र मला सतत जाणवत असते ती ही की, प्रादेशिक कादंवरीत कादं-वरीकार जेव्हा एखाद्या प्रदेशाचे चित्रण करीत असतो तेव्हा तो केवळ त्या प्रदेशाचेच चित्रण करीत नाही तर त्या प्रदेशाचे मनच साकार करीत असतो. एका व्यापक अर्थाने पाहिल्यास समूहमन म्हणजे गर्दीचे छायाचित्र प्रादेशिक साहित्यात प्रकट झाले पाहिजे म्हणजेच ज्या प्रदेशाचा परिचय कादंवरीकाराला करून द्यावयाचा असेल त्या प्रदेशाच्या लोकजीवनाचे दर्शनसुद्धा प्रादेशिक कादंवरीत झाले पाहिजे. 'हद्दपार'मध्ये कोंकणच्या पट्टीतील निसर्गाचे ठळकपणे दर्शन होत असेल तरी तेथील लोकजीवनाचे–समूहमनाचे दर्शन होते का ? नाही म्हणायला भैरीवोवाची पालखी, शेरणं पुरण्याचा मान इत्यादी जनरूढींचा उल्लेख करता येईल. पण खऱ्या अर्थाने कोंकणच्या प्रदेशातील निसर्गाची ओळख होऊनही कोंकणमधील लोकजीवनाविषयी फारसे आप-णाला ही कादंवरी सांगू शकत नाही. पण एवढी एक गोष्ट सोडली तर इतर बाबतीत मात्र या कादंवरीचे रचनाकौशल्य आपल्या डोळ्यात भरते.

दांडेकरांची पडघवली चांगली आहे हे कवूल करूनही तिची झेप मर्यादित आहे. तिचा व्याप स्थळाच्या दृष्टीने फारच कमी आहे. पण प्रादेशिक कादंवरीची स्थलकालदृष्टचा अंगभूत मर्यादा पेंडश्यांनी 'हद्दपार' पाहता ओळखलेली दिसते. म्हणूनच टालस्टॉयच्या 'वॉर अँन्ड पिस' प्रमाणे तिची झेप अखिल मानवते-पर्यंत पोहोचते. प्रादेशिक असूनही प्रादेशिकतेच्या मर्यादा झुगारून देण्यातच हद्दपार कादंवरीचे सामर्थ्य दडलेले आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. प्रादेशिक असूनही प्रादेशिकतेच्या मर्यादा झुगारून देणारी मराठीतील पहिली प्रादेशिक कादंवरी म्हणून 'हद्दपार'चा उल्लेख केल्यास मराठी कादंवरीच्या इतिहासात तो निश्चि-तच अनाठायी ठरणार नाही याचा मला विश्वास वाटतो.

कविता

व्यभिचार

जनतेचा जनार्दन
उभा बाजारी नागवा
आता रक्ताची तहान
त्याच्या मासाने भागवा

घराआड बलात्कार
तुपातांदुळा लपवा
देव भावाचा भुकेला
त्याला वासाने दिपवा

नाठाळांच्या नंदानीला
वश कुबेर जाहला
काळ्या बाजारात सौदा
माझ्या राजाचा चालला

घाला उखाण्यात नाव
कुंकू कपाळी नाचवा
बदफैलीपणासाठी—
मंगळसूत्र बाटवा

भरा वांझ चुडा, स्तोम
पातिव्रत्याचे माजवा.
गर्भ पोटात पापाचा
त्याच्या नावाने वाढवा

भुक्या, कंगाल देवाला
रोज नैवेद्य दाखवा
सोडा व्यभिचार, मग
ढोल अब्रूचे वाजवा

—श्याम सोनारे

आटापिटा—

जीव जोजविणे
वृथा आटापिटा
वळलेल्या वाटा
मरणाशी.

सुख सोसण्याची
उगा आशा ओली
दुःखाची सावुली
मागोमाग.

वितळते मन
आपोआप सारे
तृप्तीचे निखारे
राख राख.

कुणी आडवावे
चालते रहाट
पेटलेले पोट
पिळूनिया.

काय दिसे कुणा ?
काळाचा आरसा
डोळीयाच्या नसा
ताणूनिया.

हवे तेव्हा येते
जिद्दीने मरण
व्हावया सरण
अस्तित्वाचे.

—कल्याण इनामदार

आठवणी

आठवणी
लक्षलक्ष. नक्षत्रासारख्या अगण्य.
विसरू म्हटले तरी
न विसरता येण्याइतक्या वज्रलेप.

आठवणीच आठवणी
निळचा जांभळचा हिर्व्या जास्वंदी
काही सोनेरी काही करवंदी
काही दवस्नात बटमोगऱ्यासारख्या प्रसन्न पांढऱ्या
काही खळाळत्या निर्मळ निर्झरासारख्या नाचऱ्या
काही पारोशा काही शुचिर्भूत
काही गोड काही आंबट
काही तर ठार कडू जहरासारख्या.

आठवणींची ही कोरीव लेणी
काही देखणी काही जीवघेणी !

बुद्धाच्या आठवणी युद्धाच्या आठवणी
रजस्वला द्रौपदीची दुःशासनाने खेचलेली वेणी
अपहृत सीतेच्या डोळयात न मावलेले पाणी..

आठवणीच आठवणी
चंगीझखान आणि ऑर्किमिडीज यांना
वेगवेगळ्या दुव्यात ओवणाऱ्या
अंगठी हरवल्यावर शकुंतलेला भोवणाऱ्या...
कधीकधी याच आठवणींच्या इंद्रायणीमधून
बुडवलेला गाथा वर येतो
सह्याद्रीची आठवण होताच
तुडवलेला माथा उन्नत होतो !

केव्हाकेव्हा आठवणी खेचून नेतात
माओपासून हिटलर आणि गांधीपासून चर्चिलपर्यंत
दाखवितात काळाचा पडदा उचलून—
बेचाळिसचे अमर समर...
हिरोशिमावर घोंघावलेले प्रळयाचे अंध वादळ...
टोकियोकडे झेपावताना विमानातच विरलेले नेताजी...
फाळणीच्या चाळणीमधून गाळून आलेले द्विखंड स्वातंत्र्य
झेलमने झेललेल्या निर्वासित किंकाळ्या...
तोडलेला आक्रमक गिधाडांनी कश्मिरचा सुग्रास लचका
नेफा–लडाखची चिरफाळलेली छाती...
अखेर लाहोर–सियालकोटच्या दिशांनी
आमच्या अस्मितेची वज्र–धडक !...

आठवणी वाचून दाखवितात
मानवाला अभय देणारी राष्ट्रसंघाची मूलतत्वे
आणि ठेवतात हलकेच हातात
ताश्कंदचे घोषणापत्र...
(व्हिएटनाम मात्र धगधगतच असते !)

कितीकिती आठवणी
नेहरूंची आठवण शास्त्रींची आठवण
टागोरांची आठवण, केनेडीची आठवण
भास, भवभूति आणि कालिदासाची आठवण...

आठवणी
इतिहासाच्या अंधाऱ्या गुहेत
रहस्य बनून वावरणाऱ्या शिलालेखासारख्या
काही ताजमहालप्रमाणे चांदण्यात हुरहुरणाऱ्या
काही फुलपाखरासारख्या फुलाफुलावर थरथरणाऱ्या
काही मातेच्या अंकावर बाळमूठ चोखणाऱ्या
अर्भकासारख्या
काही आरतीत तेवणाऱ्या वत्सल निरांजनासारख्या
काही प्रार्थनेप्रमाणे गंभीर, क्रुसाप्रमाणे कासावीस
काही उंचनिंच चढलेल्या झोक्यासारख्या स्वप्निल
काही राजस काही लालस काही मदालस
काही निखालस निर्मळ तुझ्या नेत्रासारख्या

आठवणी
न संपणाऱ्या
लक्षलक्ष. नक्षत्रासारख्या अगण्य.
विसरू म्हटले तरी
न विसरता येण्याइतक्या वज्रलेप.

—उ. रा. गिरी

पराभवाचे सहा अभंग

१

आजवरी प्यालो आपुलेच रक्त
मीच माझा अन्त : पाहियला
आता मज देशी रेशमाचा शेला
फाटक्या देहाला : झाकावया
किती रे उशीरा आली तुज जाग
काय उपयोग : मेल्यावरी

२

नव्या पाहुण्याचा नसे मज हर्ष
नियतीचे पाश : ओळखीचे
मागल्या खेपेस पाहिला अंधार
माती झाले घर : आघाताने
म्हणूनि उदास बैसलो दारात
नाही जाणवत : जिव्हाळाहि

३

किती तरी वेळा केला मीच यत्न
फाटके जीवन : सांवण्याचा
हरएक वेळा आले अपयश
घट्ट झाले पाश : मरणाचे

४

नाकारती पाय चालायचे पुढे
स्वप्नांचीच झाडे : वठलेली
अजूनहि माझे दूर हे क्षितिज
डोळियात निज : अकालीच

५

अर्ध्यावरी आलो रेटत प्रवास
काटयांचे आकाश : ओंजळीत
अजूनि उरले तितुके चालणे
कंठामध्ये गाणे : अडलेले

६

सारेच फसले जीवनाचे डाव
काळजात घाव : ठायी ठायी
कुठूनिया आणू जगण्याचे बळ
रक्ताचे ओहळ : सुकलेले

—कुसुमानंद

प्रेरणा

निळ्या नभातुन चंद्र चालला
शुभ्र ढगांवर सांडित किरणे
पण ओठांना सुचे न माझ्या
आज कोणचे गावे गाणे.

गुपित फुलांचे कशी अकलतिल
थरथरत्या वेलींची पाने
त्यांच्याही तर कुशीत शिरली
चिंब होवुनी दवात किरणे.

शांत किनारा लाट नाचरी
खडकांवरती फुटे चांदणे
पण डोळ्यांना रुचे न माझ्या
आज रुपेरी नवीन स्वप्ने.

शंकर विटणकर

निराकार

नाजूक हाताने दिला जर असता एक–एक
एक–एक
घाव
हाती जपून खेळवलेल्या सुवर्णकारी छिन्नीने
तर मऊ संगमर्मरातून
मोहमयी मूर्ती
साकारली असती !
हात नाजूक···मूर्ती नाजूक
वेचक···सारेच नाजूक !
म्हणजे घावही नाजूक !
पण एकदा सारे उचलले
फेकून दिले.
उघडा मी दगड असा
तुझ्या एका घावासाठी...
याला आकार नाही...
(आकारपूर्ण चेंदामेंदा असतो हां !)
याला रेखा नाही...
याला म्हणतात चिखल...
तू तुडवत जा...
तुझी पाऊले स्वच्छ राहोत !

भा. ज. कविमंडन

पुस्तक परीक्षण

पौराणिक भागवतधर्म

[लेखक : डॉ. शं. दा. पेंडसे, नागपूर; प्रकाशक : व्हीनस प्रकाशन, पुणे.

संतवाङमयाचे गाढे अभ्यासक, प्रभावी वक्ते आणि व्यासंगी विद्वान् डॉ. शं. दा. पेंडसे यांनी गेल्या चार–पाच वर्षांत भागवत धर्माच्या उत्कर्षापकर्षाचा इतिहास लिहिण्याचे अत्यन्त परिश्रमाचे काम हाती घेऊन बहुमोल संशोधनात्मक असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी 'वैदिक वाङमयातील भागवत धर्माचा विकास' हा पहिला ग्रंथ त्यांनी दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. त्याचा परिचय 'युगवाणी'मध्ये त्यावेळी आम्ही करून दिला होता. आता प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या ग्रंथाचाही परिचय आम्ही करून द्यावा अशी ग्रंथकर्त्याची इच्छा असल्यामुळे तो येथे यथामति करीत आहो.

पहिल्या ग्रंथात भग या प्राचीन आदित्य किंवा सौर देवापासूनच सविता, सूर्य आणि विष्णू या क्रमाने वैदिक भागवत धर्माचा विकास झाल्याचे डॉ. पेंडसे यांनी दाखविले होते. भग देवापासून हा धर्म निघाल्यामुळे त्याला भागवत अशी संज्ञा मिळाली. तेव्हा हा मूळचा सौरपंथ आहे असे त्यांनी प्रतिपादिले होते. विष्णु ही देवता मूळची सूर्यद्योतक होती यात संशय नाही. ऋग्वेदात विष्णु देवाचे वर्णन सूर्यरूपानेच आले आहे. त्या वर्णनात विष्णूच्या अवतारातील विशेष, उदाहरणार्थ त्याच्या तीन पावलांनी आकाश आक्रमणे इत्यादी, आढळतात. विष्णूच्या अत्युच्च पदात मधाचा झरा आहे (विष्णोः पदे परमे मध्व उत्सः) इत्यादी वर्णनावरून नंतरची विष्णुलोकातील सुखोपभोगांची कल्पना उत्पन्न झाली असावी. तथापि या धर्मपंथाला 'भागवत' हे नाव तो भग देवापासून उत्पन्न झाला म्हणून मिळाले हे मात्र आम्हास पटत नाही. याचे कारण वेदात खुद्द भग देवालाच भगवान् असे म्हटले आहे. 'भग एव भगवानस्तु देवाः।' ही डॉ. पेंडसे यांनीच उल्लेखिलेली ऋचा (ऋग्वेद ७–४१–५) पाहा. पुढे ह्याच ऋचेत भग देवाच्या कृपेने आपण 'भगवान्' व्हावे अशी प्रार्थना केली आहे. त्या सूक्ताच्या इतर ऋचांतही आपण 'भगवान्' व्हावे (उतेदानीं भगवन्तः स्याम।) अशी वसिष्ठांची प्रार्थना आली आहे. भगवान् म्हणजे धनवान् किंवा ऐश्वर्यवान्. तेव्हा भगवान् शब्दाचा भग देवाशी संबंध नसून त्या दोन शब्दांतील उच्चारसाम्य योगायोगाने आले आहे असे डॉ. सुशीलकुमार दे यांच्याप्रमाणे आम्हासही वाटते. पुढे भगवान् म्हणजे ऐश्वर्यादि गुणयुक्त देव आणि भागवत म्हणजे त्याचा उपासक असे अर्थ रूढ झाले. यामुळेच 'भागवत' शब्दाने केवळ विष्णूपासकांचाच बोध होत नव्हता, तर शिवोपासकांसही ती संज्ञा लावत, हे आम्ही पूर्वी पातंजल महाभाष्यातील 'शिवभागवताः' (भगवान् शंकराचे उपासक) या उदाहरणावरून दाखविले होते. पुढे मात्र 'भागवत' शब्दाने मुख्यतः विष्णूपासकांचा बोध होऊ लागला असे दिसते.

याप्रमाणे 'भागवत' संज्ञेच्या व्युत्पत्तीविषयी आमचा मतभेद असला तरी भागवत पंथ आरंभी सूर्योपासक होता यात संशय नाही. या पंथातील दैवत विष्णु हे मूळचे सूर्याचे रूप असून पुढे ब्राह्मण काळात त्याचे यज्ञाशी ऐक्य प्रस्थापित होऊन इतर वैदिक देवतांच्या तुलनेने त्याला प्राधान्य प्राप्त झाले हे डॉ. पेंडसे यांनी आपल्या पहिल्या ग्रंथात सविस्तर दाखविले होते. प्रस्तुत ग्रंथात पौराणिक कालात भागवत धर्माचा विकास कसा झाला याचा इतिहास दिला आहे.

या पौराणिक भागवत धर्माविषयी अनेक प्रश्न वादग्रस्त आहेत. या धर्मात भक्तीचा समावेश केव्हा झाला, या धर्माचा मूळ ग्रंथ जी भगवद्‌गीता तिच्यातील प्रतिपाद्य धर्माचा वैदिक धर्माशी संबंध आहे काय, गीतेचा काल कोणता, ती एकाच कालात रचली गेली किंवा तिचे भाग भिन्न भिन्न काली रचले होते, महाभारतात वर्णिलेला नारायणीय धर्म मूळचा कोठला, त्याचे गीतेशी साम्य व भेद, भागवत धर्माचे इतर दोन प्रमाणभूत ग्रंथ विष्णुपुराण व भागवतपुराण यांचा काळ कोणता, त्यांत प्रक्षेप आहेत काय, त्यांची शिकवण कोणती, भागवत धर्मात कालपरत्वे झालेला बदल व त्याचा परिणाम, भागवत धर्माच्या परंपरा—इत्यादि अनेक प्रश्नांचे साधार व संपूर्ण विवेचन डॉ. पेंडसे यांनी या ग्रंथात चिकित्सक पद्धतीने केले आहे. त्याकरिता अनेक संस्कृत ग्रंथ तसेच पूर्वगामी संशोधकांचे ग्रंथ व संशोधनपर नियतकालिकांतील लेख यांचा सखोल अभ्यास करून त्यांनी आपली मते निश्चित केली आहेत आणि ती सुबोध रीतीने प्रस्तुत ग्रंथात मांडली आहेत. या सर्वच प्रश्नांविषयी विवेचन येथे करणे शक्य नाही. तथापि त्यांच्या काही सिद्धांतांचा निर्देश करून चर्चा करू.

भगवद्‌गीतेचा उपदेष्टा भगवान् कृष्ण याचा उल्लेख वैदिक वाङ्मयात येत नाही. पण काही संशोधकांच्या मते छांदोग्यउपनिषदात घोर आंगिरसाच्या शिष्य म्हणून ज्या देवकीपुत्र कृष्णाचा उल्लेख आहे तोच भगवद्‌गीतेचा उपदेष्टा असावा. डॉ. पेंडसे यांना हे ऐक्य मान्य आहे. ते म्हणतात, " छांदोग्यांत घोर आंगिरसाने कृष्णाला जे 'यज्ञदर्शन' शिकविले, म्हणजे पुरुषाचे जीवन हाच एक यज्ञ असून त्याची सांगता 'तप, दान, आर्जव आणि सत्यवचन' यांच्या आमरण आचरणरूपी दक्षिणेने होते व अशा जीवनाची समाप्ती म्हणजेच अवभृथ स्नान आहे असे रूपकात्मक भाषेत जे सांगितले त्याचाच विस्तार गीतेत यज्ञदानतपःकर्माचे महत्त्व परोपरीने सांगून श्रीकृष्णाने केला असल्यामुळे छांदोग्यातील देवकीपुत्र कृष्ण हाच गीतेचा मूळ उपदेष्टा असला पाहिजे. " (पृ. ४५) हे ऐक्य लो. टिळकांस संमत नव्हते. डॉ. दे वगैरेंनाही ते मान्य नाही. डॉ. पेंडसे यांनी त्याला उपोद्बलक असे वरील प्रमाण मोठ्या कुशलतेने मांडले आहे. पण हे ऐक्य त्यांच्या दुसऱ्या एका सिद्धांताला विरोधी दिसते. कसे ते पाहू.

डॉ. पेंडसे यांच्या मते गीतेचे मूळचे पहिले तीनच अध्याय होते. या अध्यायात बीजरूपाने मांडलेल्या गोष्टींचाच विस्तार भारताचे महाभारत झाले त्या काळात, पुढील अध्याय रचून करण्यात त्याला असे त्यांनी म्हटले आहे. पण तसे असेल तर यज्ञ, दान, तप, इत्यादिकांचे महत्त्व सांगणारा देवकीपुत्र कृष्णाच्या शिकवणीचा भाग पहिल्या तीन अध्यायांत यावयास पाहिजे होता. तो पुढे सतराव्या अठराव्या अध्यायात कसा आला ही अडचण पुढे येते. असो. गीतेतील प्रक्षिप्त भाग दाखविण्याचा प्रयत्न यापूर्वीहि डॉ. गार्बे वगैरेंनी केला होता आणि अलीकडे डॉ. खैर यांनीही केला आहे. तथापि 'भारताचे जेव्हा महाभारत झाले तेव्हा मूळ गीतेत तदर्थपोषक अशा काही सुधारणा झाल्या असल्या तरी गीतेचे एकंदर स्वरूप तेव्हाहि बदलले नाही' असे टिळकांचे मत होते व ते डॉ. रानडे, डॉ. बेलवलकर वगैरेंनी मान्य केले आहे. गीतेचे स्वरूप सर्व संग्राहक असल्यामुळे तिच्यांत प्रक्षेप असावे अशी अभ्यासकांची कल्पना होते.

डॉ. पेंडसे यांनी गीतेच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करताना अनेक मौलिक विचार मांडले आहेत. त्यांपैकी कांही असे आहेत—

(१) कर्मयोगाने चित्त शुद्ध होऊन आत्मज्ञानामुळे ज्या कर्मयोग्यांना समत्वबुद्धि प्राप्त झाली त्यांना ब्रह्मैक्यरूप मोक्ष मिळतो. व अशा रीतीने कर्मयोग ज्ञानयोगात पर्यवसित होऊन परंपरेने मोक्षाला कारणीभूत होतो असे गीतेचे मत दिसते. शास्त्रीय परिभाषेत याला ज्ञानकर्म–समन्यय म्हणतात. ज्ञानकर्म–समुच्चय म्हणत नाहीत. (पृ. १५०)

(२) ईश्वराचे अज, अव्यय, अव्यक्त, परस्वरूप जाणणे हें ज्ञान आणि त्याचे विश्वरूपाने किंवा मानवी अवताररूपाने व्यक्त झालेले, कांही काळ राहून अव्यक्तात विलीन होणारे स्वरूप जाणणे हे विज्ञान (पृ. २०१).

(३) निर्गुणोपासकांना मिळणारी ब्रह्मैक्याची मुक्ती ईश्वराच्या सगुण स्वरूपाची उपासना करणाऱ्या सगुण भक्तांना मिळते असे दिसत नाही.....ते ईश्वराशी एकरूप नव्हे तर समानधर्म होतात असे दिसते. (पृ. १४२)

(४) गीतेचे 'यज्ञचक्रप्रवर्तन' कर्मप्रधान आहे. त्याच्या विरुद्ध बुद्धाने नंतर 'धर्मचक्रप्रवर्तन' करून संन्यासप्रधान तत्त्वज्ञान प्रचलित केले. (पृ. १७२)

(५) यज्ञ व याग हे यज्ञाच्या जुन्या व नव्या पद्धतीचे निदर्शक शब्द आहेत. पशुहवन ज्यात होते ते यज्ञ आणि ते ज्यांत होत नाही ते याग होत. (पृ, ७१) (पण गीतेत दोघांसही यज्ञ म्हटले आहे,)

डॉ. पेंडसे यांनी तिसऱ्या प्रकरणांत श्रीमद्भगवद्गीतेच्या विविध प्रश्नांचे सांगोपांग विवेचन करून त्यातील अठराही अध्ययांतील विषयांची सविस्तर चर्चा केली आहे. प्रस्तुत पुस्तकाचा हा गाभा असून त्याने १७५ पाने व्यापली आहेत,

चौथ्या प्रकरणात नारायणीय धर्माची चर्चा केली आहे. मुळात हा संप्रदाय स्वतंत्र असून त्यात एकान्त भक्तीला प्राधान्य होते. पुढे भागवत संप्रदायांत विलीन झाल्यावर त्यालाच पुढे भागवत, पांचरात्र, एकांतिन, सात्वत असे म्हणू लागले. या संप्रदायाचे आचरण करणारे पुरुष क्षीरसागराच्या उत्तरेला श्वेतद्वीपाच्या प्रदेशात नारदाला दिसले. हा प्रदेश कोणता हे एक कोडे आहे. काहींच्या मते तो गौरकाय ख्रिस्ती लोकांचा प्रदेश असावा. डॉ. रामकृष्ण भांडारकरांनी त्याला स्वर्ग मानले आहे. डॉ. पेंडसे यांनी तो 'भारताच्या उत्तरेला मेरु पर्वतापलीकडे असणारा उत्तरध्रुवाचा प्रदेश आहे' हे श्री. रा. के. प्रभु यांचे मत उद्धृत केले आहे आणि ते 'महत्त्वाचे व विचारणीय आहे' असे म्हटले आहे (पृ. ३१३). नारायणीय धर्माने देवपूजा, पितृपूजा आणि पंचमहायज्ञ यांचा पुरस्कार केला तथापि त्याचा कल कर्मापेक्षा भक्तीकडे अधिक आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. त्यांनी या धर्माच्या नारद पांचरात्र व ज्ञानामृतसार या ग्रंथांविषयीही संक्षिप्त माहिती दिली आहे.

भागवत धर्मात भगवद्गीतेवरोबर 'विष्णुपुराण आणि भागवतपुराण यांनाही प्रमाण मानण्यात येते. प्रस्तुत ग्रंथाचे पाचवे व सहावे प्रकरण यात या दोन पुराणांविषयी सविस्तर चर्चा केली आहे. विष्णुपुराणातील तत्त्वज्ञान जीव-जगत्-जगदीश्वर यांच्या अद्वैताचा पुरस्कार करते. त्यात मायावादाचा उपयोग केला आहे. या पुराणाचा काल डॉ. पेंडसे यांच्या मते इ. सनापूर्वीचा आहे. म्हणून ते म्हणतात, 'शंकराचार्यांनी हा भ्रान्तिवाद किंवा अध्यासवाद नवा काढलेला नाही किंवा त्यांच्यापासून तो आलेला नाही.' (पृ. ३३२). विष्णुपुराण हे वरेच प्राचीन असले तरी ते इतके पूर्वीचे असावे असे वाटत नाही. पार्जीटरच्या मते त्याचा काळ ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकानंतरचा असावा. विंटर्निट्झच्या मते ते यापेक्षा नंतरचे नसावे. या पुराणावरून डॉ. पेंडसे यांनी निष्कर्ष काढला आहे की 'विष्णुपुराणाचा वैष्णव धर्म हा वैदिक भागवत किंवा वैष्णव धर्माचा मुख्य प्रवाह आहे. त्यामुळे त्यातील भक्तीचे स्वरूप भगवद्गीतेप्रमाणेच यज्ञकर्मप्रधान आहे. . . . . वैष्णव धर्मातील कर्मप्रधान भक्तीचे वैदिक स्वरूप त्याने गीतेपेक्षाही अधिक स्पष्टपणे सांगितले आहे (पृ. ३३६). शेवटच्या सहाव्या प्रकरणात भागवतपुराणविषयक प्रश्नांची चर्चा केली आहे. या पुराणाला सध्याचे स्वरूप इ. स. पूर्व पहिल्या दुसऱ्या शतकात प्राप्त झाले असे डॉ. पेंडसे म्हणतात (पृ. ३७५). इतरांच्या मते हे पुराण पुष्कळच नंतरचे आहे. लो. टिळक यांनी तर या पुराणाला पुरणपोळीची उपमा दिली आहे.

या पुराणात कर्म आणि ज्ञान यांच्यापेक्षाही भक्तीला श्रेष्ठता दिली आहे. याचा उद्‌गम दक्षिणेत झाला असावा. एका श्लोकात भक्ति सांगते—

> उत्पन्ना द्राविडे साहं वृद्धिं कर्णाटके गता ।
> क्वचित्क्वचिन्महाराष्ट्रे गुर्जरे जीर्णतां गता ।।

डॉ. पेंडसे म्हणतात 'या रूपकाचा अर्थ स्पष्ट आहे. द्रविड देशातील या भक्तीचे वैशिष्ट्य असे की, ती ज्ञान व वैराग्य यांनी युक्त आहे. यापूर्वीची उत्तरेकडील भक्ति ज्ञान आणि कर्मयुक्त होती तर द्रविड देशातील भक्ति ज्ञान आणि वैराग्य यांनी युक्त आहे. भक्ति ऐनजिनसी द्रविड देशात उत्पन्न झालेली नाही तर ज्ञानवैराग्ययुक्त भक्ति ही द्रविड देशात उत्पन्न झाली आहे. तामिळनाडमधील ही भक्ति कर्नाटकात वाढली पण महाराष्ट्रात या ज्ञानवैराग्ययुक्त भक्तीला सर्वत्र स्थान मिळाले नाही. क्वचित् क्वचित् मिळाले. गुजराथेत जैन धर्माचा पगडा असल्यामुळे तेथे तर ही भक्ति खण्डितच झाली (पृ. ३८४).

"विष्णुपुराणाप्रमाणाचेच भागवत पुराणातील तत्त्वज्ञान सगुण निर्गुणाचे, जीव–जगत्–जगदीश्वराचे अद्वैत प्रतिपादन करणारे आणि द्वैताची भ्रामकता व मायिकता सांगणारे आहे. तथापि कालान्तराने भक्तीचे श्रेष्ठत्व मान्य असणाऱ्या अद्वैती–द्वैती–विशिष्टाद्वैती सर्व तात्त्विक संप्रदायांचा समावेश होईल अशी त्याची रचना करण्याचा प्रयत्न केला गेला" (पृ. ३९१).

पुढे त्यात सत्संगाला महत्त्व देण्यात येऊन त्याचे पर्यवसान कृष्णाच्या रासक्रीडेच्या वर्णनात झाले असे डॉ. पेंडसे यांनी दाखविले आहे (पृ. ४२६). ते म्हणतात, "सत्संगाच्या या अर्थवादात्मक अतिशयोक्त स्तुतीने पुढे केवढा अनर्थं घडवून आणला, जाराशी रममाण होणाऱ्या या गोपींची राधा ही प्रतिनिधी कशी झाली आणि ईश्वरभक्तीच्या नावाखाली व्यभिचार सुरू होऊन काही प्रदेशांत भागवत धर्माचा अधःपात कसा झाला हे सर्वप्रसिद्ध आहे. या अनर्थाची बीजे भागवतात आहेत." (पृ. ४२७).

भागवताने प्रतिपादिलेल्या संन्यास-वैराग्यप्रधान भक्तीचे नंतर तांत्रिक भक्तीत आणि मूर्तिपूजेत पर्यवसान झाले. याविषयी डॉ. पेंडसे यांनी पुढील तळमळीचे उद्‌गार काढले आहेत—'विश्वव्यापक परमेश्वर मंदिरात' येऊन शिलामूर्तीइतका संकुचित झाला. भूतमात्रात असणाऱ्या निराकार अव्यक्त भगवंताची कर्तव्यकर्मांनी होणारी गीतेतील भक्ती मागे पडली आणि सामाजिक कर्तव्यकर्माकडे दुर्लक्ष करणारी जडमूर्तीची, तिलाच परमेश्वर समजून पूजा चालू झाली. प्रचण्ड मंदिरे आणि त्यांतील मूर्तींची, नानाविध भोग चढवून, ऐश्वर्ययुक्त उपचारांनी केली जाणारी अहर्निश पूजा यांना महत्त्व आले. जिवंत दरिद्रनारायण बाजूला पडले आणि घरादारात तांत्रिक मूर्तिपूजा करू लागले. मूर्तिपूजा ही केवळ ध्यानाकरिता केलेल्या ईश्वराच्या प्रतीकाची आहे हे जेव्हा विसरले जाते आणि मूर्ती म्हणजेच परमेश्वर बनतो, तेव्हा खरा सर्वव्यापक परमेश्वर गुप्त होऊन मूर्तिपूजेचा विपर्यास होतो (पृ. ४५४). या उद्‌गारांवरून धार्मिक सुधारणेची दिशा ध्यानात येईल.

यानंतर भागवतपुराणात तीर्थयात्रा, श्राद्धे, व्रते यांचा कसा विस्तार केला आहे हे दाखवून त्यांचे पर्यवसान सामाजिक निष्क्रियतेत कसे झाले हे सांगितले आहे. त्याप्रमाणेच भागवतात सांगितलेल्या भक्तिज्ञानवैराग्याच्या आधारे सर्वधर्मपरित्याग करून संन्यासाचा पुरस्कार करणाऱ्या महानुभाव पंथाचा प्रसार कसा झाला हेही दाखविले आहे आणि डॉ. कोलते यांचे त्या पंथाविषयी खालील उद्‌गार उद्‌धृत केले आहेत— 'महानुभाव पंथ निवृत्तीच्या एका टोकाला गेला आहे. त्यापेक्षा संसारात राहून परमार्थ साधन करण्याचा सामान्य जनतेला देखील आचरणात आणता येईल असा उपदेश करणारा भागवतधर्म एका दृष्टीने श्रेष्ठ म्हणता येणार नाही काय ?' (पृ. ४६०)

शेवटी उपसंहार करताना डॉ. पेंडसे यांनी भागवत धर्माच्या दोन परंपरांचा उल्लेख केला आहे. 'एक परंपरा भगवद्‌गीतेची व विष्णुपुराणाची आहे आणि दुसरी नारायणीय धर्माची व भागवतपुराणाची आहे. पहिली परंपरा ही विश्वव्यापक निर्गुण निराकार परमेश्वराच्या कर्मप्रधान भक्तीची आहे. दुसरी परंपरा सगुण साकार परमेश्वराच्या संन्यासप्रधान भक्तीची आहे. दुसऱ्या परंपरेतील भागवतपुराणाची लोकप्रियता महाराष्ट्रात कधीच कमी झाली नाही. पण ज्ञानेश्वरांनी भगवद्‌गीतेच्या परंपरेचा प्रभावी स्वरूपात पुनरुद्धार केल्यामुळे दुसऱ्या परंपरेच्या अनिष्ट परिणामांना आळा बसला यात शंका नाही.' (पृ. ४६३).

येथे करून दिलेल्या संक्षिप्त परिचयावरून डॉ. पेंडसे यांच्या प्रस्तुत ग्रंथाच्या स्वरूपाची कल्पना येईल. डॉ. सुशील कुमार दे व डॉ. राय चौधरी यांचे वैष्णव किंवा भागवत धर्माच्या विकासासंबंधी ग्रंथ इंग्रजीत उपलब्ध आहेत. पण सर्व उपलब्ध माहिती साक्षेपाने जमवून आणि तिचा चिकित्सक रीतीने उपयोग करून लिहिलेले डॉ. पेंडसे यांचे हे दोन ग्रंथ मराठीत पहिलेच आहेत आणि त्यांच्या योगे मराठी धर्मविषयक चिकित्सक वाङ्मयात मोलाची भर पडली आहे यात संशय नाही.

प्रस्तुत ग्रंथात डॉ. पेंडसे यांनी भागवत धर्माचा विकास यादवकालाअखेरपर्यंत आणला आहे. यापुढे महाराष्ट्रात तो धर्म कसा प्रसार पावला आणि त्याचे स्वरूप कसे झाले याचे वर्णन करावयाचे आहे. तेही करण्याचा मनोदय डॉ. पेंडसे यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी प्रकट केला आहे. ते म्हणतात, 'सगुण-निर्गुणाच्या एकतेच्या बळकट पायावर भगवद्‌गीता व भागवत यांतील प्रवृत्तिनिवृत्तींचा सुंदर समन्वय करून (ज्ञानदेव, एकनाथ, रामदास, नामदेव, वामनपंडित व तुकोबा) या सहा थोर पुरुषांनी भागवत धर्माच्या उन्नत स्वरूपाचे भव्य मंदिर महाराष्ट्रात कसे उभारले याचा स्फूर्तिप्रद इतिहास आता पहावयाचा आहे. (पृ. ४६४). डॉ. पेंडसे यांचा संतवाङ्मयाचा अभ्यास

(५) यज्ञ व याग हे यज्ञाच्या जुन्या व नव्या पद्धतीचे निदर्शक शब्द आहेत. पशुहवन ज्यात होते ते यज्ञ आणि ते ज्यांत होत नाही ते याग होत. (पृ, ७१) (पण गीतेत दोघांसही यज्ञ म्हटले आहे,)

डॉ. पेंडसे यांनी तिसऱ्या प्रकरणांत श्रीमद्भगवद्गीतेच्या विविध प्रश्नांचे सांगोपांग विवेचन करून त्यातील अठराही अध्ययांतील विषयांची सविस्तर चर्चा केली आहे. प्रस्तुत पुस्तकाचा हा गाभा असून त्याने १७५ पाने व्यापली आहेत,

चौथ्या प्रकरणात नारायणीय धर्माची चर्चा केली आहे. मुळात हा संप्रदाय स्वतंत्र असून त्यात एकान्त भक्तीला प्राधान्य होते. पुढे भागवत संप्रदायांत विलीन झाल्यावर त्यालाच पुढे भागवत, पांचरात्र, एकांतिन, सात्वत असे म्हणू लागले. या संप्रदायाचे आचरण करणारे पुरुष क्षीरसागराच्या उत्तरेला श्वेतद्वीपाच्या प्रदेशात नारदाला दिसले. हा प्रदेश कोणता हे एक कोडे आहे. काहींच्या मते तो गौरकाय ख्रिस्ती लोकांचा प्रदेश असावा. डॉ. रामकृष्ण भांडारकरांनी त्याला स्वर्ग मानले आहे. डॉ. पेंडसे यांनी तो 'भारताच्या उत्तरेला मेरु पर्वतापलीकडे असणारा उत्तरध्रुवाचा प्रदेश आहे' हे श्री. रा. के. प्रभु यांचे मत उद्धत केले आहे आणि ते 'महत्त्वाचे व विचारणीय आहे' असे म्हटले आहे (पृ. ३१३). नारायणीय धर्माने देवपूजा, पितृपूजा आणि पंचमहायज्ञ यांचा पुरस्कार केला तथापि त्याचा कल कर्मापेक्षा भक्तीकडे अधिक आहे असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. त्यांनी या धर्माच्या नारद पांचरात्र व ज्ञानामृतसार या ग्रंथांविषयीही संक्षिप्त माहिती दिली आहे.

भागवत धर्मात भगवद्गीतेवरोवर विष्णुपुराण आणि भागवतपुराण यांनाही प्रमाण मानण्यात येते. प्रस्तुत ग्रंथाचे पाचवे व सहावे प्रकरण यात या दोन पुराणांविषयी सविस्तर चर्चा केली आहे. विष्णुपुराणातील तत्त्वज्ञान जीव-जगत्-जगदीश्वर यांच्या अद्वैताचा पुरस्कार करते. त्यात मायावादाचा उपयोग केला आहे. या पुराणाचा काल डॉ. पेंडसे यांच्या मते इ. सनापूर्वीचा आहे. म्हणून ते म्हणतात, 'शंकराचार्यांनी हा भ्रान्तिवाद किंवा अध्यावाद नवा काढलेला नाही किंवा त्यांच्यापासून तो आलेला नाही.' (पृ. ३३२). विष्णुपुराण हे बरेच प्राचीन असले तरी ते इतके पूर्वीचे असावे असे वाटत नाही. पार्जीटरच्या मते त्याचा काळ ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकानंतरचा असावा. विंटर्निट्झच्या मते ते यापेक्षा नंतरचे नसावे. या पुराणावरून डॉ. पेंडसे यांनी निष्कर्ष काढला आहे की 'विष्णुपुराणाचा वैष्णव धर्म हा वैदिक भागवत किंवा वैष्णव धर्माचा मुख्य प्रवाह आहे. त्यामुळे त्यातील भक्तीचे स्वरूप भगवद्गीतेप्रमाणेच यज्ञकर्मप्रधान आहे. . . . .वैष्णव धर्मातील कर्मप्रधान भक्तीचे वैदिक स्वरूप त्याने गीतेपेक्षाही अधिक स्पष्टपणे सांगितले आहे (पृ. ३३६). शेवटच्या सहाव्या प्रकरणात भागवतपुराणविषयक प्रश्नांची चर्चा केली आहे. या पुराणाला सध्याचे स्वरूप इ. स. पूर्व पहिल्या दुसऱ्या शतकात प्राप्त झाले असे डॉ. पेंडसे म्हणतात (पृ. ३७५). इतरांच्या मते हे पुराण पुष्कळच नंतरचे आहे. लो. टिळक यांनी तर या पुराणाला पुरणपोळीची उपमा दिली आहे.

या पुराणात कर्म आणि ज्ञान यांच्यापेक्षाही भक्तीला श्रेष्ठता दिली आहे. याचा उद्गम दक्षिणेत झाला असावा. एका श्लोकात भक्ति सांगते—

> उत्पन्ना द्राविडे साहं वृद्धिं कर्णाटके गता ।
> क्वचित्क्वचिन्महाराष्ट्रे गुर्जरे जीर्णतां गता ।।

डॉ. पेंडसे म्हणतात 'या रूपकाचा अर्थ स्पष्ट आहे. द्रविड देशातील या भक्तीचे वैशिष्टच असे की, ती ज्ञान व वैराग्य यांनी युक्त आहे. यापूर्वीची उत्तरेकडील भक्ति ज्ञान आणि कर्मयुक्त होती तर द्रविड देशातील भक्ति ज्ञान आणि वैराग्य यांनी युक्त आहे. भक्ति ऐनजिनसी द्रविड देशात उत्पन्न झालेली नाही तर ज्ञानवैराग्ययुक्त भक्ति ही द्रविड देशात उत्पन्न झाली आहे. तामिळनाडमधील ही भक्ति कर्नाटकात वाढली पण महाराष्ट्रात या ज्ञानवैराग्ययुक्त भक्तीला सर्वत्र स्थान मिळाले नाही. क्वचित् क्वचित् मिळाले. गुजराथेत जैन धर्माचा पगडा असल्यामुळे तेथे तर ही भक्ति खण्डितच झाली (पृ. ३८४).

"विष्णुपुराणाप्रमाणाचेच भागवत पुराणातील तत्त्वज्ञान सगुण निर्गुणाचे, जीव–जगत्–जगदीश्वराचे अद्वैत प्रतिपादन करणारे आणि द्वैताची भ्रामकता व मायिकता सांगणारे आहे. तथापि कालान्तराने भक्तीचे श्रेष्ठत्व मान्य असणाऱ्या अद्वैती–द्वैती–विशिष्टाद्वैती सर्व तात्त्विक संप्रदायांचा समावेश होईल अशी त्याची रचना करण्याचा प्रयत्न केला गेला" (पृ. ३९१).

पुढे त्यात सत्संगाला महत्त्व देण्यात येऊन त्याचे पर्यवसान कृष्णाच्या रासक्रीडेच्या वर्णनात झाले असे डॉ. पेंडसे यांनी दाखविले आहे (पृ. ४२६). ते म्हणतात, "सत्संगाच्या या अर्थवादात्मक अतिशयोक्त स्तुतीने पुढे केवढा अनर्थ घडवून आणला, जाराशी रममाण होणाऱ्या या गोपींची राधा ही प्रतिनिधी कशी झाली आणि ईश्वरभक्तीच्या नावाखाली व्यभिचार सुरू होऊन काही प्रदेशांत भागवत धर्माचा अधःपात कसा झाला हे सर्वप्रसिद्ध आहे. या अनर्थाची बीजे भागवतात आहेत." (पृ. ४२७).

भागवताने प्रतिपादिलेल्या संन्यास–वैराग्यप्रधान भक्तीचे नंतर तांत्रिक भक्तीत आणि मूर्तिपूजेत पर्यवसान झाले. याविषयी डॉ. पेंडसे यांनी पुढील तळमळीचे उद्गार काढले आहेत—'विश्वव्यापक परमेश्वर मंदिरात' येऊन शिलामूर्तीइतका संकुचित झाला. भूतमात्रात असणाऱ्या निराकार अव्यक्त भगवंताची कर्तव्यकर्मांनी होणारी गीतेतील भक्ती मागे पडली आणि सामाजिक कर्तव्यकर्माकडे दुर्लक्ष करणारी जडमूर्तीची, तिलाच परमेश्वर समजून पूजा चालू झाली. प्रचण्ड मंदिरे आणि त्यांतील मूर्तीची, नानाविध भोग चढवून, ऐश्वर्ययुक्त उपचारांनी केली जाणारी अहर्निश पूजा यांना महत्त्व आले. जिवंत दरिद्रनारायण बाजूला पडले आणि घरादारात तांत्रिक मूर्तिपूजा करू लागले. मूर्तिपूजा ही केवळ ध्यानाकरिता केलेल्या ईश्वराच्या प्रतीकाची आहे हे जेव्हा विसरले जाते आणि मूर्ती म्हणजेच परमेश्वर बनतो, तेव्हा खरा सर्वव्यापक परमेश्वर गुप्त होऊन मूर्तिपूजेचा विपर्यास होतो (पृ. ४५४). या उद्गारांवरून धार्मिक सुधारणेची दिशा ध्यानात येईल.

यानंतर भागवतपुराणात तीर्थयात्रा, श्राद्धे, व्रते यांचा कसा विस्तार केला आहे हे दाखवून त्यांचे पर्यवसान सामाजिक निष्क्रियतेत कसे झाले हे सांगितले आहे. त्याप्रमाणेच भागवतात सांगितलेल्या भक्तिज्ञानवैराग्याच्या आधारे सर्वधर्मपरित्याग करून संन्यासाचा पुरस्कार करणाऱ्या महानुभाव पंथाचा प्रसार कसा झाला हेही दाखविले आहे आणि डॉ. कोलते यांचे त्या पंथाविषयी खालील उद्गार उद्धृत केले आहेत— 'महानुभाव पंथ निवृत्तीच्या एका टोकाला गेला आहे. त्यापेक्षा संसारात राहून परमार्थ साधन करण्याचा सामान्य जनतेला देखील आचरणात आणता येईल असा उपदेश करणारा भागवतधर्म एका दृष्टीने श्रेष्ठ म्हणता येणार नाही काय?' (पृ. ४६०)

शेवटी उपसंहार करताना डॉ. पेंडसे यांनी भागवत धर्माच्या दोन परंपरांचा उल्लेख केला आहे. 'एक परंपरा भगवद्गीतेची व विष्णुपुराणाची आहे आणि दुसरी नारायणीय धर्माची व भागवतपुराणाची आहे. पहिली परंपरा ही विश्वव्यापक निर्गुण निराकार परमेश्वराच्या कर्मप्रधान भक्तीची आहे. दुसरी परंपरा सगुण साकार परमेश्वराच्या संन्यासप्रधान भक्तीची आहे. दुसऱ्या परंपरेतील भागवतपुराणाची लोकप्रियता महाराष्ट्रात कधीच कमी झाली नाही. पण ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेच्या परंपरेचा प्रभावी स्वरूपात पुनरुद्धार केल्यामुळे दुसऱ्या परंपरेच्या अनिष्ट परिणामांना आळा बसला यात शंका नाही.' (पृ. ४६३).

येथे करून दिलेल्या संक्षिप्त परिचयावरून डॉ. पेंडसे यांच्या प्रस्तुत ग्रंथाच्या स्वरूपाची कल्पना येईल. डॉ. सुशील कुमार दे व डॉ. राय चौधरी यांचे वैष्णव किंवा भागवत धर्माच्या विकासासंबंधी ग्रंथ इंग्रजीत उपलब्ध आहेत. पण सर्व उपलब्ध माहिती साक्षेपाने जमवून आणि तिचा चिकित्सक रीतीने उपयोग करून लिहिलेले डॉ. पेंडसे यांचे हे दोन ग्रंथ मराठीत पहिलेच आहेत आणि त्यांच्या योगे मराठी धर्मविषयक चिकित्सक वाङ्मयात मोलाची भर पडली आहे यात संशय नाही.

प्रस्तुत ग्रंथात डॉ. पेंडसे यांनी भागवत धर्माचा विकास यादवकालाअखेरपर्यंत आणला आहे. यापुढे महाराष्ट्रात तो धर्म कसा प्रसार पावला आणि त्याचे स्वरूप कसे झाले याचे वर्णन करावयाचे आहे. तेही करण्याचा मनोदय डॉ. पेंडसे यांनी प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटी प्रकट केला आहे. ते म्हणतात, 'सगुण-निर्गुणाच्या एकतेच्या बळकट पायावर भगवद्गीता व भागवत यांतील प्रवृत्तिनिवृत्तींचा सुंदर समन्वय करून (ज्ञानदेव, एकनाथ, रामदास, नामदेव, वामनपंडित व तुकोबा) या सहा थोर पुरुषांनी भागवत धर्माच्या उन्नत स्वरूपाचे भव्य मंदिर महाराष्ट्रात कसे उभारले याचा स्फूर्तिप्रद इतिहास आता पहावयाचा आहे. (पृ. ४६४). डॉ. पेंडसे यांचा संतवाङ्मयाचा अभ्यास

सर्वश्रुत आहे. त्यांच्या हातून भागवत धर्मविषयक हा तिसरा ग्रंथही लौकरचपूर्ण होऊन प्रकाशित होवो असें इच्छितो.

—डॉ. वा. वि. मिराशी

आखर—आंगण

[ले०—**मधुकर केचे**, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, कि. ४–५०]

आपल्या जमान्यात मधुकर केच्यांनी उत्कट कविता लिहिली. नंतर नितांतसुंदर व्यक्तिचित्रणं केलीं. 'गाडगे महाराज' ह्यासारखं अप्रतिम व्यक्तिचित्रण केच्यांनी केलं आहे.

केच्यांनी लिहिलेल्या ललित निबंधांतले १३ 'आखर–आंगण' मध्ये संग्रहित केले आहेत. मलपृष्ठ चारवर असलेल्या टीपेशी मी सहमत आहे. रूढ अर्थानं ह्या शब्दबंधांना 'ललित निबंध' म्हणणं म्हणजे केच्यांवर अन्याय होईल. पण दुसरं काय म्हणावं हाही एक प्रश्नच. निबंध, ललित निबंध ह्यांची व्याप्ती, मर्यादा, लक्षणं कोणती ह्याचा इथे प्रपंच नको.

पाटलाच्या घरात केच्यांनी लहानपण घालवलं. बालपण ते जगले अतिशय संवेदनशील मन घेऊन. लहानपणीचं 'लहानपण' केच्यांनी जोपासलं आणि आज ते 'जगणं' त्यांनी शब्दांकित केलं आहे.

१३ निबंधांतला उजवा–डावा ठरवणं कठिण. फरक पडायचा तो वाचकाच्या स्वतःच्या प्रकृतीचा. त्यातला एखादा अतिशय आवडेल, दुसरा तितकासा नाही. ललित निबंधांना श्रेष्ठत्व, कनिष्ठत्व ह्यांची परिमाणं नाहीत. मला स्वतःला 'आखरातल्या जागणाऱ्या रात्री' व 'पंगत्या वऱ्हाड' हे निबंध फार आवडले. 'पंगत्या वऱ्हाड' हे नावच मोठं गोड आहे. 'सालबर्डीचा रान चेहरा', 'आंगण', 'हरवलेली भापणे', 'मरण' वगैरे निबंध सुद्धा सुंदरच आहेत.

'विषय', 'उद्देश' असल्या भानगडी ललित निबंधात शोधू नयेत. भोवताल जसा केच्यांनी भोगला, पाहिला, त्यातला उत्कट वाटला तो शब्दांकित केला. लहानपणीचे सोबती, घरची माणसं, शाळा, मास्तर, गावकरी, त्यांच्या लकबी, खोडी, मानविंद्र, भांडणं, प्रेम, सहली आणि इतर अनेक प्रसंग, गावातल्या चालीरीती, वहिवाटी ह्या सगळ्या जिव्हाळ्यानं निबंधात आल्या आहेत. कधी त्रयस्थपणे, कधी एकवटून, कधी नाट्यपूर्णतेने हे सगळं शब्दबद्ध आलं आहे. कधी सरळ निवेदन, कधी संवाद आणि ह्या सगळ्यांना बांधून, भारून टाकणारी वऱ्हाडी बोली, आणि केचे लिहिणारे.

पु. ल. देशपांड्यांशी केच्यांची तुलना करायची नाही. तरी त्यांच्या लेखकपिंडातला सारखेपणा थोडासा जाणवतो. त्यावेळचं हिरवेपण हारवल्याची रुखरुख सतत आहे. लहानपणीचा हिरवा वैभवाचा काळ आणि आज आढळणारा करडा, रूक्ष काळ ह्यातला फरक बहुतेक निबंधांमध्ये आहे. देशपांड्यांसारखे केचे हलकाफुलका, खेळकर प्रसंग तितक्याच अवखळेपणे सांगतात आणि नंतर करुणाकडे, 'हारवल्या'कडे वळतात तेव्हा गंभीर, आर्द्र होतात, त्यांच्या निवेदनाला philosophic टच् येऊ पाहतो. 'टाळचांची वाक्यं टाकायची' त्यांनाही हौस आहे. पण वेळीच ते सावरतात.

अतिशय जिव्हाळ्यानं, आपलेपणानं लिहिलेले 'आखर–आंगण' अत्यंत वाचनीय आहे.

मुखपृष्ठ सुबक आहे. किंमतीबद्दल आपण बोलू नये !

—जयंत देवधर

माझे विद्यापीठ

(**नारायण सुर्वे**, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, पृष्ठे ६४, मूल्य ३ रुपये.)

नारायण सुर्वे यांचा नवा कवितासंग्रह जेव्हा हातात पडला तेव्हा तो मोठ्या कुतूहलाने चाळण्यास सुरवात केली. कारण, एकतर सत्यकथेच्या ६५ च्या दिवाळी अंकात त्यांची 'माझे विद्यापीठ' ही कविता

प्रकाशित झाली तेव्हाच मला ती आवडली होती. इतकेच नव्हे तर 'या वर्षातली ही सर्वश्रेष्ठ कविता आहे' अशी घोषणाही आम्ही केली होती ! आणि नंतर तर नारायण सुर्व्यांना साहित्यिक आणि असाहित्यिक कारणासाठी भरपूर प्रसिद्धी मिळाली आणि टीकाकारही त्यांचे नाव नव्या पिढीतील कवी दिलीप चित्रे, आरती प्रभु यांच्या समवेत उच्चारू लागले. अशा परिस्थितीत सुर्व्यांचा हा नवा कवितासंग्रह वाचून मात्र माझे फारसे समाधान झाले नाही. माझी रसिकता बोथटली की मी निराळ्या चष्म्याने समकालीन कवींकडे पाहतो अशीही शंका मला आली. परंतु या शंकेचे तात्काळ निरसन झाले. कारण 'माझे विद्यापीठ' ही कविता आता नव्याने वाचली तरी माझे पूर्वीचे मत मला बदलावेसे वाटत नाही. कवितेविषयीची जी माझी धारणा आहे तीनुसार अजूनही मला ती एक समर्थ कविता वाटते. असे असताना नारायण सुर्व्यांचा हा नवा काव्यसंग्रह मला फारसा रुचला नाही. याची कारणे या संग्रहात समाविष्ट केलेल्या कवितांच्या मूळापर्यंत जातात यात शंका नाही.

माझे विद्यापीठ या कवितेची शैली वक्तृत्वपूर्ण साधेपणाची आहे. अनुभवाचे मुद्दाम काव्यीकरण किंवा अलंकरण न करता सनातनी गांभीर्याने सरळसरळ निवेदन केलेले आहे. शीर्षकावरून मॅक्झिम गॉर्कीच्या 'माझी विद्यापीठे' या ग्रंथाचे स्मरण होत असले तरी या कवितेला सुर्व्यांनी स्वतःच्या रक्तमासांचे खतपाणी घातलेले आहे. म्हणूनच ही कविता मनावर कोरली जाते. फुटपाथवर झोपणाऱ्या, हलकीसलकी कामे करणाऱ्या, नगण्य अशा एका अतिसामान्य माणसाचा जगाविषयीचा आणि जीवनाविषयीचा अनुभव या शब्दांतून दमदारपणे व्यक्त झालेला आहे. त्याला भोगाव्या लागलेल्या दुःखांनी आणि आपत्तींनी त्याला दिलेली जिद्द या ओळींतून साकार झालेली आहे. तो एक माणूस या जगाच्या विद्यापीठात खऱ्या माणसाचा शोध करीत जातो. परंतु अनुभव मात्र 'नाही सापडला खरा माणूस' असा आहे. लगेच स्वतःची जाणीव होते तेव्हा तो स्वतःलाही प्रश्न करतो : मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलो ? या विद्यापीठात भेटलेल्या माणसांचा रंग वेगवेगळा आहे. इथे जातीजातीत वाडे वाटलेले आहेत. त्यांतून पोपाखी लोक वावरत असतात. ग्रंथातून सभ्यता आणि संस्कृतीचे पवाडे गायिले असतात. परंतु प्रत्यक्षात मात्र माणसे एकमेकांना नागवतात, छळतात. या विदारक सत्यापुढे हजार ग्रंथराज कवडीमोल आहेत. अशा या जगात या माणसाचे नाते जडले ते माणुसकी जपणाऱ्यांशी. अन्याय करणारांवर वार करावा असे कैकदा वाटले. परंतु एका शिथिल अगतिकतेने त्याचे हात बांधलेले राहिले. या युगाच्या हातून नाहक मारले गेलो ही त्या अतिसामान्य माणसाची वेदना आहे. अनुभूतीचे प्रामाणिक निवेदन केले तर प्रतिमाही अर्थवाही आणि सहज सुचत जातात याचेही प्रत्यंतर या कवितेत येते.

या कवितेत व्यक्त झालेले सुर्व्यांचे व्यक्तिमत्व मजबूत करण्यासाठी या संग्रहातील इतर कविता पूरक ठरत नाहीत, हे शल्य आहे. एक आम्हीच असे निघालो, हुजरे, नाळ, कठीण होत आहे या कवितांतून 'माझे विद्यापीठ' मधीलच अनुभूती पृथकपणे विकसित झालेली आहे. त्यामुळे रचनेचा निराळेपणा वाटला तरी आशयाचा वाटत नाही. तसेच या संग्रहाच्या प्रारंभी दिलेल्या ओळी :

यंत्राच्या काळजातील आर्त स्वर
तुझ्या कंठात आकार घेऊ दे—

वाचल्यानंतर नारायण सुर्व्यांनी स्वतःला मुद्दामच घालून घेतलेली मर्यादा बोचते. यंत्र, कामगार, क्रांती इत्यादी या शतकातील परवलीच्या शब्दांतून कविता ओतणे स्वतंत्र स्वभावाचा थांग न लागल्याचे द्योतक आहे. या दृष्टीने नायक, लालबाग, माझे शब्द, असेल–नसेल या कविता पाहाव्या. माणूस कामगार असतो तसाच तो 'माणूस'ही असतो. कवीने 'कामगार' हे लेबल लावून 'कामगारावर एक कविता'–टाईप कविता लिहिली तर ती फार वरवरची राहते. यात अनुभवावर आक्षेप त्याच्या अभिव्यक्तीतील हेतूंवर आहे. या जगताच्या गदारोळातील माणसाचे पिळलेले, पिळवटलेले, बहरलेले जीवन कवितेतून यावे.

आता येथे एक कविता देतो. जी सर्वथा 'कामगारीय' अथवा 'यंत्रीय' नाही तर एक 'कविता' आहे.

हे अखेरचे शब्द तिचे; 'जाते रे'
डागीत गेलेले
वॉर्डमधील अंधार अधिकच गडद झालेला
तिचे शव माझ्या पुढ्यात आहे
एक उघडा डोळा; माझ्यावर रोखलेला
दुसरा मिटलेला; तिच्या मालकीचा
विझतानाहि श्वास पेरून गेली
दूरवर चर्चच्या घंटा घणघणताहेत

अत्यंत अल्प शब्दात मृत्यूची अथांग जाणीव. हेच या कवितेचे यश. कुठलाही भडकपणा न अंगिकारिता अनुभवाला त्याचे शब्द दिले तर केवढे यश प्राप्त होते हे या कवितेवरून जाणवते. पावसाळा, सांग या कविताही उदाहरणांसाठी देता येतील.

या परीक्षणलेखाची सीमा सुर्व्यांच्या 'माझे विद्यापीठ' या संग्रहापुरती मर्यादित आहे. तेवढ्या मर्यादेत मला जाणवलेल्या गोष्टी मी येथे मांडल्या. अस्तु.

— वसंत आबाजी डहाके

गीतेचे लेखक आणि त्यांचे कालखंड

(ले०—**डॉ. गजानन श्रीपत खैर**, एम्. ए., पीएच. डी.; प्रकाशन : अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २; मूल्य ५ रु.)

मूळ गीतेचा शोध

श्रीमद्भगवद्गीतेवर आतापर्यंत अनेकांनी अनेक दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे. कित्येकांनी गीतेतील अध्यायांचे, श्लोकांचे, भाषेचे व तत्त्वज्ञानाचे विश्लेषण करून गीता हा पूर्वीपासून आज दिसतो तसाच एकजिनसी ग्रंथ आहे येथपासून तो गीतेत अनेक प्रक्षेप झालेले आहेत येथपर्यंत अनेक प्रकारची मते प्रतिपादन केली गेली आहेत. भारतीय टीकाकारांनी मुख्यतः तत्त्वज्ञानाकडेच लक्ष दिलेले आहे. तथापि इंग्रजी टीकापद्धतीच्या संसर्गाने अलिकडे भाषेचा अभ्यास विशेष कुतूहलाने केला गेला असला तरी सापेक्षतः फारच थोड्या अभ्यासकांनी गीतेच्या संहितेविषयी निष्कर्ष काढले आहेत. विशेषतः महाभारतातच गीतेच्या श्लोकांची गणना ७४५ अशी दाखविली असल्यामुळे व सध्याच्या गीतेत फक्त व नेमके ७०० च श्लोक सापडत असल्यामुळे या कुतूहलास ऐतिहासिक महत्त्वही आहे. अलिकडे काश्मिरी संप्रदायाच्या गीतेत ७४५ श्लोक दाखविले गेल्यामुळे या प्रश्नास अधिक चिकित्सेचे स्वरूप आले. ऑटो वगैरे विद्वानांनी केवळ सांख्ययोगावर गीताग्रंथ लिहिला गेला व त्यात नंतर भर घातली गेली असे मानले, पण ऑटोने गीतेतील सांख्ययोग शब्दाचे अर्थ चुकीचे लावल्यामुळे त्याच्या प्रमेयास फारसा अर्थ राहिला नाही. डॉ. खैर यांचे या विषयावरील पुस्तक अत्यंत अभिनव व उपयुक्त पद्धतीने लिहिलेले असे असल्याने अभ्यासकांस अतीव उपयुक्त आहे. याच विषयावर डॉ. आनंदचैतन्य यांनीही आपले संशोधन प्रसिद्ध केले आहे; परंतु ते हिंदीत असल्याने म्हणा अगर अन्य कारणांनी म्हणा फारसे प्रसिद्ध नाही. तथापि या विषयाच्या संदर्भात ते निश्चित उल्लेखनीय आहे व त्याचा विचार पुढे येईलच.

डॉ. खैर यांचे प्रमेय असे आहे की, गीतेचे सहा अध्यायांचे तीन विभाग ढोबळ मानाने पडतात व ते भिन्न लेखकांनी लिहिलेले आहेत. अशा रीतीने हल्लीची गीता तीन भिन्न कालखंडांतील तीन लेखकांनी लिहिलेली आहे असे डॉ. खैरांनी अनेक प्रमाणांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, इतकेच नव्हे तर आपल्या अभ्यासाची दिशा अनेक तक्त्यांनी व परिशिष्टांनी दाखविली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मूळ गीता पहिल्या सहा अध्यायांचीच होती. नंतर कोणीतरी आजचे अ० ८, १३ ते १५ व १७–१८ हे जोडले व उरलेले सहा अध्याय तिसऱ्या लेखकाने भरीस घालून उरलेल्या अध्यायांतूनही मधूनमधून भर घालून स्वयंपूर्ण तत्त्वज्ञान निर्माण केले. पहिल्याने म्हणजे मूळ गीताकर्त्याने शुद्ध बुद्धियोग व निष्काम कर्माचे तत्त्व सांगितले, दुसऱ्याने त्यास तात्त्विक प्रश्नांची जोड दिली व तिसऱ्या लेखकाने त्यास सगुणभक्तीचे स्वरूप दिले, असे खैरांचे म्हणणे थोडक्यात सांगता येईल. त्यांनी केलेला अभ्यास अत्यंत चिकित्सक पद्धतीने, अनेक दृष्टिकोणांतून व काटेकोर-

पणे केलेला आहे हे सर्वांस मान्य करावे लागेल इतकी योग्यता या ग्रंथाची निश्चित आहे. त्यांचे निष्कर्ष सर्वांस मान्य होतीलच असे नाही व तसे तेही म्हणणार नाहीत. कारण एवढा मोठा ऐतिहासिक सिद्धांत एकाएकी मान्य करणे चिकित्साशास्त्रास मान्य नाही. त्यावर पुष्कळच विचार व्हावा लागेल.

आमच्या मते डॉ. आनंद चैतन्य यांनी या विषयावर केलेले संशोधन हेच अधिक स्वीकार्य होय. त्यांच्या मताचे मंडन करणे हे येथे अप्रस्तुत असले तरी विषयाच्या भूमिकेच्या दृष्टीने दोन शब्द लिहिणे युक्त होईल. डॉ. आनंद चैतन्यांनी संपूर्ण महाभारताचा याच दृष्टिकोणातून अभ्यास करून त्यातून काही निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष काढले व व्यास–वैशंपायन आणि सौति यांनी कोणत्या प्रकारची भर घातली असावी त्यासंबंधी आडाखे बांधले. याच आडाख्यांच्या आधाराने त्यांनी गीतेची तपासणी करून आपली बारा अध्यायांची व ७४५ श्लोकांची आद्यगीता प्रसिद्ध केली. त्यात त्यांनी बऱ्याच ठिकाणी अनुगीतेचे साहाय्य घेतले. गीतेतले प्रक्षेप, त्रुटि व रचनांतर इ. संबंधी बरेच अभिनव मत त्यांनी मांडले, व त्यांतून गीतेचें मानवतेवर आधारलेले बुद्धिगम्य असे एकजिनसी तत्त्वज्ञान मांडून दाखविले. त्यांनी महाभारतातून जयग्रंथ वेगळा काढून दाखविला व त्यामुळे त्या संशोधित जयग्रंथात आलेली गीतेची संहिता अधिक विश्वसनीय मानणे युक्त होईल. डॉ. खैर यांच्या म्हणण्याचा विचार या दृष्टिकोणांतून करावयाचा म्हटले तर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हल्लीची गीता तिसऱ्या लेखकाने सगुण भक्तीची भर घालून सुसंगत करून दाखविली, हे पटण्यासारखे नाही. कारण पूर्वीचे तत्त्वज्ञान व त्यास दिलेली भक्तीची जोड यात आलेली अनेक संशयस्थळे हल्लीच्या गीतेत निर्माण होतात व ती स्वतः खैरांनीच अतिशय स्पष्टपणे आपल्या ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात नमूद केली आहेत. ही विसंगती त्यांनी दाखविलेल्या पद्धतीने दूर होऊ शकत नाही.

मात्र त्यांनी केलेला अभ्यास व ग्रंथाची मांडणी थोडक्या अवकाशात, सुसूत्रपणे व आकर्षकपणे मांडल्यामुळे या विषयाला चालना मिळाली आहे व गीतेच्या अभ्यासकाला अशा प्रकारचे नवीन व मौलिक संशोधन करून फार मोठे साहाय्य केले आहे, याबद्दल डॉ. खैर यांचे हार्दिक अभिनंदन करणे जरूर आहे.

—सिद्धाचार्य डॉ. पु. ह. संत

मी

माझ्या स्वराच्या आर्ततेतून
कंठ जन्मला मिरेचा
आसवांच्या आर्द्रतेने
ओला किनारा सागराचा

माझ्या दैवाच्या सावलीची
अवसेच्या पदराला किनार
आवंढचांच्या पायावरी
उभा हुंदक्यांचा मिनार

माझ्या भुकेच्या ठेक्यावरी
तांडवाचे नृत्य रंगे
जांभईतल्या विजेने
आभाळाचे ऊर भंगे

—वि. वाघ

मराठीचे अध्यापन

विदर्भ साहित्य संघातर्फे झालेल्या चर्चासत्राचा अहवाल

प्रेषक : **अरुण देशपांडे,**
विद्यापीठ प्रशिक्षण महाविद्यालय, नागपूर

'मराठीचे अध्यापन' या विषयावरील हे चर्चासत्र दि. १७, १८ व १९ डिसेंबर असे तीन दिवस वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात भरले होते.

दि. १७ रोजी सायंकाळी ४ वाजता नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु व मराठीचे एक उत्कृष्ट प्राध्यापक डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले.

प्रारंभी प्रा. म. बा. कुंडले यांनी या चर्चासत्राचा हेतू व त्याचे स्वरूप स्पष्ट केले. ते म्हणाले, "मराठी ही राज्यभाषा झाल्यामुळे आज केवळ शिक्षणातच नव्हे तर सामाजिक व्यवहार व शासन या सर्व पातळींवर तिचा वापर सुरू झाला आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये सर्व प्रकारच्या जीवनव्यवहारामध्ये मराठी भाषेचा समर्थपणे उपयोग करण्याची पात्रता निर्माण करण्याची जबाबदारी मराठीच्या अध्यापकांवर आली आहे, म्हणून विद्यार्थ्यांच्या मराठीचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने मराठीच्या अध्यापनाचाही पुनर्विचार होणे आवश्यक आहे, या अध्यापनाला अद्यावत शास्त्रीय बैठक देणे आवश्यक आहे. अध्यापनपद्धतींचा विचार केवळ माध्यमिक शिक्षणापर्यंतच केला जातो. परंतु या वाढत्या शिक्षणप्रसारामुळे महाविद्यालयांमध्ये देखील सर्व थरांमधील विद्यार्थी प्रवेश करीत आहे. साहित्याच्या अध्यापनासोबतच त्यांच्या भाषाभ्यासाकडेही लक्ष देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणून महाविद्यालयीन पातळीवर देखील मराठीच्या अध्यापनपद्धतींचा अभ्यास करणे महत्त्वाचे झाले आहे. काय शिकवायचे याच्याइतकेच ते कसे शिकवायचे — हे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोचवायचे, त्यांच्यात अध्ययनक्षमता, अभिरुची कशी निर्माण करावयाची याचाही विचार केला पाहिजे. शिवाय मराठी अध्यापनात एकसूत्रीपणा येण्याच्या दृष्टीने प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन अशा तिन्ही पातळींवर क्रमशः हा विचार झाला पाहिजे."

यानंतर कुलगुरु **डॉ. कोलते** यांनी उद्‌घाटनपर भाषण केले. ते म्हणाले, "पूर्वी इंग्रजी चांगले बोलणारा सुसंस्कृत समजला जाई. त्याचप्रमाणे उद्या मराठीत उत्कृष्टपणे बोलणारा सुसंस्कृत समजला जाईल व जावा, म्हणून विद्यार्थ्यांना चांगले बोलायला व चांगले लिहायला शिकविणे आवश्यक आहे. मराठीचे अध्यापन करीत असताना भाषेचे अध्यापन व साहित्याचे अध्यापन असे दोन प्रकार मानून त्याचा शास्त्रीयपणे विचार केला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची पात्रता निर्माण करणे, वाचनाची गोडी निर्माण करणे इकडेही लक्ष द्यावे." अध्यापनातील स्वतःच्या अनुभवांच्या आधारे त्यांनी आपल्या विचारांचे स्पष्टीकरण केले. शेवटी इंग्रजीच्या धर्तीवर मराठीच्या अध्यापनासाठीही सरकारने स्वतंत्र संस्था स्थापन करावी किंवा विद्यापीठात असा विभाग सुरू करण्यास मदत करावी असे आवाहन केले.

चर्चेसाठी तीन मुद्यांची निवड केली होती. ते म्हणजे (१) विविध पातळींवरील अध्यापनाची उद्दिष्टे, (२) अध्यापन पद्धती व (३) अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धती. तीन बैठकींमध्ये या तीन् विषयांवर चर्चा झाली.

उद्दिष्टे

या बैठकीचे अध्यक्षस्थान डॉ. मा. गो. देशमुख यांनी स्वीकारले होते. सुरवातीला प्रा. प्र. वा. उर्ध्वरेषे यांनी उद्दिष्टांची पार्श्वभूमी स्पष्ट केली. ते म्हणाले, 'आज शिक्षणाचा विस्तार फार झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा दर्जा कायम ठेवणे कठिण जात आहे. तसेच उत्तम व कार्यक्षम शिक्षकांचीही उणीव फार मोठ्या प्रमाणात भासत आहे. म्हणून अध्यापनाचे यशापयश हे शिक्षकांच्या वैयक्तिक कौशल्यावर सोपवून चालणार नाही. सामान्य बुद्धीचा शिक्षकदेखील आपले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत ज्या रीतीने पोचवू शकेल अशा पद्धतींचे व तंत्राचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. भाषाशास्त्र, भाषेचे अध्ययन–अध्यापन या क्षेत्रात पाश्चात्य देशांमध्ये भरपूर संशोधन होत आहे, अनेक प्रयोग केले जात आहेत, निरनिराळ्या पद्धतींचा व साधनांचा परिणामकारकपणे उपयोग केला जात आहे. त्यांचा अभ्यास करून आवश्यक तेथे मराठीच्या अध्यापनातही त्यांचा अवलंब करून आपल्या अध्यापनाला आपण अद्यावत स्वरूप दिले पाहिजे. आज आपण साहित्याच्या अध्यापनापेक्षा भाषेच्या अध्यापनावर अधिक भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये मराठीतून विचार करण्याची शिस्तबद्धता निर्माण करून सर्व विषयांसाठी मराठीचा उपयोग करण्याची पात्रता निर्माण केली पाहिजे. तसेच बाराखड्या, व्याकरण, याचाही बदलत्या भाषास्वरूपानुसार पुर्नविचार केला पाहिजे.'

प्राथमिक पातळीवर मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे काय असावीत हे श्रीमती सावंगीकर यांनी स्पष्ट केले. या वयात मुलांची ग्रहणशक्ती तीव्र असते, मुले जिज्ञासू व अनुकरणप्रिय असतात. हे लक्षात घेऊन श्रवण, भाषण, वाचन व लेखन या कौशल्यांचा विकास या अवस्थेत व्हावा व त्यासाठी अनुकरण–संभाषण, कौशल्य इत्यादि साधनांचा अवलंब करावा असे त्यांनी सांगितले.

माध्यमिक पातळीवरील उद्दिष्टांचा उहापोह करताना श्री. म. ना. काळे यांनी भाषावृद्धी, विचार-भावनांच्या प्रगटीकरणाचे सामर्थ्य, भाषेविषयी आवड, भाषेतील सौंदर्याची जाणीव व त्यातून व्यक्तिमत्वाचा विकास या उद्दिष्टांचे महत्त्व प्रतिपादन केले.

महाविद्यालयीन पातळीवरील उद्दिष्टांवर बोलताना प्रा. श्री. मा. कुळकर्णी म्हणाले, "भाषा व साहित्य यांच्या अध्यापनाची उद्दिष्टे वेगवेगळी असावीत. उद्दिष्टांचा संबंध अपेक्षांशी असतो म्हणून या दोहोंमध्ये सांगड घातली जावी. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांमधून चांगला वाचक, नंतर रसिक, नंतर समीक्षक व नंतर लेखक असे क्रमाक्रमाने निर्माण करण्यावर भर द्यावा."

महाविद्यालयीन उद्दिष्टांवर प्रा. प्र. वा. देशपांडे यांनीही निबंधवाचन करून वैचारिक पातळी व सौंदर्यस्वाद या उद्दिष्टांच्या साध्यतेवर भर दिला.

पहिल्या सत्राचा समारोप करताना डॉ. मा. गो देशमुख म्हणाले, "भारतीय शिक्षण पद्धतीनुसार अध्ययन ही एक प्रक्रिया महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकाचीही शिकण्याची क्रिया चालू असते. उद्दिष्ट म्हणजे प्रयोजन. हे दोन प्रकारचे असतात. एक तात्कालिकच दुसरे चिरंतन. तेव्हा भाषाध्ययनाचे कोणते उद्दिष्ट आपल्याला अभिप्रेत आहे हे जाणून शिक्षकाने अध्यापन करावे. प्रत्येकाची शिकविण्याची पद्धती एक असणार नाही. कारण 'style is the man' त्याचप्रमाणे 'method is man' हे सांगून कोणत्या वेळी कोणत्या पद्धतीचा वापर करावा हे शिक्षकाने ठरवावे, पद्धतीचे गुलाम बनू नये. तसेच अध्यापन यशस्वी होण्यासाठी अध्यापक–विद्यार्थी संबंधात अधिक जिव्हाळा निर्माण होणे, विद्यार्थ्यांच्या चुकांचे मानसशास्त्रीय विश्लेषण करणे व विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला अधिक चालना देणे यावर भर द्यावा.

अध्यापनपद्धती

दुसऱ्या दिवशी पद्धतीवर चर्चा झाली. या चर्चेचे सूतोवात करताना श्री. भय्याजी कोलते

म्हणाले, ' विषय कसा मांडावा याची योजना म्हणजे पद्धती. ही पद्धती व्यक्तिनुरूप बदलत जाईल. तरीपण शास्त्रशुद्ध अशा पद्धती असाव्यातच व यासाठी प्रशिक्षणही असावे. '

प्राथमिक पातळीवर अध्यापनात चित्रपद्धती, शब्दांचे गट, संभाषण, अभिनय इत्यादी पद्धतींची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

पूर्वमाध्यमिक पातळीवरील अध्यापनासंबंधी बोलताना श्री. कृ. मा. चौरे यांनी प्रश्नोत्तरपद्धती, अनुलेखन, संभाषण, आधी भाषण मग लेखन, लेखनात ठराविक व चाकोरीबद्ध विषयांपेक्षा विद्यार्थ्यांच्या नित्य अनुभवातीलच विषयांची निवड इत्यादी बाबींवर विशेष जोर दिला.

उत्तर माध्यमिक वर्गांमध्ये शिकविताना भाषाविकासासोबतच शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्र, संदर्भग्रंथ यांचा उपयोग करणे व त्यातून स्वयंशिक्षण पद्धतीला अधिक चालना देण्यावर श्री. त्र्य. खं. गंधे यांनी भर दिला.

प्रा. ग. वा. करंदीकर यांनी अनेक नामवंत प्राध्यापकअध्यापकांच्या अध्यापनशैलीच्या अभ्यासातून उत्तमोत्तम पद्धतींचा कसा विचार करता येतो हे सोदाहरण स्पष्ट करून महाविद्यालयामधील पद्धतींचे विवेचन केले.

प्रा. कवठेकरांनी इंदिरा संतांचे काव्य शिकविताना कोणत्या पद्धतींचा अवलंब कराल असा प्रश्न उपस्थित करून पद्धतींना साचेबंद स्वरूप न देण्यासंबंधी सावधगिरीचा इशारा दिला.

प्रा. कुसुमाकर वोरीकर यांनीही प्रशिक्षण शास्त्राच्या आधारे अध्यापनपद्धतींचे स्वरूप स्पष्ट केले.

पाठ्यपुस्तक व परीक्षापद्धती—

तिसऱ्या बैठकीत पाठ्यपुस्तके व परीक्षापद्धती या विषयावर चर्चा झाली. ही चर्चा पूर्ण अनौपचारिक व सामुदायिक स्वरूपाची झाल्यामुळे त्यात सर्वांनीच भाग घेतला. त्यात उपरिनिर्दिष्ट व्यक्तींखेरीज प्रा. म. ना. लोही, प्रा. श्रीमती मराठे, प्रा. श्रीमती उषा लिमये, श्रीमती वज्रे, श्री. गलगलीकर व विद्यापीठ प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या चर्चेतून जे निष्कर्ष निघाले ते पुढील प्रमाणे.

(१) प्राथमिक व पूर्वप्राथमिक अवस्थेतील पाठ्यपुस्तके त्या त्या अवस्थेतील विद्यार्थ्यांच्या शब्दसंपदेवर आधारलेली असावीत.

(२) माध्यमिक शाळातील पाठ्यपुस्तकांची रचना करताना साहित्यापेक्षा मराठी भाषा व माध्यम या अंगांवर अधिक भर द्यावा व जेणेकरून निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करण्याला आवश्यक अशी शब्दसंपदा, ज्ञान व अभिव्यक्तीचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल अशा पाठांची निवड अधिक प्रमाणात व्हावी.

(३) महाविद्यालयासाठीही आवश्यक मराठी व मराठीवाङ्मय असे दोन स्वतंत्र अभ्यासक्रम व स्वतंत्र पाठ्यपुस्तके असावीत. आवश्यक मराठीमध्ये त्या त्या विद्याशाखेच्या आवश्यकतेनुसार पाठ्यपुस्तकांची रचना व्हावी. मराठी वाङ्मय या अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम कसा असावा याची एक स्थूल रूपरेषा श्री. म. ना. लोही यांनी सादर केली. वाङ्मय शिकविताना प्रत्येक प्रकाराचे पुस्तक नेमून प्रत्येक काळखंडातील वा महत्वाचे ऐतिहासिक टप्पे दर्शविणाऱ्या कथा, कविता इत्यादींचा अंतर्भाव त्यात करावा. प्रथम वर्ष बी. ए. पासून तृतीय वर्ष बी. ए. पर्यंत एकच सलग अभ्यासक्रम असावा, प्रत्येक वर्षात त्यातील एकेक प्रमुख कालखंड नेमावा व त्यातून वाङ्मयाच्या संपूर्ण इतिहासाचा परिचय करून द्यावा. वाङ्मयाचा इतिहास स्वतंत्रपणे शिकवू नये हे त्यांच्या योजनेचे वैशिष्ट्य !

(४) प्रत्येक विद्याशाखेला उपकारक अशा मराठीतील पुस्तकांचा तपास करून त्यांची यादी वाचनासाठी विद्यार्थ्यांना द्यावी.

चर्चा आटोपल्यानंतर पुढील ठराव संमत करण्यात आले—

१. महाविद्यालयीन व विद्यापीठातील मराठीच्या प्राध्यापकांसाठी नागपूर विद्यापीठाने दोन आठवड्यांच्या एका अभ्यासक्रमाची आखणी करावी. यात प्रशिक्षणाची

आवश्यकता, मातृभाषेच्या अध्यापनाचे तंत्र व पद्धती, अभ्यासक्रमाची आखणी, वर्गातील व वर्गाबाहेरील शिक्षण, दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग, भाषा व साहित्याचे अध्यापन, परीक्षापद्धती, अर्वाचीन भाषाशास्त्र व व्याकरण अशा विषयांवरील व्याख्याने व चर्चा यांच्या जोडीला कादंबरी, काव्य, नाटक, निबंध वगैरे वाङ्मय प्रकारांचे अध्यापन, वगैरे भाषणे असावीत. या जोडीला अध्यापनाची काही प्रात्यक्षिकेही करता आल्यास उत्तम होईल.

२. अशाच प्रकारचे फक्त मराठीच्या अध्यापन संबंधीचे एक चर्चासत्र काही निवडक माध्यमिक शिक्षकांसाठी आयोजित करण्याची विनंती शासनाचा शिक्षण विभाग व विदर्भ माध्यमिक शिक्षण बोर्ड यांना करण्यात यावी.

३. मराठीचे अध्यापन या विषयावर राज्यपातळीवर एक चर्चासत्र घडवून आणण्याची मराठी साहित्य महामंडळाला विनंती करण्यात यावी.

४. नागपूर विद्यापीठातील मराठीच्या प्राध्यापकांची एक संघटना निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांची पहिली परिषद लवकरच यवतमाळ येथे भरणार आहे. ही घटना अत्यंत स्वागतार्ह आहे. या संघटनेने सर्व पातळीवरील मराठीच्या अध्यापनाच्या प्रश्नांचा सातत्याने विचार करावा व त्यासाठी वेळोवेळी परिसंवाद, चर्चासत्रे, परिषद आयोजित करून मराठी भाषा व साहित्याचे अध्यापन पद्धतशीर रीतीने व्हावे या दृष्टीने अध्यापकांमधील जाणीव वाढविण्याचा प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

शेवटी प्रा. उर्ध्वरेषे यांनी समारोपाचे भाषण केले व श्री. गळगलीकर यांनी सर्वांचे आभार मानले.

चर्चासत्रात ज्यांनी भाग घेतला त्यांची नावे—

प्राथमिक शाळांच्या व प्राथमिक प्रशिक्षण विद्यालयाच्या वतीने—

श्रीमती सावंगीकर, श्री. गडधनी, श्रीमती काळे.

माध्यमिक शाळांच्या वतीने

सर्वश्री म. ना. काळे, भय्याजी कोलते, कृ. मा. चौरे. त्र्य. खं. गंधे, श्रीमती वज्रे व प्रशिक्षण महाविद्यालयाचे विद्यार्थी.

महाविद्यालयाच्या वतीने—

डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. ग. वा. करंदीकर, प्रा. प्र. वा. देशपांडे, प्रा. प्र. न. कवठेकर, प्रा. म. ना. लोही, प्रा. श्रीमती मराठे, प्रा. श्रीमती साठे, प्रा. श्रीमती पाटील, प्रा. श्रीमती उषा लिमये.

प्रशिक्षण महाविद्यालयाच्या वतीने

प्रा. म. वा. कुंडले, प्रा. प्र. वा. उर्ध्वरेषे, प्रा. कुसुमाकर बोरीकर, प्रा. श्रीमती मानापुरे.

सभासद सूची–प्रसिद्धीनंतर (दि. १५–१२–६७) आलेल्या दुरुस्त्या

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	सभासद क्रमांक	नाव	पत्ता	दुरुस्ती ऐवजी
१	४८	२७८	२०४	श्री. पाठक, मधुसूदन दत्तात्रय	सीताभवन, गोरेपेठ, नागपूर	व ऐवजी अ
२	७५	१	३३	प्रा. करंदीकर, ग. वा.	राजे वकील बंगला, पुसद जि. यवतमाळ	व ऐवजी अ
३	६१	९	८	प्रा. ठारे, वि. ए.	सिव्हिल लाईन्स, खामगाव जि. बुलढाणा	वारले
४	१	१	२५	सौ. दोंदे, इंदिराबाई	मूर्तिजापूर, जि. अकोला	वारल्या
५	८६	७	२३२	श्री. कदम, वसंत रामचंद्रराव	काटोलकरांचा बंगला, रामनगर, वर्धा	पृष्ठ ८६ व ८७ पुनर्मुद्रित पृष्ठ ८६ वरील कमी करणे
६	४	१	३०	श्री. अतराम, व्ही. बी.	आदिवासी नगर, अमरावती	आतराम पाहिजे
७	४	२	७४	श्री. इंगोळे, एस्. बी.	गाडगेमहाराज मार्ग, शिवाजी नगर, अमरावती	इंगोले पाहिजे–पत्ता —विधळे प्लॉटस्, गाडगेनगर, अमरावती
८	५	९	६५	श्री. देवाळे, शं. ज.	विजय कॉलनी, अमरावती	दवाले पाहिजे
९	५	१०	२७	श्री. नागपुरे, पी. एन्.	श्रीशिवाजी हायस्कूल, शिवाजी नगर, अमरावती	श्री. नागपुरे, ना. पां. पाहिजे पत्ता—–शिवाजी हायस्कूल, मुख्य-शाखा, शिवाजीनगर, अमरावती
१०	५	१२	७५	श्री. पाटील, एन्. एस्.	प्रशान्तिनगर, अमरावती	प्रशान्तनगर पाहिजे
११	९६	१	४०	श्री. बोंडे, सुनीतकुमार	मु. पो. खरोदा, जि. जळगाव	पत्ता—–कोसबाड केंद्र, मु. पो.—–कोसबाड हिल, जि. ठाणे

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	सभासद क्रमांक	नाव	पत्ता	दुरुस्ती ऐवजी
१२						श्री. वाळसराफ, प्रभाकर सोनबाजी, पत्ता—रामनगर, वर्धा र. क्र. २९ (यादीतून नाव गळले आहे)
१३	४३	२१२	९५९	श्री. देव, प्रभाकर सीताराम	द्वारा—एन्. आर्. पल्लीवार सोनी लेन, सीतावर्डी, नागपूर	पत्ता—द्वारा—के. एम्. जोशी, ॲडव्होकेट, मोदी नं. १, सीतावर्डी, नागपूर १
१४	३२	३०	६९४	श्री. करंडे, मधुकर सीताराम		करंडे ऐवजी करंदे पाहिजे
१५	४४	२२३	७४६	श्री. देशपांडे, पांडुरंग आत्माराम		श्री. देशपांडे, पांडुरंग अमृतराव
१६	५१	३२४	५९७	श्री. बेंद्रे, शशिकान्त विष्णुपंत	केळकरांचा बंगला, जुनी रामदासपेठ, नागपूर	जी. के. केळकरांचा बंगला, नागपूर टाईम्सच्या मागे, जुनी रामदासपेठ, नागपूर
१७	३७	११६	६९३		नागपूर ३	नागपूर २
१८	४३	२०५	६९६		शांतीनगर १	शांतिनगर, नागपूर
१९	४६	२५३	७४२	श्री. नारके, आर. के.		श्री. नारके, आर्. ए.
२०	३१	९	६९०	श्री. अलाणे, श्यामराव रामभाऊ		श्री. अलोणे, श्यामराव रामभाऊ
२१	५२	३४०	५३८	श्री. भोळे, दादा शामराव		श्री. भोंगळे, दादा शामराव
२२	१२	५३	१००	श्री. गावंडे, देवदास कवडूजी		श्री. गावंडे, देविदास कवडूजी
२३	१३	१६	१५५	श्री. चांदेकर, भास्कर यादवराव		श्री. चांदेकर, माधव गणपतराव
२४	१५	६०	१५३	श्री. पोतदार, र. का.		श्री. पोतदार, र. द्वा.
२५	१६	७१	१६२	श्री. मालेकर, रामचंद्र नारायणराव		श्री. वासेकर, रामचंद्र नारायणराव द्वारा—जैराम नागोवाजी राऊत, माधवराव तावडू वकील यांचे घरा-जवळ, एकोरी वार्ड नं. २, चंद्रपूर

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	सभासद क्रमांक	नाव	पत्ता	दुरुस्ती ऐवजी
२६	१८	१०६	१५४	श्री. आगलावे, मा. ज.		श्री. वागलावे, मा. ज.
२७	१८	१०८	२३०	श्री. आसकर, नारायण गोविंदराव		श्री. आसकर, शांताराम गोविंदराव
२८	१८	१०९	२२९			हाकरे ऐवजी ठाकरे
२९	१९	११६	१४३	श्री. जवळे, कुसुमकर झिवलाजी		श्री. जवळे, कुसुमाकर झिवलाजी
३०	२०	१२३	२२०	श्री. बहारे, आप्पा आवाजी		श्री. वहादे, आप्पा आवाजी
३१	२०	१२४	२१६	श्री. वहादुडे, मारोती गणपती		श्री. वहादुडे, मारोती गणपती
३२	२०	१२६	२२६	श्री. बागडे, जगन्नाथराव विठोबाजी		श्री. जाणवे, जगन्नाथराव विठोबाजी
३३	२०	१२७	२२५	श्री. बागडे, जनार्दन देवराव		श्री. वांगडे, जनार्दन देवराव
३४	२०	१२९	१४४	श्री. वुराण, अण्णा आवाजी		श्री. वुराण, अण्णा गणपतराव
३५	११	३८	९६		अलाहाबाद बँकेजवळ, देशकर वकिलांचा वाडा, चंद्रपूर	श्री. ल. व. देशमुख यांचा वाडा, वालाजी वार्ड, चंद्रपूर
३६	१६	७२	११५	श्री. मोर, तुळशीराम गोविंद		श्री. मोरे, तुळशीराम गोविंद
३७	१६	७३	१९८	श्री. रइंचकर, अशोक		श्री. राइंचवार, अशोक
३८	१०	८९	प ६		काँग्रेसनगर, नागपूर	' माउली ', १२४/५, एरंडवणे, पुणे ४
३९	५	८	ह ३	श्री. हर्डीकर, ना. रा.	बस्तरवारी वार्ड, भंडारा	वारले

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

परीक्षा सत्र : सप्टेंबर–ऑक्टोबर १९६७

परीक्षांचा निकाल

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या सप्टेंबर/ऑक्टोबर सत्रातील परीक्षा दि. ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर १९६७ रोजी झाल्या असून ह्या परीक्षांना पुढीलप्रमाणे परीक्षार्थी परीक्षेस बसले. मराठी प्रवेश १४३, परिचय १०५, बोध ४९, प्रबोध ९२, मराठी प्रारंभ १२२, साहित्य विनीत ३७०, साहित्य परिचित ३८, साहित्य प्रबोध ६७, साहित्य स्नातक ८४.

यावेळी ३५ परीक्षा–केंद्रे होती.

नागपूर
दि. ३०-११-१९६७

ग. स. देशपांडे
संचालक,
परीक्षा समिती, वि. सा. संघ

मराठी प्रवेश

केंद्र :– पूर्व मराठी माध्यमिक विद्यालय, चोरटी

कु. विभा म. महाजन २, कु. निर्मला न. प्रधान ३, ह. मा. वगमारे ३, श्री. न. मडावी २.

केंद्र :– मुंगीलाल बाजोरिया विद्यालय, अकोला

कु. सुशिला तु. सारडा २, कु. शोभा भी. अग्रवाल २, कु. लक्ष्मी सो. जैन १, कु. शोभा मो. अग्रवाल १, कु. पुष्पा कि. वाजेरिया २, कु. निर्मला शं. तापडिया २, कु. उषा मु. वनपालीया १, कु. गणेशी शि. करणे २, कां. रा. सारडा २, अ. शं. कोठारी १, अ. मु. भगवानपुरया २, न. र. लोहिया २, न. श्री. केडिया २, क. गु. अग्रवाल २, सं. ज. कट्टा २, ग्या. ग. शर्मा ३, क. वा. शर्मा २, मं. याशिन हा. शकूर कापडिया ३.

केंद्र :– एम्. एम्. रब्बानी हायर सेंकडरी स्कूल, कामठी

इनामुर्रहीम अन्सारी २, एजाज अहमद अन्सारी वः अब्दुल शकूर १, नजीरफुर रहमान १, मोहम्मद ग्यासोदिन २, शकील अहमद ३, नूर मोहम्मद वः मोहम्मद हुसैन २, मुख्तार अहमद अंसारी २, जमील अहमद अंसारी ३, मोहमद हनीफ वः मोहमद सिद्दीक २, हबीबुर्रहमान सेख २, मो. एकबाल वः मो. सिद्दीक ३, जावेद अख्तर मो. शरीफ ३, मोहम्मद अकरम मो. अनीस १, मोहम्मद अहफाज १, तय्यवसगीर वः अब्दुल हलीम १, मोईन अख्तर १, मोहसिन उज्जफर जमाल २, सय्यद अमीन नुर रहमान २, नियाज अहमद मो. मकबूल २, महफुज बेग वः मिर्जा महबूब बेग

२, सगीर अहमद मो. वशीर २, मो. फारुक वः अब्दुल कैयोम २, जहीर उल इसलाम ३, सलीमखां २, मोहसिन हुसैन राजदानी २, यसीम अहमद वः मो. युसूफ २, रियाज अहमद २, जमील अहमद वः मो. इस्माईल २, अब्दुल रशीद वः शेख दिलावर ३.

केंद्र :– दे. पु. मा. शाळा, गोवरी

व. प. निमजे २, ग. भ. पराते २.

केंद्र :– सुभानिया हायस्कूल, नागपूर

सैयद अवरार हुसेन सैयद इकवाल हुसेन १, ताहेर भाई वः कुर्वानभाई १, मुश्ताक अहमद शेख मोती २, शेख महवूब वः शेख ईसमाईल २, मजीदुद्दीन अलीखां २, महम्मद कम्मू २, अब्दुल सलाम वः अ. बशीर ३, अब्दुल रव शेख गुलाम २, कैजार हुसेन १, महंमद उसमान १, अब्दुल मतीन २, अइनुद्दीन वः शमसुद्दीन २, हारूनबेग वः उमरबेग ३, मुख्तार अहमद ३, लियाकत अली २, गुलामनवी १, मदनी वः हाजीसतार २, अशफाक अली ३, अताउर रहमान २, अब्दुल सलीम २, अब्दुल सलाम वः अ. करीम २, महंमद फारूक २, अमानुल्लाखाँ वः शमशेरखाँ २, नसीरखान वः मियाँदादखाँ ३, सैयद अलताफ वः सैयद वजीर ३, अब्दुलहफीज वः अब्दुल गनी ३, आमेर हुसेन वः शव्वीरहुसेन २.

केंद्र :– सिंधी हिंदी ब. ऊ. माध्य. शाळा, नागपूर

अ. का. तिवारी ३, दिनेशकुमार दुबे १, महेन्द्रकुमार जयरामभाई ३, गौ. लो. इसरानी ३, मु. सो. मेश्राम २, रतनकुमार राय २, शं. सो. मेश्राम २, वि. कि. जैस्वाल २, श. रा. अहीर २, म. पु. नाईक ३, शौकत अव्वास २, च. ज. खनूजा ३, लियाकत अव्वास १, गुरिन्दरपालसिंग राजपालसिंग सेठी २, कृपालदास ट. शर्मा २.

मराठी प्रवेश

केंद्र :– प्रकाश हायस्कूल, नागपूर

कु. मासूम कौसर गुलाववक्ष २, प्र. क्रि. ग्वालवंशी ३, इं. च. लोटे ३, उ. रा. दुबे ३.

केंद्र :– राष्ट्रभाषा प्रचार समिती–नागपूर

राजेश्वरी सुब्रमणियम ३, जयलक्ष्मी सुब्रमणियम ३, चांदनी वर्मा ३, शांतीमेरी अंतोनीदास ३, राजश्री हरिहरकिशोर चतुर्वेदी २, कु. विजया सु. शास्त्री १, सौ. के. जयलक्ष्मी मूर्ती १, कु. ममता मित्रा १, कु. कविता रुद्र १, सरस्वती अग्निहोत्री १, कुमुदिनी लाल १, शेफालिका देव १, चित्त-हरण चक्रवर्ती १, श. म. शाह १, के. वि. आर. मूर्ती १, सरोजकुमार केसरवानी १, डॉ. जु. हं. अगरवाल १, एम्. चंगुलानी १, सैयद मोहम्मद सैयद इब्राहिम १.

केंद्र :– श्री. निराला विद्यालय, नागपूर

कु. कलाबाई ग. वैसवारे २, कु. प्रभावती गो. वर्मा २, ग. ज. गौर २, कु. सरस्वतीवाई दु. साहू २, म. दे. समुन्द्रे ३, टी. वालमोहन टी. रंगनाथन् २, रा. प. गुप्ता २, को. ग. वर्मा १, दु. भैं. गुप्ता ३, मो. आ. अग्रवाल ३, रा. ने. वैसवारे २, मि. रा. साहू ३, दे. न. साहू २, सफीक-उद्दीन समसुद्दीन २, सय्यद नजीमअली स. हसनअली ३.

मराठी परिचय

केंद्र :– पूर्व मराठी माध्य. विद्यालय, चोरटी

कु. रत्नमाला स. वारसागडे ३, कु. रैनाबाई को. भागडकर ३, मु. सं. तुपट ३, पं. ना. मरसकोल्हे २, पं. ची. पारधी २, मु. आ. रामटेके ३, रा. तु. ढोरे १, दा. स. ढोरे ३, शि. पं. ठेंगरी २, रा. मा. मेश्राम ३.

केंद्र :– मुंगीलाल बाजोरिया विद्यालय, अकोला

कु. शकुंतला ग. वर्मा १, कु. शोभा श्री. शर्मा १, कु. सुशीला शं. खन्ना २, कु. पुष्पा मु. सिंगी १, कु. आशा प. पचोरी २, कु. पद्मा शं. लोहाणा १, कु. आशा ब. अग्रवाल २, कु. उमाशशी न. ताडम ३, कु. सरोज ज. कट्टा २, कु. लता श्री. सहगल २, ज. स. शुक्ला २, नं. ल. चांडक २, नं. ज. मालानी ३, दा. रा. छावसरीया ३, ओ. ना. छावसरीया २, ओ. रा. चौबे २, शा. हि. लोहिया ३, ओ. गो. गांधी ३, झु. दी. जैन २.

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, पोफाळी

वा. शा. कदम २, स. त्रि. वायचोळे २, ल. तु. सुरोशे २, वि. स. कदम २, तु. वि. सदावर्ते ३, ना. त्रि. वायचोळे ३, प्र. शं. कदम ३.

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, गोवरी

वा. ज. रंगारी २.

केंद्र :– रूरल इन्स्टिट्यूट, अमरावती

त. गो. मिश्र २.

केंद्र:– सुभानिया हायस्कूल, नागपूर

सलील अहमद वः अजीमखाँ ३, महंमद हनीफ वः दौलतमियाँ ३, महंमद इलयास वः अब्दुल लतीफ ३, अख्तरअली वः शौकतअली ३, सैयद अब्दुल सलीम २, निसारअली वः असदअली २, अब्दुल रशीद महंमद हनीफ ३, एजाज हुसेन ३, नसीरखाँ ३, खलील अहमद ३, अब्दुल वहीद ३, साबिरूल्लाखाँ २, शेख इकबाल ३, महंमद जमाल ३, अब्दुल रज्जाक ३, महंमद इस्माईल ३, प्यारे साहेब २, शाहेद अहमद ३, रफीउद्दीन वः नसीरुद्दीन २, हुसेनअली वः अक्तरअली २, महंमद शफी व शेखसिकंदर ३, अब्दुलरवखाँ ३, मुबीन अहमद ३, अब्दुलरज्जाक वः अब्दुलरशीद २, महंमद इकबाल वः अब्दुलगफूर ३, शेख अहमद वः शेख महंमद ३, सुईदा अखतर म. अखतर ३, शरीफुल्लाखाँ हमीदुल्लाहखाँ ३.

केंद्र :– सिंदी हिंदी ब. ऊ. माध्य. शाळा, नागपूर

हरीशचंद्र सुरेशचंद्र २, गो. श्या. पोद्दार २, तु. चि. चटर्जी २, फ. दा. समुंदे ३, ग. म. तभाने ३, कु. बेबी प. खत्री २.

केंद्र :– प्रकाश हायस्कूल, नागपूर

बा. गो. छंगाणी ३, सं. शि. गुप्ता ३, श्या. रा. श्रीवास ३, रा. मो. चौबे ३, के. रा. शर्मा ३, प्र. भा. टेकाडे. २, अब्दुलरफिक अब्दुलजब्बार ३, शि. तु. पात्रीकर २, निसारअहमद मकबुल अहमद ३.

केंद्र :— निराला विद्यालय, नागपूर

कु. निर्मला अ. छत्रे २, कु. शकुंतला रा. सोनी २, कु. मुन्नीबाई न. वरई २, कु. राधारानी वु. शर्मा २, कु. च. ना. नायडू १, वे. रा. गुप्ता २, श. का. चतुर्वेदी ३, शि. दु. यादव २, अ. मा. गुप्ता ३, प. भै. कनौजिया ३, सो. भ. शर्मा ३, रा. सि. बर्वे ३, र. गु. मछले ३, प्र. दु. शाहू ३, शमीऊल्लाखाँ नसरीखाँ २, सतारखाँ गुलाबखाँ २, रशीदखाँ मियाखाँ ३.

मराठी बोध

केंद्र :— पूर्व माध्य. मराठी शाळा, सोनोरी

न. पूं. बागडे २, अब्दुलखलिक अब्दुलकादर २, मुकदरहुसेन महेजरहुसेन १, महम्मद युसूफ म. सरोवर १, अ. खलील अब्दुल जलिल १, शे. इसराईल शे. रहीम २, सज्जादहुसेन आशिकहुसेन २, शे. रहमान शे. सलावत १, अब्दुलरहमान शेख इब्राहिम १, म. इसाकुरेशी अ. रहिम १, शे. हारून शे. महेबुब १, शेख इसराईल शेख इस्माईल १.

केंद्र :— दे. पू. मा. शाळा, पोफा ी

कै. वा. नाईक २.

केंद्र :— सुभानिया हायस्कूल, नागपूर

अब्दुलनझीरखाँ १, सैय्यदअब्दुल नईम १, नूरुद्दीन वः अब्दुलरज्जाक १, महंमद फारूक २, अब्दुलवशीर २, हकीमुद्दीन वः निसारअली १, युसुफअली वः अब्बासअली २, अब्दुल कैयूम १, शेरखाँ वः शेखइमाम १, सादिकुल्ला वः शफीउल्ला १, अब्दुलमतीन वः शेखहवीब १, अब्दुलरब वः अब्दुलसतार १, महमूदआलम १, अब्दुलगफ्फार १, काजी एजाजुद्दीन १, हुकमतुल्लाखाँ १, रहीमखाँ वः हुसेनखाँ १, शेखहवीब १, महबूबखाँ १, शेखलियाकत १, युसूफबेग वः शहेबाजबेग १, महंमद-शफी वः शेखमहम्मद १, अब्दुलकदीर वः अब्दुलरशीद १, अब्दुलहफीजखाँ १, शेखहमीद वः शेख-अहमद १, महम्मदयासीन वः शेखसिकंदर १, महम्मद अब्दुललतीफ १, तैयबआरिफ वः हातिम-आरिफ १, शेखमुबीन अब्दुलहफीज १.

केंद्र :— सिंधी हिंदी ब. ऊ. माध्य. शाळा, नागपूर

जी. पु. कोहली १, ज. सु. गुप्ता २, गु. थां. हेमराजाणी १, उ. क. पांडे ३, अ. ना. लोखंडे २, जियाउल्ला नत्थेखाँखान २.

केंद्र :— प्रकाश हायस्कूल, नागपूर— कु. तुलसा सु. नायडू २.

मराठी प्रबोध

केंद्र :— सालेकसा हायस्कूल, सालेकसा

कु. रा. वग्गा ३, म. वा. मडामे २, ग. ज. चुटे ३, प्रे. पै. साणे ३, वा. कृ. फुंडे ३, ग. पु. नागपुरे ३.

केंद्र :— पूर्व माध्य. शाळा, बोपा —सु. दो. महाजन.

केंद्र :— सुभानिया हायस्कूल, नागपूर

शफीकमहंमद १, अब्दुलगफ्फार १, मोहम्मदसईद १, अब्दुलगफ्फार वः शेखमुस्तफा २, अब्दुलहवीव १, रियाजअहमद १, फारूकअहमद १, मुहम्मदइब्राहीम १, महम्मदहुसेन १, गुलामदार खां १, लियाकतअली १, शेखअजीम शेखइब्राहीम १.

केंद्र :– सिंधी हिंदी ब. ऊ. माध्य. शाळा, नागपूर

परमजीतसिंह भाटिया ३, ओ. ल. अवस्थी ३, रा. ता. मदन २, चं. द. पटेल ३, प्र. सु. राव ३, नी. रा. वोहरे २, ज. ल. दुवे २, ह. टी. घनवानी ३, ओमप्रकाश राधाकिसन २, जसपिन्दर कोरसेठी २, वी. प. खत्री २, अ. वि. शेवडे २, मू. छा. ग्वालाणी २, कु. रानी सु. खत्री ३, रा. शि. पटेल २, न. प्री. आलुवालिया ३, मो. म. गुप्ता ३, मू. ला. आडवाणी २, नि. ने. छावरानी ३, अ. र. मेश्राम ३, नजफअली मु. इस्माईलभाई ३, म. सु. जैस्वाल २, का. भ. समुंद्रे २, वि. ह. चक्रवर्ती २, अ. क. दयानी २, शे. गो. नायडू ३, अ. भ. हरिरामानी ३, रा. वु. सहाडा ३, अताऊल्लाखां नत्थेखां ३, त. चि. चटर्जी ३, जयप्रकाश गौतम ३, वी. पं. कानफाडे १.

केंद्र :– मॉडेल हायस्कूल, नागपूर

ना. य. फुलपेर ३, अ. गो. गुप्ता ३, न. ल. मोरय्या ३, रा. ली. चौरसिया ३, अ. नं. जैस्वाल ३, ज. प्र. पालीवाल १, म. सि. वारापात्रे १, के. रो. गोथदाणी ३, मोहम्मद इब्राहिमखान ३, ल. व. अग्रवाल २, क. के. गांधी २, ओ. चु. गांधी २, र. ये. तालेवार २, प्र. कि. मोहतुरे ३, य. ना. ठाकुर २, रा. भु. तालेवार १, न. स. जैस १, वा. चिं. वघेले २, र. रू. गोलछा १, रा. यु. शुक्ला २, ह. घ. अंचलवार २, म. मु. गौर ३.

केंद्र :– निराला विद्यालय, नागपूर

कु. देविका गं. गोडवोले २, कु. शांती सु. श्रीवास्तव २.

केंद्र :– जवाहर नाईट हायस्कूल, नागपूर १

सौ. सुमन पु. चतरू ३, कु. विमला ठाकरे २, जि. रा. अरोरा ३, चं. ग. जैस ३, के. वी. पालीवाल ३, फु. ना. चन्नाहू ३, ल. गो. वंजानी ३, प. सु. वमरा २.

मराठी प्रारंभ

केंद्र :– पूर्व मराठी माध्य. विद्यालय, चोरटी

कु. अनुसयावाई गि. राऊत २, सु. जे. शेंडे ३, ही. तु. शेंडे २, म. बा. सीलार २, सु. वा. वुल्ले २, प. तु. गेडाम २, म. ना. गणवीर ३, मा. सु. वलके ३, ब. य. राऊत ३, दा. ग. उईके २, आ. वु. उईके ३, इ. वी. मोहुर्ले ३, ना. स. ढोरे ३, श्री. बि. नारनवरे ३.

केंद्र :– लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालय, तुमसर

अ. म. चुटे १, शा. श्री. वोरकर २.

केंद्र :– प्रकाश विद्यालय, अडचांळ

आ. रा. भोयर १, ता. कि. भुते १, मा. को. भुते १, श्रा. वि. भुते ३.

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, गोवरी

अ. ना. वैद्य २, गो. मा. दलदले २, अ. वा. गजभिये २, से. डी. जोंजार २, ह. गं. बाकरे २, मि. सू. हुमणे ३, वि. सि. अग्रवाल २.

केंद्र :– वसंत हायस्कूल, शेंद्रीक

कु. विठा मो. महल्ले १, ज्ञा. वा. वले २, ल. का. कावळे ३, ज्ञा. पा. कावळे ३, कि. क. राठोड ३, शं. पुं. काळे ३, दे. दि. गावंडे ३, धों. रा. दुमदाळे ३.

केंद्र :– पूर्व माध्य. शाळा, बोपापूर

वि. जारदौलतकार २, सु. वा. ठाकरे २, गो. चं. वांढरे २, दे. दा. वाघ ३, गु. रा. महाजन २, अ. म. तिघरे २.

केंद्र :–शासकीय बहु उद्देशीय उच्चतर माध्यमिक शाळा, गडचिरोली

पं. शा. म्हस्के २, र. वा. म्हशासंत्री ३, सु. पां. बावनवाडे २.

केंद्र :– राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर–१

कि. शा. पेंढारकर २.

:– सर्वोदय विद्यालय, कुही

कु. सुमन मां. लेंडे २, कु. शकुंतला स. लुटे १, कु. लतिका व. द. चव्हाण २, ल. ल. शंभरकर २, म. न. गायकवाड ३, ह. ह. नागदेवते १, य. श्री. वंजारी ३, रा. स. दुधपचारे २, मि. वा. जुनघरे २, गु. पां तलमले १, दे. क. घनजोडे २, श्री. रा. चांदपूरकर ३, कु. ति. घनजोडे ३, रा. ल. ढोवळे २, ह. गो. भिवगडे २, कि. तु. भोवते २, दे. रा. शेंडे १, पं. श्री. आसवले १, नि. रा. रंगारी २.

केंद्र:–ज्ञानोदय हायस्कूल, नागपूर. २.

कु. रत्नमाला वा. पंचभाई ३, चंद्रकला शा. डोनारकर ३, कु. तारा चि. डांगोरे २, कु. कुसुम शे. महल्ले २, कु. भामिनी दे. पडोळे ३, चं. खंडाळे २, र. वि. मून २, रा. वा. पाटील २, म. व. उन्हाळे २, सि. म. कांवळे ३, ल. दा. घाडगे २, सु. रा. साधनकर ३, दी. ग. चिरमलवार ३, म. ना. भागडकर २, चं. ए. वोरकर २, उ. ल. कुंभारे २, म. न. शेंडे १, चं. मि. शेळके १, नं. श्रा. श्यामकुंवर २, प्र. श्या. नेवारे. ३, अ. वा. चिटमलवार ३, सु. मा वहादुरे १, चं. म. भांडारकर २, अ. ना. रिनके ३, वा. रा. मेश्राम २, अ. तु. वनसोड ३, सं. उ. आवळे ३.

साहित्य विनीत

सर्व प्रथम विद्यार्थी

श्री. मा. व. वोरकर (पूर्व मराठी माध्य. शाळा, चोरटी) यांना या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांत अधिक गुण मिळाल्याबद्दल कै. प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक मिळाले.

केंद्र:–शिवाजी हायस्कूल, शिरजगावबंड.

कु. विजया वा. शेरेकर ३, कु. इंदिरा दि. निमकर २, कु. सुलोचना कि. वर्जन २, कु. आशा प्र. घाटोळ ३, कु. रत्ना गो. कांडलकर २, कु. शांता गु. हाते ३, कु. सिंधु ल. नस्करी २, कु. गिरजा पां. ढोणे ३, कु. उषा पुं. देशमुख ३, कु. पुष्पा. दि. पनके ३, कु. शशीकला फ. चकुले ३, कु. रत्नप्रभा गु. कोठेकर ३, कु. निर्मला वा. भेले ३, तु. वा. देशमुख ३, अ. ना. गायकी ३, मि. शं. अडायगे २, श. शे. मोहोड २, र. शा. रामेकर ३, नि. ब. वासनकर ३, प्र. यि. वैद्य २, वि. गु. भट २, रि. दि. देशमुख ३, श्या. श्या. भाटे ३, वा. पा. गायकवाड ३, जा. रो. मानापुरे ३, नि. म. किटुकले ३, ना. ना. लोखंडे २, सा. ल. निंभोरकर २, दा. वा. अवारे २, शा. ना. पाटील ३, दे. ग. पाटील ३, प्र. पां. पाठील २, हि. सु. ढगे ३, ना. खु. गिरी २, सु. जी. देशमुख ३, आ. बा. धाकडे ३, के. म. डोंगरे ३, अ. म. कसर २, वा. म. खापरे ३, अ. पां. चर्जन ३, भा. वा. धोटे ३, म. अ. किटकुले ३, पां. कि. नांदेकर ३, का. म. गवळी ३, वि. चं. ढोमणे ३, श्री. ज. हाडोळे २, वि. गो. कुहेकर ३, म. वा. मेहरे २, न. कि. जांभोळे २, उ. वि. वंगाले ३, दा. गु. कोठेकर ३,

ज. शा. पांडे २, रू. तु. राठोड ३, म. ग. पोहणे ३, रा. स. कोठेकर २, गं. ल. नागापूरे ३, मा. द. कविटकर २, पु. म. दवे ३, रू. वा. भालेराव ३, सु. अ. तट्टे ३, म. स. तायडे ३, रो. तु मून ३, नि. गु. नवले ३, प्र. रा. कुरळकर २, दे. कां. अहीर ३, रा. मि. किटुकले २, वा. जे. कानफाडे ३, रा. ज. कांडलकर ३, वि. कृ. भाजिवाले ३, ना. म. देव ३, र. उ. पानसे ३, मे. स. काशीकर ३, वा. वि. देशमुख ३, दा. शा. उमाळे ३, रा. गो. वनसोड ३, सु. आ. देशमुख ३, म. शं. वाहने ३, रा. पं. ठाकरे ३, रा. दे. तट्टे ३, वि. वा. खैरकार ३,.

केंद्र:—पूर्व मराठी मध्य. विद्यालय, चोरटी

मा. व. वोरकर १, ह. रा. वनसोड २, तु. रा. ठवरे २.

केंद्र:—लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालय, तुमसर

हो. द. पटले २, शि. ह. डहाके २, सु. चं. वोघवे २, उ. गो. वावनकर २,सु. कु. लांजेवार २, घ. द. तुरकर ३, ब. मु. भगत ३.

केंद्र:—टागोर विद्यामंदिर, वोरीअरब

कु. मुक्ता ना. महल्ले २, कु. निर्मला ल. भोंगाडे ३, कु. विजया ना. वेलगमवार ३, कु. तारा ग. मेश्राम २, कु. रत्नप्रभा व. वुलवुले २, उ. प. खोपे ३, चं शा. वानखेडे ३, र. अ. जैस्वाल ३, भा. म. तांवडे ३, व. वा. डफळे ३, दे. वा. डूडूल ३, रा. वा. भोयर ३, प्र. ह. तांगडे ३, भ. वा. कळम्वे ३, सा. तु. हुंगोले २, प्र. श. वुडे ३, रा. शं. गिरी ३, वा. वा. मुळे २, शि. श्रा. नायले ३, श. वि. विजमवार ३, ह. द. कोटक ३, व. कों. गायकवाड ३, मुकद्दरखां सत्तारखां पठाण ३, अकवरखां युसुफखां पठाण ३.

केंद्र:—जनता विद्यालय, पाटणबोरी.

दि. ना. अर्गुलवार ३, ल. सी. पारखी ३, तु. वि. चौधरी ३, दो. रा. कुतरेकर ३, ना. शि. वल्लावार ३, छोटू जानी जाटू ३, श्रावण संगु आडे २, दा. ना. कालपल्लेवार ३, भा. वा. गेडाम २, प्र. वोईनवार ३, ना. गं. लढे ३, ग. भू. प्रधान ३, भ. ज. पवार ३, क. म. मोगलसर ३, कृ. ग. विधाते ३, ना. चं. राऊत ३, ना. रा. पद्मावार ३, वा. ग. सहारे ३, दि. सं. गुंडेवार ३ , गो. के. कैलासवार ३.

केंद्र:—पूर्व मा. म. शाळा, सोनोरी.

वि. अ. ठाकरे ३, नं. उ. छांगाणी ३, व. वा. काकडे ३, काझी सै. मझहरवली काझी सै. सफदरअली २, उस्मानअली अमिरअली ३, फेजुल्ला मुनिरुल्ला सौदागर ३, शे. हमिद शे. नझीर २, अब्दुल हफीझ अब्दुल लतीफ ३, अब्दुल हमिद अब्दुल जलील २.

केंद्र:—यशवंत हायस्कूल, अल्लीपूर.

कु. चंद्रकला आ. वालपांडे ३, गो. दा. साकरकार ३, शे. रा. दरणे २, प्र. म. तांवोळी ३, वा. कृ. चाफले ३, रा. वा. झिलपे ३, ल. ना. खोंड २, व. व. कढवे ३, शं. वा. साळवे ३, ज. भि. म्हसकर ३, व. रा. क्षीरसागर ३, वि. गो. अवचट ३, ना. मा. तांदुळकर ३, चिं. मा. लिखार ३.

केंद्र:—प्रकाश विद्यालय, अड्याळ.

दे. गं. हरडे ३, पु. रा. राऊत ३, प्र. ता. सानप ३, भा. वा. लेदे ३, र. ज. भानारकर ३, रा. श्री. सेलोटे ३, शां. से. हटवार ३.

केंद्रः—नालंदा शिक्षण संस्था पवनी.

श्य. हि. थवकर ३, ता. व. डडमल ३, र. वा. टेंभूरकर ३, म. वा. रायपूरकर ३.

केंद्रः—विनोबा विद्यालय, तेलकामठी.

कु. शांता आ. बावने २, पं. रा. वागडे ३, र. म. कसरे २, ह. सं. नोरेकार ३, मो. वा. देशमुख ३, म. म. सेलूकर ३, वा. कृ. ठाकरे ३, दे. खु. मुरमारे ३, चं. सु. पगारे ३, शे. गु. वंजारी ३, श्री. ना. कसरे ३, कु. शेवंती वा. देशमुख २,

केंद्रः—बनारसीदास रुईया हायस्कूल, काटोल.

कु. ज्योती वा. केने ३, कु. तारा क. चांडक ३, कु. हेमलता द. बडगे ३, कु. योगेश्वरी कुश्य. लाटा ३, कु. शोभा ई. टावरी ३, कु. मंगला म. काळे ३, सौ. जयश्री न. अतकरणे ३, कु. सिंधु पां. अतकरणे ३, कु. मंजु. पुं. पोहेकर ३, कु. विमलाताई द. हिवसे ३, कु. यमुनाताई ना. वैद्य ३, आर. ए. खजुरिये ३.

केंद्रः—सालेकसा हायस्कूल, सालेकसा.

प. फा. बहेकार ३, ध. हा. कौरे २, टि. मो. बानक २.

केंद्र :— जिल्हा परिषद हायस्कूल, सानगडी

कु. वासंती न. भुरले २, कु. लिला सो. बोकडे ३, अ. दु. रणदिवे ३, तु. मो. राऊत ३, तु. रा. गोटेफोडे ३, म. पां. आदमने २, शं. चे. नाहामृते २, शि. म. गडकरी ३, भू. रा. डोंगरवार ३, ना. न. तरोणे ३, सु. दो. वन्सोड २, या. मं. धार्मीक २.

केंद्र :— वसंत हायस्कूल, शेंद्री बु.

दे. रा. राठोड ३, पं. भ. आडे ३, गो. ना. सुरजुसे ३, वि. उ. बावने ३, ग. ज्वा. मिश्रा ३, खे. कि. गणवीर ३, वा. ना. वडते ३, मा. ग. बावने ३.

केंद्र :— शासकीय बहुउद्देशीय उच्चतर माध्य. शाळा, गडचिरोली

मा. आ. मुनघाटे २, ह. ह. चुघरी ३, मु. प. चुघरी २.

केंद्र :— रा. भा. प्र. समिती, नागपूर

अ. र. मेंढी ३.

केंद्र :— सर्वोदय विद्यालय, कुही.

ज. श्रा. नागदेवते ३, व. श्रा. लेंडे २, म. ना. तलमले ३, म. न. मेश्राम ३, ना. रा. बैंले ३, रा. श्रा. डहारे ३, डो. की. पत्रे ३.

केंद्र :— बुनियादी विद्यालय, सेवाश्रम, टाकळी

कु. वेणु दि. शेंडे ३, कु. सरस्वती ल. वैष्णव ३, गा. रा. निंबुळकर २, गं. स. ठाकरे २, मु. ल. चवहाटे ३, म. ल. डोवले ३, म. वा. झाडे ३, ज्ञा. ह. हुमणेकर ३, घ. न. वागडे २, घ. गु. कडुकर २, रू. पां. किनकर ३, मा. दा. अरजरसपुरे ३, ला. डे. गोलाईत ३, उ. सि. दुपारे ३.

केंद्र :— ज्ञानोदय हायस्कूल, नागपूर २

कु. रजनी सु. जयस्वाल ३, कु. सुनिता ज्ञा. शेंडे ३, रा. घ. भोयर ३, शि. पं. घमदर ३, मु. श्रा. श्यामकुंवर ३, सु. उ. काळवांडे ३.

केंद्र :– जवाहर नाईट हायस्कूल, नागपूर–१

कु. कमल ना. देशमुख ३, व. तु. भोन्डे ३, प. द. कोपुलवार २, पु. सि. गजघाटे ३, म. सो. पाटणकर ३, मे. सं. पछीस्के ३.

साहित्य परिचित

केंद्र :– लोकमान्य टिळक राष्ट्रीय विद्यालय, तुमसर

ह. तु. साठवणे ३, तु. प. वांते २, टो. मा. वागडे २, शि. ह. हिंगे ३, सु. रा. वडवाईक २, शो. रा. लोहवरे २, पृ. ट. भैसारे ३, श्या. र. लांजेवार २, न. तु. वावनकर २, रा. द. राहाटे ३, रा. आ. साठवणे २, ना. चिं. क्षिरसागर ३, ह. ह. धकाते २, मि. म. श्रावणकर २, वं. से. कठाणे २, दा. न. नागोसे ३, ज. भा. पटले ३, म. रा. वडवाईक ३, घ. रा. पटले ३, ते. या. जगनाडे २, जे. दि. डोये ३, तु. पां. तितीरमारे २, ज. का. पटले ३, वि. नि. गोपाले ३, र. वा. शेख ३, हु. धों. चौधरी ३.

केंद्र :– प्रकाश विद्यालय, अडयाळ

भे. सु. जाधव ३.

केंद्र :– नालंदा शिक्षण संस्था, पवनी

आ. वि. मोटघरे २, कि. वि. ठवकर ३, ज. छ. वैस ३.

केंद्र :– जिल्हा परिषद हायस्कूल, सानगडी

हे. जा. मेंडारकर ३.

केंद्र :– सिंधी हिंदी ब. ऊ. माध्य. शाळा, नागपूर

कु. निर्मला स. गोरेल्पल ३.

केंद्र :– सर्वोदय विद्यालय, कुही

तु. शि. डहाके ३.

साहित्य प्रबोध

केंद्र :– पूर्व मराठी माध्य. विद्यालय, चोरटी

न. पे. रघटाटे ३.

केंद्र :– जनता विद्यालय, पाटणबोरी

सौ. निर्मला ल. तगलपल्लेवार ३, कु. चंपावती रा. मुंजेकर २.

केंद्र :– पूर्व मा. म. शाळा, सोनोरी

ज. पा. कोरडे ३, रा. अ. टिक्कस २, एम. नझीर एम. अशरफ पटेल ३.

केंद्र :– प्रकाश विद्यालय, अडयाळ

मा. वि. पोटवार ३.

केंद्र :– नालंदा शिक्षण संस्था, पवनी

या. ह. रेहपांडे ३, स. सी. खोब्रागडे ३, मा. वि. पराते २, पं. बा. देविकार ३, दे. ग. अंबाडे ३, शेखसादी व: अब्दुलरहीमशेख ३.

केंद्र :— दे. पू. मा. शाळा, पोफाळी
प्रे. छो. सेंगर ३, ना. वि. हिंगमिरे ३, मा. ल. काळे ३, रफीक अहेमदखां महेबुबखां खान ३,

केंद्र :— दे. पू. मा. शाळा, गोवरी
कु. व. लांजेवार ३.

केंद्र :— विनोबा विद्यालय, तेलकामठी
भ. कु. डोंगरे ३, सौ. श्रद्धादेवी द. भोकरे ३.

केंद्र :— रूरल इन्स्टिटयूट, अमरावती
पां. वि. जाधव ३.

केंद्र :— मॉडेल आय. ई. स्कूल, देऊरवाडा
ज्ञा. आ. कदम २, वि. वा. बन्सोड ३.

केंद्र :— शासकीय बहुउद्देशीय उच्चतर माध्य. शाळा
म. दा. वारासिंगे २.

केंद्र :— वर्धा
व. ग. नाकाडे. ३, सु. फू. जैन २, उ. कि. पहाडे ३.

केंद्र :— सुभानिया हायस्कूल, नागपूर
महम्मद अब्दुलहई रिज्वी ३, सिद्दीक अहमद व: अब्दुल रशीदखां २.

केंद्र :— राष्ट्रभाषा प्रचार समिती, नागपूर—१
सौ. ज्योति अ. बुलबुले २, सौ. सिंधू व. जोशी ३, दि. के. ढोले ३.

केंद्र :— जनता विद्यालय, चंद्रपूर
स. ग. निंवाळकर ३, वा. मा. वैरागडे ३.

साहित्य स्नातक : खंड १

केंद्र :— नालंदा शिक्षण संस्था, पवनी
द. ना. रायपूरकर, उत्तीर्ण, ई. कि. जिभकाटे उत्तीर्ण, मोहंमद यासीन कुरेशी उत्तीर्ण.

केंद्र :— दे. पू. मा. शाळा, पोफाळी
कु. निर्मला ज्ञा. कदम उत्तीर्ण.

केंद्र :— रूरल इन्स्टिट्यूट, अमरावती
दा. वा. ठवकर उत्तीर्ण, पि. घ. मांजरे उत्तीर्ण, म. र. सोनटक्के उत्तीर्ण.

केंद्र :— शासकीय बहुउद्देशीय उच्चतर माध्य. शाळा, गडचिरोली
वा. ग. मांडेकार उत्तीर्ण, गं. पं. म्हस्के उत्तीर्ण.

केंद्र :— राष्ट्रभाषा प्रचार समिती नागपूर—१
कु. शालिनी ना. पाठक उत्तीर्ण, कु. सुनंदा र. अपराजीत उत्तीर्ण, दा. द. सोमकुंवर उत्तीर्ण, नि. सं. राणे उत्तीर्ण, कु. ग्रेस रामुवेल मोर्डे उत्तीर्ण, कु. कुमुदिनी वी. मेश्राम उत्तीर्ण, कु. शालिनी मि. विसपुते उत्तीर्ण.

केंद्र :– जनता विद्यालय, चंद्रपूर

कु. प्रभा खं. देशमुख उत्तीर्ण, भा. ना. काकडे उत्तीर्ण, ग. वा. गावंडे उत्तीर्ण, व. र. वानखेडे उत्तीर्ण, अ. रा. झाडे उत्तीर्ण.

केंद्र :– ज्ञानोदय हायस्कूल, नागपूर–२

भि. ग. पाटील उत्तीर्ण, कु. प्रमिला ज. डफळापूरकर उत्तीर्ण.

साहित्य स्नातक : खंड १ – २

केंद्र :– नालंदा शिक्षण संस्था, पवनी.

मा. उ. वोरीकर, उत्तीर्ण.

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, पोफळी.

वि. सं. घाडवे उत्तीर्ण, द. मा. जाधव उत्तीर्ण.

केंद्र :– रूरल इन्स्टिटयूट, अमरावती.

कु. शोभा म. गेडाम उत्तीर्ण.

केंद्र :– मॉडेल आय. ई. एम्. स्कूल, देऊरवाडा.

कु. आशा वि. व्हिट्ठले उत्तीर्ण, . सुशीला दि. विडकर उत्तीर्ण, ह. जा. खडसे उत्तीर्ण वि. सु. गडलिंग उत्तीर्ण.

केंद्र :- राष्ट्रभाषा प्रचार समिती, नागपूर – १.

कु. सुशिला कृ. जोशी उत्तीर्ण.

केंद्र :– बुनियादी विद्यालय, सेवाश्रम टाकळी.

पां. के. वुरडे उत्तीर्ण.

साहित्य स्नातक : खंड २

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, पोफाळी.

ज्ञा. ना. कदम उत्तीर्ण.

केंद्र :– रूरल इन्स्टिटयूट, अमरावती.

दे. का. घांडे उत्तीर्ण.

केंद्र :– शासकीय बहु उद्देशीय उच्चतर माध्य. शाळा, गडचिरोली.

द. ता. खडसे उत्तीर्ण.

केंद्र :– राष्ट्रभाषा प्रचार समिती, नागपूर.

रा. वि. खापरे उत्तीर्ण, कु. राजस जॉशवा डेवीड उत्तीर्ण.

केंद्र :– जनता विद्यालय, चन्द्रपूर.

कु. आशा बा. रेच उत्तीर्ण.

केंद्र :– बुनियादी विद्यालय सेवाश्रम, टाकळी.

सु. ना. तडसे उत्तीर्ण.

अनुक्रमणिका

साहित्य स्नातक : पूर्ण

केंद्र :– पूर्व मा. म. शाळा, सोनोरी.
वि. शं भेले ३, कु. ल. भट्ट २.

केंद्र :– जनता विद्यालय, पाटणबोरी.
म. ना. यमसनवार ३, सु. ना. अर्गुलवार २, म. शि. डब्बावार २.

केंद्र :– नालंदा शिक्षण संस्था, पवनी.
शां. ब. बानाईत २.

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, पोफाळी.
प्र. भा. डांगे ३, कि. वा. ढोरे २, बा. ल. काळे २, आ. ल. काळे ३.

केंद्र :– दे. पू. मा. शाळा, गोवरी.
भो. ग. खाजवणे ३, बा. श्या. दुह्जिोड ३, या. ना. लाखे २, व. ग. सत्रमवार ३.

केंद्र :– जिल्हा परिषद हायस्कूल, सानगडी.
ग. हृ. मडावी ३.

केंद्र :– पूर्व माध्य. शाळा, बोपापूर.
रा. ता. वाघ ३, श्री. गो. मांडवकर २, वि. न. मुंगले १.

केंद्र :– मॉडेल आय. ई. एम्. स्कूल, देऊरवाडा.
सौ. सिंधू रा. केळतकर २.

केंद्र :– जनता विद्यालय, चन्द्रपूर.
कु. सत्यवती वा. सराफ १.

२७ वे साहित्य संमेलन, वर्धा

अहवाल

विदर्भ साहित्य संघाचे २७ वे साहित्य संमेलन वर्धा येथे ता. २५, २६ नोव्हेंबर १९६७ रोजी ख्यातनाम साहित्यिक श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे यांच्या अध्यक्षतेखाली न्यू इंग्लिश हायस्कूलच्या पटांगणात झाले.

सुरवातीला स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वरजी बजाज यांनी स्वागतपर भाषण केले. स्वागतपर भाषणाचा सारांश पुढीलप्रमाणे—

'आज वर्धा नगरीत होणाऱ्या, विदर्भ साहित्य संघाच्या २७ व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने मी आपले हार्दिक स्वागत करीत आहे. मराठी साहित्याची ज्यांनी प्रदीर्घ सेवा केली, साहित्याच्या वेगवेगळ्या दालनात ज्यांनी अमोल अशी भर घातली, मराठी रसिक मंडळीला आपल्या रसाळ वाणीने आणि प्रभावी लेखनशैलीने मुग्ध केले असे ख्यातनाम साहित्यिक श्री. पु. भा. भावे या विदर्भ साहित्य सम्मेलनाला अध्यक्ष लाभले हे वर्धावासी जनतेचे भाग्यच म्हणावे लागेल. संमेलनाचे उद्घाटक श्री. ग. दि. माडगूळकर महाराष्ट्रीय जनतेला कथालेखक, गीतकार, चित्रपटकथा–लेखक आणि साहित्यसेवी म्हणून सुपरिचित आहेत. विषय जुनाच पण कालानुरूप आणि जनताजनार्दनाची आवड लक्षात घेऊन हिंदूंच्या रामायण ग्रंथाला गीतरूपाने सामान्य माणसाप्रत पोचविण्याच्या सफल प्रयत्नामुळे तर श्री. माडगूळकर खऱ्या अर्थाने लोकांचेच लेखक झाले आहेत. अशा रीतीने या लेखकांनी मराठी सारस्वताची केलेली थोर सेवा आणि त्यांनी मराठी लेखकांत मिळविलेले एकमेवाद्वितीय स्थान हे आपणा सर्वांस विदित आहे. अशा प्रकारचे अध्यक्ष आणि उद्घाटक या संमेलनाला लाभल्यामुळे आणि हे अधिवेशन वर्ध्यासारख्या इतिहासप्रसिद्ध स्थळी घेण्याचा योग आल्यामुळे आम्हा वर्धावासी जनतेला निरतिशय आनंद होत आहे. मी पुनः स्वागत समितीतर्फे आणि वर्धावासी जनतेतर्फे आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करीत आहे.

वर्धा नगरीला एक आगळा इतिहास आहे. वर्धा नगरी भौगोलिक दृष्टीने आणि अक्षांश-रेखांशाच्या मोजमापाने भारताचा मध्यबिंदू आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ही नगरी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आकर्षणाचा केंद्रबिंदू होती. राष्ट्रपिता पू. बापूंच्या दीर्घ वास्तव्यात स्वातंत्र्ययुद्धाची सर्व सूत्रे येथूनच हलावयाची. वर्ध्याच्या परिसरातील भाग इतिहासप्रसिद्ध आणि पुराणप्रसिद्ध आहे. कौंडण्यपूर हे विदर्भराजकन्या रुक्मिणीचे माहेरघर पुराणप्रसिद्धच आहे. केळझर हे वर्ध्याहून १४ मैलांवर असून त्याला पुराणेतिहास आहे. महाभारतात वर्णन केलेली एकचक्रा नगरी ती हीच असे इतिहासकारांचे अनुमान आहे. येथेच पंडुपुत्र भीमाने बकासुराचा वध केला म्हणतात. पवनार येथून पाच मैलांवर असलेले एक मोठे गाव 'प्रवरनगर' हे त्या नगरीचे खरे नाव. प्रवरसेन राजामुळेच या गावाचे नाव पवनार पडले असा इतिहाससंशोधकांचा अंदाज आहे. भोसल्यांच्या कारकीर्दीतसुद्धा

या नगरीला एक विशेष महत्त्व होते. वाकाटकांच्या या ऐतिहासिक नगरीत पूज्य विनोबा भावे यांच्या वास्तव्यामुळे तर त्याला एक आगळे स्वरूप प्राप्त होऊन ते आता परमधाम म्हणून सर्वांना परिचित आहे. सुरू असलेल्या उत्खननकार्यामुळे काही नवीन इतिहास प्रकाशात येण्याची फार शक्यता आहे.

साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात ही भूमी अग्रेसरच राहिलेली आहे. मराठी साहित्यात ख्यातिप्राप्त प्र स्थानाचे मानकरी पू. विनोबा भावे, काकासाहेब कालेलकर, आचार्य दादा धर्माधिकारी यांची ही कर्मभूमी. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष बापूसाहेब चोरघडे यांनीही वर्ध्याला आपल्या विविध साहित्याची निर्मिती केली. टीकासाहित्याचे लेणे म्हणून जिचा उल्लेख करता येईल ती कै. श्रीधरपंत परांजपेकृत श्लोककेकावलीवरील टीका ही येथेच लिहिली गेली. ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांचे आयुष्याचे शेवटचे दिवस येथेच गेले. ज्ञानेश्वरीनंतर विनोबांच्या गीताईला प्रमुख स्थान आहे. गीताई प्रथम प्रसिद्ध करण्याचा मान वर्ध्यालाच मिळाला. अशा चिरकालिक 'गीताई'चे भव्य गीताई मंदिर येथे बांधण्यात येणार आहे. स्वातंत्र्य मिळाले, बापू वर्धा सोडून गेले व त्यांच्या मागोमाग त्या सगळ्या पोरक्या झालेल्यांनी इतर क्षेत्रात आपापली घरे केली.

स्वातंत्र्यपूर्व काळ साहित्यनिर्मितीचा उज्वल काळ होता असेच म्हणावे लागेल. खरे म्हटले तर स्वातंत्र्यापूर्वीच्या काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळ शांततेचा, सुबत्तेचा व साहित्य निर्मितीला उत्साह-वर्धक ठरत असतो. परंतु भारताच्या बाबतीत अगदी उलट झाले. १९४५ नंतर दुष्काळ, महागाई, कलह यांनी देशावर जणू आक्रमणच केले. शांततेऐवजी अशांतता, सुबत्तेऐवजी कलहाचे साम्राज्य देशात पसरले. जीवनसंघर्ष तीव्र झाला.

अशा परिस्थितीत साहित्यिक वर्ग अर्धपोटी जीवाला उन्नत करणारे चिंतनपर साहित्य कसे निर्माण करणार ? वाङ्मयाचा रसिकवर्ग हा पण मध्यम श्रेणीतलाच, शरीरधारणेला जिथे कष्ट पडू लागले तेथे आत्म्याच्या उन्नतीचा विचार करण्याची फुरसत कुणाला ? अंधकारपूर्ण नैराश्याच्या वातावरणात जे नेमके व्हावयाला नको होते तेच झाले. साहित्यनिर्मितीत खंड पडला. पण साक्षरता वाढल्याने काहीतरी करमणुकीकरिता वाचणारा वाचकवर्ग तात्पुरते मन रिझविणाऱ्या चटोर अमेरिकन इंग्रजी वाङ्मयाकडे वळला गेला. वाचकांची ही प्रवृत्ती पाहून मराठी वाङ्मयातील काही लोकांनी मागणी तसा पुरवठा करण्याचे धोरण आखले व मराठी माध्यमाद्वारे ती मागणी पुरविली. चटकदार पण त्रोटक बातम्या वाचण्याचा लोकांचा कल पाहून अनेक छोटी आणि चटकदार बातम्या देणारी वर्तमानपत्रे भराभर वाढू लागली. आजच्या या घटकेला या शहरात १०–११ साप्ताहिके आणि दैनिके निघत असतात. 'जनता', 'जागरण', 'प्रतापगडचे वारे' इत्यादी साप्ताहिके आज कित्येक वर्षांपासून क्रमशः श्री खेडकर, उमाशंकरजी शुक्ल व श्री पुंडलीकराव मेघे यांच्या कुशल संपादनाने चालू आहेत. लोकांची बातम्यांची तीव्र हुरहूर पूर्ण करण्याकरिता 'वर्धा टाइम्स' व 'वीर वनवासी' या दोन सांध्य दैनिकांचा उदय झालेला आहे. हायब्रीड युगातील परंपरेनुसार मराठी व हिंदी दोन्ही भाषांचा वापर यात केला जातो. युगधर्मानुसार साप्ताहिके व दैनिके आपल्या दैनंदिन लिखाणाने वाङ्मयनिर्मितीचे प्रयास करीत आहेत. टिळक, आगरकर, चिपळूणकर यांनी नियतकालिकांद्वारेच आपले लिखाण अमर केले आणि जनतेत जागृती केली. ध्येयदृष्टी असली, आचारविचारांची शुद्धता बाळगली तर गंगोत्रीला गंगेचे रूप येणे अशक्य नाही. एवढेच की त्या व्यासांचा मागोवा घेत या संपादकांनी व लेखकांनी निश्चयाने पुढे गेले पाहिजे. उच्च ध्येयाप्रत त्यांनाही पोचता येईल. काळाच्या वाळवंटात आपली पावले उमटवून ठेवता येतील आणि त्यांच्याकडून तशी अपेक्षा आहेही. आम्ही त्यांचे सुयश चिंततो.

" जहाँ न पहुँचे रवि, वहाँ पहुँचे कवि " या वचनाप्रमाणे साहित्यिकांचे कार्य हे सर्वव्यापी आहे. शब्दशक्ती म्हणजेच साहित्य ही अमोल शक्ती आहे. देशाच्या नवनिर्माण कार्यात साहित्यिकांचे स्थान श्रेष्ठ प्रतीचे आहे. नव्या मनूचा मानव तेच घडवू शकतात असा माझा विश्वास आहे.

साहित्यिकांच्या या सेवा-कार्यात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत असतात हे मला मान्य आहे. पण समस्यांची उकल करण्याची शक्ती त्यांच्यात नसते हे मला अमान्य आहे. म्हणून " एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ " या ध्येय-मंत्राने प्रेरित होऊनच त्यांनी आपल्या समस्यांचे निराकरण करावयास पाहिजे. पण याचा अर्थ आपण असा करता कामा नये की समाजाची याबाबत काहीच जबाबदारी नाही. कलेचे योग्य आणि समयोचित मूल्यमापन हे समाजानेच केले पाहिजे. समाज आणि शासन ह्यांनी या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे ' कारण ' आणता कामा नये. नवसमाज घडविणाऱ्या सरस्वतीच्या उपासकांचे या वर्धा नगरीत आगमन म्हणजे आम्हा वर्धावासियांचे केवढे हे भाग्य ! समाज, साहित्यिक, शासन या सर्वांनी आपआपली जबाबदारी पार पाडून समाज घडणीचे कार्य अविरत व निर्विघ्नपणे चालू ठेवावे. परस्परांना मदत करून मार्गदर्शन करून साहित्य वृद्धिगत करून शारदेचे मंदिर समृद्ध करावे. पुनश्च या सर्व साहित्यसंतांचे मी मनःपूर्वक आभार मानून माझे भाषण संपवितो.

यानंतर संमेलनाचे उद्घाटक कवी श्री. ग. दि. मडगूळकर यांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात, अलिकडे निर्माण होत असलेल्या अश्लील वाङ्मयाबाबत चिंता व्यक्त केली आणि साहित्य निर्मळ मनाने लिहिले जावे अशी अपेक्षा व्यक्त केली. नवसाहित्य साहित्याप्रत पोचण्याच्या दृष्टीने विचार व्हावा, असे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणाचा सारांश

संमेलनाचे अध्यक्ष पु. भा. भावे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ' अलिकडे जी विकृत वाङ्मयनिर्मिती होत आहे, तिचे समर्थनही तितक्याचे हिरीरीने होत असले तरी सरस्वतीच्या या पवित्र मंदिरात अशा विकृत साहित्याला कितपत स्थान द्यावयाचे याचा विचार झाला पाहिजे. '

ते पुढे म्हणाले, ' नवी अनुभूती, नवा आविष्कार म्हणून घाणेरडे साहित्य आज आपले ओंगळ स्वरूप लपवीत असले तरी या साहित्याचे निर्माते विकृत मनाचे असले पाहिजेत हे सुस्पष्ट आहे. अशा रुचिहीन साहित्याचे समर्थक निश्चितच मनोविकृतीने पछाडलेले असले पाहिजेत.

स्वत्व पेलण्यासाठी जशी समर्थ लेखणी लागते, तसाच मोठा आशय व्यक्त करण्यासाठी कलाकारही तितक्याच उंचीचा लागतो. मोठ्या तत्त्वांची पात्रे मोठ्या लेखकांनी आपल्या जिवंतपणीच साकार केलेली असतात, म्हणून ती पाहताना तो आनंदही तितक्याच प्रतीचा मिळतो. उलट चारित्र्यहीन पात्र साकार झाल्यास त्यापासून मिळणारा आनंदही तितकाच निकृष्ट असतो. डोके चालण्यासाठी नव्हे तर परमेश्वराने ते चालविण्यासाठी दिले आहे. '

रात्रौ १० वाजता सुप्रसिद्ध पार्श्वगायक श्री. सुधीर फडके यांचा ' गीतरामायण 'चा कार्यक्रम झाला.

परिसंवाद

ता. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ' मराठी संतांची कामगिरी ' या विषयावर परिसंवाद झाला. या कार्यक्रमात प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. द. भि. कुळकर्णी, श्री. सुदामजी सावरकर आणि श्री. ज. सी. अकर्ते यांची भाषणे झाली.

याच वेळी वर्धा येथील वयोवृद्ध साहित्यिकांचा, श्रीफल आणि शाल देऊन, सत्कार करण्यात आला.

दुपारी २ वाजता विषयनियामक समितीची सभा झाली.

दुपारी ३–३० वा. सर्वसाधारण सभा होऊन काही महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

सायं. ५ वाजता खुले अधिवेशन झाले. या अधिवेशनात दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजली अर्पण करणारा ठराव मांडण्यात आला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

यानंतर यवतमाळचे श्री. हरीश मानधना यांनी 'शासनाने वक्षिसांकरिता हस्तलिखितांचा स्वीकार करावा' या आशयाचा ठराव मांडला. प्राचार्य पुंडलिक धुमाळे यांनी अनुमोदन दिले व सर्वानुमते हा ठराव मंजूर झाला. यानंतर श्री. पु. भा. भावे यांचे समारोपाचे भाषण झाले.

संमेलनाला आलेल्या प्रतिनिधींच्या वतीने श्री. पु. व्यं. दारव्हेकर आणि खामगावचे प्राचार्य मुनशी यांची भाषणे झाली.

सायं. ६ वाजता प्रा. वामनराव चोरघडे यांच्या अध्यतेखाली 'कथाकथना'चा कार्यक्रम झाला.

रात्रौ १० वाजता नाटककार श्री. गोविंद भिडे यांनी 'कुर्यात् सदा मंगलम्' हा एकपात्री प्रयोग सादर केला.

या संमेलनाला पद्मश्री पु. ल. देशपांडे, श्री. खापर्डे बंधू, श्री. ना. रा. शेंडे, डॉ. वि. भि कोलते, म. म. बाळशास्त्री हरदास, श्री. राजारामबापू पाटील आदींचे शुभसंदेश आले होते.

दोन दिवसपर्यंत, भरगच्च कार्यक्रम सादर करण्यात आले.

संमेलनाचे आयोजक श्री. दे. गं. सोटे, श्री. कुसुमाकर वोरीकर आणि इतर सहकाऱ्यांनी संमेलन यशस्वी केले.

या संमेलनासाठी वाहेरगावाहून जवळजवळ २०० प्रतिनिधी उपस्थित होते.

विदर्भ साहित्य संघ

सर्व सभासदांना सूचना

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, १ एप्रिल १९६८ ते ३१ मार्च १९७१ ह्या तीन वर्षांकरिता अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळाचे सभासद यांच्या निवडणुकीसाठी निर्वाचन अधिकारी म्हणून श्री. मनोहर नारायण परांजपे, 'मनपद्म' रेशीमबाग, नागपूर–२ यांची नेमणूक कार्यकारी मंडळाने दि. २२ ऑक्टोबर ६७ च्या ठरावानुसार केली आहे. तेव्हा घटना १२ (औ)ला अनुसरून निवडणुकीच्या तारखा ठरविणे, नामनिर्देशक पत्रिकांची छाननी व तदनंतरची निवडणुकीसंबंधीची सर्व कामे या अधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे होतील.

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष
वि. सा. संघ

नागपूर
दि. ३०–१२–१९६७

संघवार्ता

. बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ

रंगभूमी दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन—

रंगभूमी दिनानिमित्त ५ नोव्हेंबर १९६७ रोजी संस्थेच्या श्रीशिवाजी ग्रंथालयातर्फे रंगभूमी-विषयक ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

२७ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. पु. भा. भावे यांचा सत्कार—

वि. सा. संघातर्फे, वर्धा साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष, सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. पु. भा. भावे यांचा सत्कार ता. २४–११–१९६७ रोजी सायं. ६–३० वाजता (गडकरी सभागृहात) करण्यात आला. यावेळी श्री शं. वा. शास्त्री, श्री चंद्रशेखर धर्माधिकारी, कु. प्रभा गणोरकर यांची भाषणे झाली. सुरुवातीला अध्यक्ष श्री. वामनराव चोरघडे यांनी श्री. भावे यांचा पुष्पमाला घालून सत्कार केला. सत्कारप्रसंगी श्री. पु. भा. भावे म्हणाले, लेखकाचा धंदा उत्तम आणि सन्माननीय आहे. त्यासाठी लेखकाने स्वतः सन्माननीय असणे आवश्यक आहे व ती मान्यता लेखकाने मिळविली पाहिजे व त्याचबरोबर साहित्यिक संस्थेत इतर कोणत्याही राजकीय पुढाऱ्यापेक्षा लेखकाचे पहिले स्थान असले पाहिजे.

या कार्यक्रमाला संमेलनाचे उद्घाटक सुप्रसिद्ध कवी श्री. ग. दि. माडगूळकर उपस्थित होते.

कवी श्री. मामा रामभजनी यांची पुण्यतिथी—

कवी श्री. गोविंद गोपाळ उर्फ मामा रामभजनी यांचा स्मृतिदिन दि. १८ डिसेंबर १९६७ रोजी सायं. ६–३० वाजता साजरा करण्यात आला.

यावेळी प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांचे भाषण झाले.

मराठीचे अध्यापन : चर्चासत्र—

संघातर्फे 'मराठीचे अध्यापन' या विषयावर एक चर्चासत्र दि. १७ ते १९ डिसेंबर ६७ पर्यंत आयोजित करण्यात आले.

चर्चासत्राचे उद्घाटन नागपूर विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते ता. १७ डिसेंबर रोजी दुपारी ४–३० वाजता झाले. सुरुवातीला प्रा. म. वा. कुंडले यांनी चर्चासत्रासंबंधी माहिती दिली. यानंतर प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांचे उद्घाटनाचे भाषण झाले.

मराठी ही आता राज्यभाषा झाली आहे. माध्यमिक शाळांतून व महाविद्यालयांतून बाहेर पडणारा विद्यार्थी राज्याच्या सर्व क्षेत्रात जाणारा असून त्याच्या भाषेविषयी लोकांच्या काही अपेक्षा असणारच. तेव्हा त्या अपेक्षा पूर्ण करणारे अध्ययन व अध्यापन झाले पाहिजे. त्यासाठी सरकारने सोय करावी किंवा विद्यापीठाला सहाय्य करावे, असे डॉ. वि. भि. कोलते म्हणाले.

या कार्यक्रमानंतर प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'अध्यापन' विषयावरील पहिली बैठक झाली.

ता. १८ रोजी आणि १९ डिसेंबर रोजी अध्यापनासंबंधी चर्चा करण्यात आली. या चर्चासत्राचा विस्तृत अहवाल इतरत्र दिला आहे.

सानेगुरुजी कथामालेनिमित्त बालवाङ्‌मयाचे प्रदर्शन—

संस्थेच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे सानेगुरुजी कथामालेच्या निमित्ताने बालवाङ्‌मयाचे प्रदर्शन ता. २३ डिसेंबर रोजी, साहित्य प्रसार केंद्राच्या सहकार्याने, आयोजित करण्यात आले.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन साने गुरुजी कथामालेचे संयोजक श्री. ए. श्री. पटवर्धन यांनी केले. या प्रदर्शनात विज्ञान, कथा, क्रीडा इत्यादी विषयांवरील अनेक पुस्तके होती.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे यांचेकडून ग्रंथरूपाने देणगी

ख्यातनाम साहित्यिक, वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांनी श्रीशिवाजी ग्रंथालयाला आपल्या खाजगी ग्रंथालयातील ८०० मौलिक ग्रंथ देणगी म्हणून दिले. या देणगीमुळे संदर्भ ग्रंथालयाचे दालन समृद्ध झाले आहे.

या अमोल देणगीबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

देणगी

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई, यांचेकडून रुपये १,००० देणगीदाखल मिळाले.

देणगीदारांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

व्याख्यान

आचार्य स. ज. भागवत यांचे दि. २९ डिसेंबर रोजी सायं. ६-३० वाजता 'नवजागरण आणि नवसाहित्य' या विषयावर व्याख्यान झाले.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

केंद्राधिकाऱ्यांना सूचना आणि विनंती

विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङमयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश—मराठी भाषा आणि वाङमय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी, तसेच महाराष्ट्रातील अ–मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

फेब्रुवारी १९६८ पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून विदर्भ माध्यमिक शिक्षण समिती आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परिक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

फेब्रुवारी ६८ सत्राची परीक्षा शनिवार दि. १०–२–६८ आणि ११–२–६८ ला होईल.

नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परिक्षेस बसविले तरच केन्द्र–मान्यता देण्यात येईल असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी आवेदन पत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केन्द्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठवावे. केवळ परिक्षार्थ्यांचे निर्धारित शुल्क केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवावे. आपण आपल्या केन्द्रातून दिनांक २० जानेवारी ६८ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन, केंद्रीय कार्यालयाकडे दि. २५ जानेवारी ६८ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी. तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाही. जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे, ही विनंती.

ग. स. देशपांडे
संचालक
परीक्षा समिती, वि. सा. संघ

दिनांक १ जानेवारी १९६८

अनुक्रमणिका

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नो. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.

अनुक्रमणिका